# वेध

२०२१ २२




# दयानंद कला महाविद्यालय, लातूर



शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये संपन्न झालेल्या वार्षिक स्नेहसंमेलन 'अमृत' मध्ये 'दयानंद श्री'
म्हणून गौरविण्यात आलेला श्री. भरत पवारचा ब्रह्मान करताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड,
विद्यार्थी मंडळ प्रभारी डॉ. सुनील साळुंके, उपप्राचार्य अनिलकुमार माळी,
पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे, डॉ. अशोक वाघमारे व डॉ. संदीपान जगदाळे.




शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये संपन्न झालेल्या वार्षिक स्नेहसंमेलन 'अमृत'मध्ये 'दयानंद श्रीमती'
म्हणून गौरविण्यात आलेली कु. पुजा माळीचा ब्रह्मान करताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड,
विद्यार्थी मंडळ प्रभारी डॉ. सुनील साळुंके, उपप्राचार्य अनिलकुमार माळी,
पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे, डॉ. संदीपान जगदाळे व सौ. जयमाला गायकवाड,

दयानंद कला महाविद्यालय, लातूर




आशियाई क्रीडा स्पर्धेत पॉवर लिफ्टिंगमध्ये रौप्यपदक पटकावणारी
महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. सोनल सावंतचा
महाविद्यालयास सार्थ अभिमान आहे.



आशियाई क्रीडा स्पर्धेत पॉवर लिफ्टिंगमध्ये रौप्यपदक पटकावल्याबद्दल
कु. सोनल सावंतचा सत्कार करताना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू डॉ. उद्धवजी भोसले.



आशियाई क्रीडा स्पर्धेत पॉवर लिफ्टिंगमध्ये रौप्यपदक पटकावल्याबद्दल
कु. सोनल सावंत हिचा सत्कार करताना दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष
मा.श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. सुरेशजी जैन
प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड,
उपप्राचार्य प्रा. अनिलकुमार माळी व प्राध्यापक वृंद.

Shree,Ltr- 9371797930

# दयानंद शिक्षण संस्था, लातूर

## संचालक मंडळ



मा. श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी
अध्यक्ष



मा. श्री. अरविंदराव सोनवणे
उपाध्यक्ष



मा. श्री. ललितभाई शाह
उपाध्यक्ष



मा. श्री. रमेशकुमारजी राठी
उपाध्यक्ष



मा. श्री. रमेशजी बियाणी
सरचिटणीस



मा. श्री सुरेशजी जैन
संयुक्त सचिव



मा. श्री. रामरावजी पाटील
सहायक सचिव



मा.श्री. ॲड. श्रीकांतजी उटगे
सहायक सचिव



मा. श्री. संजयजी बोरा
कोषाध्यक्ष

# दयानंद कला महाविद्यालय लातूर

## प्रशासकीय मंडळ

आमचे प्रेरणास्थान



**प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड**



**प्रा. अनिलकुमार माळी**
उपप्राचार्य (कनिष्ठ महाविद्यालय)



**डॉ. दिलीप नागरगोजे**
पर्यवेक्षक (कनिष्ठ महाविद्यालय)

वेध

# संपादक मंडळ




**प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड**
प्रकाशक



**डॉ. बालाजी घुटे**
मुख्य संपादक



**डॉ. अंकुशकुमार चव्हाण**
सहसंपादक



**डॉ. रामेश्वर खंदारे**
सहसंपादक



**डॉ. विवेक झंपले**
सहसंपादक



**डॉ. मीना घुमे**
सहसंपादक



**प्रा. दुर्गा शर्मा**
सहसंपादक



**प्रा. सुरेश क्षीरसागर**
सहसंपादक

## : विद्यार्थी संपादक मंडळ :



**श्री. माधव शिंदे**
मराठी विभाग



**कु. मानसी गायकवाड**
हिंदी विभाग



**कु. साधना भोसले**
इंग्रजी विभाग



**श्री. भरत पवार**
सामाजिकशास्त्रे विभाग

वेध

# गुणवंत प्राध्यापक



**डॉ. शिवाजी गायकवाड**

प्राचार्यपदी निवड



**डॉ. संदीप जगदाळे**

स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेडच्या विद्यापीठ गीत समिती सदस्यपदी निवड.
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने आयोजित
'आझादी का अमृत महोत्सव लातूर जिल्हा समिती'वर सदस्यपदी निवड.



**प्रा. सुधीर गाढवे**

राज्यशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण



**डॉ. सुजाता दामरे**

इतिहास विषयात विद्यावाचस्पती



**डॉ. अपर्णा पसारकर**

ग्रंथालयशास्त्र विषयात विद्यावाचस्पती

# गुणवंत विद्यार्थी



**कु. योगिता गोटके**
बी.ए.ॲंड. सर्व्हिस
विद्यापीठात सर्वप्रथम



**विद्वान कांबळे**
बी.ए.ॲंड. सर्व्हिस
विद्यापीठात द्वितीय



**कु. प्रणिता बुद्धे**
बी.ए. ॲंड सर्व्हिस
विद्यापीठात तृतीय



**दया किशन**
बी.ए. ॲनिमेशन
विद्यापीठात सर्वप्रथम



**कु. सोनाली जांगिड**
बी.ए. ॲनिमेशन
विद्यापीठात द्वितीय



**कु. सचवी जनमते**
बी.ए. ॲनिमेशन
विद्यापीठात तृतीय



**कु. मोहिनी शिंदे**
बी.ए. फॅशन
विद्यापीठात सर्वप्रथम



**कु. गिता रगडळ**
बी.ए. फॅशन
विद्यापीठात द्वितीय



**कु. सुप्रिया झाळे**
बी.ए. फॅशन
विद्यापीठात तृतीय



**अक्षय गवळी**
एम.ए. मराठी
विद्यापीठात द्वितीय



**कु. महानंदा माने**
एम.ए. मराठी
विद्यापीठात तृतीय



**कु. साहेला सय्यद**
एम.ए. हिंदी
विद्यापीठात सर्वप्रथम



**कु. सोनाली कांबळे**
एम.ए. हिंदी
विद्यापीठात द्वितीय



**कु. प्रिती राजनकर**
एम.ए. इंग्रजी
विद्यापीठात सर्वप्रथम



**कु. ऐश्वर्या माने**
एम.ए. लोकप्रशासन
विद्यापीठात सर्वप्रथम



**कु. पुनम माने**
एम.ए. लोकप्रशासन
विद्यापीठात द्वितीय



**कु. स्नेहा पाटे**
एम.ए. ॲनिमेशन
विद्यापीठात सर्वप्रथम



**कु. श्रुती बनसोडे**
एम.ए. ॲनिमेशन
विद्यापीठात द्वितीय



**सुरेश अमोल**
एम.ए. ॲनिमेशन
विद्यापीठात तृतीय



**कु. प्रियंका सोनटक्के**
एम.ए. फॅशन
विद्यापीठात सर्वप्रथम



**कु. सुषमा गायकवाड**
एम.ए. फॅशन
विद्यापीठात द्वितीय



**कु. मेघा कानडे**
एम.ए.फॅशन
विद्यापीठात तृतीय

# महेश भुषण पुरस्कार सन्मानित मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी.





दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी यांना 'महेश भुषण' पुरस्काराने गौरविण्यात आल्याबद्दल अभिनंदन करताना संस्थेचे सचिव मा. रमेशजी बियाणी, प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड, उपप्राचार्य अनिलकुमार माळी व मा. सागर मंत्री.



दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी यांना 'महेश भुषण' पुरस्काराने गौरविण्यात आल्याबद्दल अभिनंदन करताना प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड. सोबत मा. विशालजी लाहोटी, उपप्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे, डॉ. प्रदीप सूर्यवंशी, डॉ. अंकुश चव्हाण, डॉ. सुनीता सांगोले, डॉ. बालाजी घुटे, डॉ. सुभाष कदम, प्रा. महेश जंगापल्ले.



दयानंद शिक्षण संस्थेच्या अद्यावत क्रिकेट मैदानाची पाहणी करण्यासाठी आलेले
लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री मा. अमितजी देशमुख
यांचे स्वागत करताना दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी
सोबत संस्थेचे सचिव मा. रमेशजी बियाणी व प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड.



प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड यांची प्राचार्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना
संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव मा. रमेशजी बियाणी व
संयुक्त सचिव सुरेशजी जैन.




अन्न सुरक्षा आणि प्रमाणीकरण विभाग, भारत सरकार व दयानंद कला महाविद्यालय, लातूर यांच्या वतीने आयोजित 'वॉकेथॉन' स्पर्धेत सहभागी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, प्रा.डॉ. संदीप जगदाळे व महाविद्यालयातील विद्यार्थी.




महाविद्यालयाचा वार्षिक अंक 'वेध २०२०-२१'चे प्रकाशन करताना दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव मा. रमेशजी बियाणी, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य प्रा. अनिलकुमार माळी, मुख्य संपादक डॉ. बालाजी घुटे, डॉ. प्रदीप सूर्यवंशी, डॉ. रामेश्वर खंदारे, डॉ. सुभाष कदम, प्रा. दुर्गा शर्मा व संपादक मंडळ



गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाप्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थाध्यक्ष मा.श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष रमेशकुमारजी राठी, सचिव रमेशजी बियाणी, कोषाध्यक्ष संजयजी बोरा, प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड व उपप्राचार्य दिलीप जगताप.



दयानंद शिक्षण संस्था व दयानंद कला महाविद्यालय यांच्या विद्यमाने दयानंद शिक्षण शॉपिंग कॉम्प्लेक्स या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी गाळा उपलब्ध करून देण्यात आला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तू प्रदर्शनाचे उद्घाटन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, उपप्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे, फॅशन विभागप्रमुख प्रा. सुवर्णा लवंद, प्रा. हर्षा जैन व श्री. बालकृष्ण आडसूळ



स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेडच्या वतीने शै. वर्ष २०२०–२१ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये फॅशन डिझाईन विभागातील विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम, सर्वद्वितीय व सर्वतृतीय येण्याचा बहुमान पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव रमेशजी बियाणी, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड व प्राध्यापक.



डॉ. संदीपान जगदाळे यांना राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार राज्याचे उच्च शिक्षण मंत्री मा. उदय सामंत यांच्या हस्ते मुंबई येथे प्रदान करण्यात आला.



महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन 'अमृत २०२१-२२'च्या उद्घाटनप्रसंगी प्रसिद्ध उर्दू शायर अब्दुल रब उस्ताद (गुलबर्गा विद्यापीठ), प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, विद्यार्थी मंडळ प्रभारी डॉ. सुनील साळुंके, उपप्राचार्य प्रा. अनिल माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे, कार्यालयीन अधीक्षक श्री. नवनाथ भालेराव व डॉ. अशोक वाघमारे.




महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन 'अमृत २०२१-२२'च्या अनुषंगाने आयोजित आनंद नगरीच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, विद्यार्थी मंडळ प्रभारी डॉ. सुनील साळुंके, उपप्राचार्य प्रा. अनिल माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे, डॉ. अंजली जोशी, डॉ. नितीन डोके, डॉ. गोपाल बाहेती, प्रा. अंजली बनसोडे.




एड्स जनजागृती अभियानांतर्गत रक्त तपासणी करून घेत असताना महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक सोबत कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष कदम, डॉ. सुनीता सांगोले, डॉ. मच्छिंद्र खंडागळे




'हिंदी के बूते रोजगार' या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय वेबिनारमध्ये विषय प्रवर्तन करताना संस्था सचिव मा.श्री. रमेशजी बियाणी, प्रमुख पाहुणे डॉ. रामेश्वर सिंह ऋषी, पत्रकार मास्को रूस, प्रमुख वक्ता डॉ. विवेक मनी त्रिपाठी, चीन




राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कोविड-१९ लसीकरण मोहिम राबविण्यात आली. याप्रसंगी उपस्थित कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनीता सांगोले, उपप्राचार्य अनिलकुमार माळी, डॉ. सुनील साळुंके, डॉ. शिवकुमार राऊतराव व रासेयो स्वयंसेवक.



राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे 'विशेष वार्षिक शिबीर' मौजे दवणगाव येथे संपन्न झाले. या शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. शिवराज बोकडे. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, गावचे सरपंच बबनराव नागरगोजे, कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष कदम, डॉ. सुनीता सांगोले, डॉ. मच्छिंद्र खंडागळे व रासेयो स्वयंसेवक.



समाजशास्त्र विभागाच्या वतीने दि. २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये साधन व्यक्ती डॉ. आलना जोसेफ, डायरेक्टर, सोशल सायन्सेस, क्विन्स युनिव्हर्सिटी, बेलफास्ट, आयर्लंड आणि डॉ. ऐश्वर्या पाटील, डायरेक्टर, अस्तल एज्युकेशन लि. बेलफास्ट, आयर्लंड. चर्चासत्रामध्ये उपस्थित प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, डॉ. अंजली जोशी, डॉ. भाऊसाहेब आदमाने.



राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मौजे दवणगाव येथे श्रमदानातून जलसंधारणाची कामे करताना.



एन.सी.सी. विभागाच्या वतीने 'विविधतेत एकता' या विषयावर पोस्टर डिझाईन व लोगो डिझाईन स्पर्धेचे निरीक्षण करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड, उपप्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे, प्रा. विवेक झंपले, डॉ. शिवकुमार राऊतराव आदी.




सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. गणेश बेळंबे, व्यासपीठावर प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, समन्वयक प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे आणि प्रा. डॉ. उर्मिला रेड्डी.



महिला तक्रार निवारण समितीतर्फे महिला कर्मचारी व विद्यार्थिनींसाठी समुपदेशन केंद्राचे उद्घाटनपर मार्गदर्शन करताना मा. सौ. संगीता लाहोटी. यावेळी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, अध्यक्ष डॉ. अंजली जोशी, चंद्रकला भार्गव व कुमुदिनी भार्गव.



महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग आयोजित गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत 'लोकप्रशासन विषयातील करिअरच्या संधी' या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. प्रीती पोहेकर, समवेत प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, विभागप्रमुख प्रा.डॉ. रामेश्वर खंदारे आणि प्रा. डॉ. उर्मिला रेड्डी, प्रा. डॉ. शिवशंकर कसबे.



लातूर जिल्हा माहेश्वरी सभेच्या वतीने 'महेश भूषण पुरस्कार'
दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी यांना देण्यात आला.
याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी तसेच
व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.




दयानंद कला महाविद्यालय व विश्व कल्याण विचार मंच, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
'२०१२ ते २०२२ या दशकातील भारतातील राजकारण' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी आलेले
मा.खा.विनय सहस्त्रबुद्धे यांना निवेदन देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड,
उपप्राचार्य अनिलकुमार माळी, डॉ. अंजली जोशी व प्रा. राजू मोरे.



फाउंडर अ‍ॅण्ड डायरेक्टर प्रोवेस ट्रेनिंग सोल्युशन अ‍ॅण्ड हायटेक स्कील, पुणे यांच्या वतीने आयोजित तीन दिवसीय डिजीटल मार्केटिंग वर्कशॉपमध्ये सहभागी झालेले दयानंद शिक्षण संकुलातील अ‍ॅनिमेशन विभागाच्या प्रमुख प्रा. दुर्गा शर्मा, तसेच विभागातील प्रा. इरफान शेख, प्रा. संतोष काकडे, प्रा. सचिन पतंगे, प्रा. पूजा खोंडे.



युवती कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित पारंपारिक वेशभूषा स्पर्धेत झाशीची राणीचा वेष परिधान केलेल्या युवतीसह प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य अनिलकुमार माळी, डॉ. अंजली जोशी, प्रा. हर्षा जैन, डॉ. सुनीता सांगोले, डॉ. मीना घुमे, प्रा. विणा कुलकर्णी, सौ. निर्मला दहिरे, श्रीमती चंद्रकला आदमाने व विद्यार्थी.



महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागामार्फत गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत 'सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय वेबीनारमध्ये मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे प्रा. नरीन सिन्हा, समवेत प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, विभागप्रमुख प्रा.डॉ. रामेश्वर खंदारे, प्रा. डॉ. शिवशंकर कसबे व इतर प्राध्यापक.



१ नोव्हेंबर, २०२१ रोजी कोरोनावर मात करण्यासाठी लसिकरण मोहिमेबाबत पथनाट्याद्वारे जनजागृती करताना महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाचे विद्यार्थी.




महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व दयानंद कला महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'करिअर कट्टा' कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड. व्यासपीठावर मा.डॉ. यशवंत शितोळे, डॉ. सुनील साळुंके, डॉ.शिवकुमार राऊतराव व प्रा. कोमल गोमारे.



१४ एप्रिल, २०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे विद्यार्थी महानाट्य सादर करताना.




स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड, ललित व प्रयोगजिवी कला संकुल, नाट्यशास्त्र विभाग आयोजित एकपात्री अभिनय स्पर्धा २०२२ मध्ये महाविद्यालयातील कु. तनुजा छगनराव शिंदे हिने रोख १६,००० रूपयांचे पारितोषिक पटकाविले.




वार्षिक स्नेह संमेलन 'अमृत २०२१-२२' मध्ये 'वात्सल्यम्' एकांकिका सादर करताना सांस्कृतिक विभागाचे विद्यार्थी.




दि. २० डिसेंबर, २०२१ रोजी कुमार स्वामी महाविद्यालय, औसा येथे
दयानंद कला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी क्रॉस कंट्रीमध्ये जनरल चॅम्पियनशिप पटकावली.



११ डिसेंबर, २०२१ रोजी दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथे पावर लिफ्टिंग, वेटलिफ्टिंग,
बेस्ट फिजिक्स या तिन्ही स्पर्धांमध्ये दयानंद कला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी
जनरल चॅम्पियनशिप घेऊन धवघवीत यश प्राप्त केले.



मळवटी येथील ट्वेंटी-वन साखर कारखान्यास दयानंद कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भेट देवून साखर निर्मितीची प्रक्रिया समजून घेतली. याप्रसंगी सोबत प्रा. दिनेश जोशी, प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. डॉ. गोपाल बाहेती.



'आजादी का अमृत महोत्सवा'निमित्त संगीत विभागाच्या वतीने ऐतिहासिक किल्ला नळदूर्ग येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन केले.




ग्रंथालय विभागाच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ऑक्टोबर, २०२१ रोजी 'वाचन प्रेरणा दिन' आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड तसेच उपप्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक प्रा. दिलीप नागरगोजे, ग्रंथपाल प्रा. अपर्णा पसारकर.



अर्थवेध शोधनिबंध प्रकाशित करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, विचारमंच कोल्हापूरचे अध्यक्ष प्रा. डॉ. शरद शेटे, प्रा. डॉ. बालाजी घुटे, उपप्राचार्य प्रा. अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे, प्रा. दिनेश जोशी,

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

# वेध


**: प्रकाशक :**

प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड

**: मुख्य संपादक :**

डॉ. बालाजी घुटे

**: सहसंपादक :**

डॉ. अंकुशकुमार चव्हाण

डॉ. रामेश्वर खंदारे

डॉ. सुभाष कदम

प्रा. विवेक झंपले

प्रा. दुर्गा शर्मा

डॉ. मीना घुमे

प्रा. सुरेश क्षीरसागर

**: विद्यार्थी संपादक मंडळ :**

श्री. माधव शिंदे (मराठी विभाग)

कु. मानसी गायकवाड (हिंदी विभाग)

कु. साधना भोसले (इंग्रजी विभाग)

श्री. भरत पवार (सामाजिकशास्त्रे विभाग)

**: मांडणी व सजावट :**

श्री मल्टि सर्व्हिसेस, लातूर

**: मुद्रक :**

आर्टी ऑफसेट, लातूर


---


या अंकात प्रकाशित झालेल्या विचारांशी, मतांशी प्रकाशक, महाविद्यालय, संपादक मंडळ व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय

वेध वार्षिक अंक विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याला वाव देणारे त्यांचे स्वत:चे व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्याची मोठी पर्वणी म्हणजे 'वेध' होय. वार्षिक अंक हा एक प्रकारे महाविद्यालयाचा आरसा असतो की ज्यात विद्यार्थ्यांवर झालेले संस्कार विविध उपक्रमाच्या माध्यमातून होत असतात. जसे एकता व अनुशासन, श्रमप्रतिष्ठा, कलाविष्कार, खिलाडूवृत्ती, पर्यावरण प्रेम व मानवतावाद या सर्व मुल्यांचा विकास महाविद्यालयात वर्षभर विविध उपक्रमांच्या माध्यमातून होत असतो, याचे सर्व इतिवृत्त 'वेध'च्या माध्यमातून उमटताना दिसते.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा 'वेध' म्हणजे कोरोनापश्चात महाविद्यालये सुरू झाल्यानंतरचा अंक होय. विद्यार्थ्यांना बरीचसी ऑनलाईन अध्यापनाची सवय झालेली ती या शैक्षणिक वर्षात ऑफलाईनकडे वळली. ऑनलाईन वस्तुनिष्ठ परीक्षा पद्धतीकडून ऑपलाईन विश्लेषणात्मक परीक्षा पद्धती स्वीकारण्यात आली. विद्यार्थ्यांना त्यामुळे दोन्ही पद्धतीचा अनुभव घेता आला. विद्यार्थ्यांनी कोरोना काळातही 'वेध'शी आपले नाते अतूट ठेवले.

चालू शैक्षणिक वर्ष म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष. आपल्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या ७५ वर्षात भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, रीतीरिवाज यामध्ये झालेले बदल व परिवर्तन तसेच त्या परिवर्तनाचा सर्वच प्रकारच्या व्यवस्थेवर झालेला सकारात्मक व नकारात्मक परिणाम यावर विद्यार्थ्यांनी अभिव्यक्त व्हावे अशी व्यवस्थापन, प्राचार्य व संपादक मंडळ यांची भावना होती. विद्यार्थ्यांना लिखाणासाठी 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' ही या वर्षीच्या वार्षिक अंकाची मध्यवर्ती कल्पना म्हणून स्वीकारण्यात आली. गेल्या ७५ वर्षात देशात अनेक सकारात्मक बाबी घडल्या. अनेक क्षेत्रात क्रांतीकारक अशी प्रगती करून त्या त्या क्षेत्रात मैलाचे दगड भारताने स्थापित केले आहेत. कृषी, अवकाश संशोधन, सॉफ्टवेअर अशा अनेक क्षेत्रात भारताने उत्तुंग भरारी घेतली आहे. आज भारतीय अर्थव्यवस्थेसमोर काही महत्त्वाची आव्हाने सुद्धा उभी आहेत. बेरोजगारी, आर्थिक विषमता, गरीबी, वाढती लोकसंख्या या आव्हानांचा मुकाबला करण्याची क्षमता आमच्या युवा पिढी व भावी नागरीक असणाऱ्या आमच्या विद्यार्थ्यांमध्ये यावी, महाविद्यालयीन युवकांमध्ये नवविचार, नवनिर्मिती व नवप्रवर्तनाचे एक स्पंदन असते की जे अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देश उभारणीमध्ये एक आशेचा किरण असेल. स्वातंत्र्यचा अमृत महोत्सवानिमित्त या युवकांमध्ये देशाप्रति एक नवचैतन्य निर्माण करता यावे. राष्ट्राभिमान, राष्ट्रभक्ती अधिक वाढत जावी तसेच सकारात्मक व नकारात्मक बाजूने विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होता यावे यासाठी उपरोक्त विषयाची मध्यवर्ती कल्पना म्हणून निवड करण्यात आली.

देशामध्ये घडत असलेल्या चालू सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा परिणाम विद्यार्थी मनावर निश्चितपणे होत असतो. त्यातून आपल्या देशासमोर अमृत महोत्सवी वर्षात असणाऱ्या समस्या व प्रश्न याचे नक्की भान विद्यार्थ्यांना येत असते. महाविद्यालयीन विद्यार्थी हा सर्व प्रकारच्या परिवर्तनाचा केंद्रबिंदू असतो. देशात घडत असणाऱ्या प्रत्येक घडामोडींवर तो सर्व प्रकारच्या माध्यमातून व्यक्त होत असतो. सध्या तर सोशल मिडीया हा इतर सर्व माध्यमांपेक्षा प्रभावी व गतिमान आहे. त्यावर आजचा तरूण वर्ग खुप मोठ्या प्रमाणात अभिव्यक्त होत असतो. या अमृत महोत्सवी वर्षात देशापुढील विविध आव्हानांना समोर ठेवून तो प्रभावीरित्या अभिव्यक्त झाला आहे. याचा अर्थ तो देशासमोरील समस्यांचा अनुषंगाने साद, संवाद साधत आहे. स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवी वर्षात हा संवाद एका सकारात्मक दिशेने जाताना दिसतो आहे; ही एक मोठी सकारात्मक बाब आहे.

दयानंद शिक्षण संस्थेचे दयानंद कला महाविद्यालय म्हणजे गुणवत्तेची खाण असलेले महाविद्यालय आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त वर्षभर विविध उपक्रम व कार्यक्रम घेण्यात आले. त्यातील निवडक कार्यक्रमाचे इतिवृत्त प्रस्तूत अंकात करण्यात आले आहे. विविध स्पर्धा, स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार, तिरंगा यात्रा अशा विविध आयोजनद्वारे राष्ट्रप्रेमाची ज्योत कायम तेवत राहील असे कार्यक्रम व उपक्रम घेण्यात आले. उपरोक्त विषयाच्या निवडीसाठी संस्था व्यवस्थापन, प्राचार्य यांनी स्वीकृती देऊन संपादक मंडळास खंबीर पाठिंबा दिला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने स्वातंत्र्य हे चिरायु होवो ही भावना व्यक्त करून देशवासियांना स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ह्रदयातून कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा!

**डॉ. बालाजी घुटे,**
मुख्य संपादक

## दयानंद शिक्षण संस्था, लातूर

## : नियामक मंडळ व विश्वस्त मंडळ :

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. लक्ष्मीरमणजी बंकटलालजी लाहोटी | अध्यक्ष |
| २. | श्री. अरविंदराव माणिकराव सोनवणे | उपाध्यक्ष |
| ३. | श्री. ललीतभाई कस्तुरचंदजी शाह | उपाध्यक्ष |
| ४. | श्री. रमेशकुमार रामगोपालजी राठी | उपाध्यक्ष |
| ५. | श्री. रमेश गोविंदलालजी बियाणी | सचिव |
| ६. | श्री. सुरेश इंद्रचंद्रजी जैन | संयुक्त सचिव |
| ७. | श्री. रामराव शंकरराव पाटील | सहाय्यक सचिव |
| ८. | ॲड. श्रीकांत तमणप्पा उटगे | सहाय्यक सचिव |
| ९. | श्री. संजय तेजमलजी बोरा | कोषाध्यक्ष |
| १०. | श्री. डॉ. चेतन रामकुमारजी सारडा | सदस्य |
| ११. | श्री. आशिष चंद्रशेखरजी बाजपाई | सदस्य |
| १२. | श्री. दिनानाथ नारायणदासजी भुतडा | सदस्य |
| १३. | श्री. मकरंद भालचंद्रजी सावे | सदस्य |
| १४. | श्री. रवींद्र ईश्वरप्रसादजी राठी | सदस्य |
| १५. | श्री. दिनेश मुरलीधरजी इन्नानी | सदस्य |
| १६. | श्री. बालकिशन परसरामजी बांगड | सदस्य |
| १७. | श्री. अजिंक्य अरविंदराव सोनवणे | सदस्य |
| १८. | श्री. विशाल लक्ष्मीरमणजी लाहोटी | सदस्य |
| १९. | श्री. प्रणव प्रदीप शहा | सदस्य |
| २०. | श्री. हरिशिन रंगलालजी मालू | सदस्य |
| २१. | श्री. ज्ञानोबा निवृत्ती शेळके | सदस्य |
| २२. | श्री. सुदर्शन गोविंदलालजी भांगडीया | सदस्य |
| २३. | श्री. सिद्धेश्वर मन्मथप्पा कोरे | सदस्य |
| २४. | श्री. उमाकांत नागनाथप्पा केराळे | सदस्य |
| २५. | श्री. विशाल रमेशचंद्रजी अग्रवाल | सदस्य |
| २६. | ॲड. माधव तुकारामजी इंगळे | सदस्य |
| २७. | श्री. सागर गोपाळ मंत्री | सदस्य |
| २८. | श्री. अशोक विजयकुमार पाटील | सदस्य |
| २९. | श्री. दत्तात्रय मन्मथअप्पा लोखंडे | स्विकृत सदस्य |
| ३०. | श्री. नरेशकुमार सोमनाथ पंड्या | स्विकृत सदस्य |
| ३१. | प्राचार्य डॉ. जे. एस. दरगड | पदसिद्ध सदस्य |

## : विश्वस्त मंडळ :

श्री. सतीषचंद्रजी चंद्रकांतजी चापसी ..............................सदस्य
श्री. शांतीलालजी बिरदीचंदजी कुचेरिया...........................सदस्य
श्री. शशीकांतजी बाळकृष्णजी कोटलवार .........................सदस्य
श्री. विशालजी लक्ष्मीरमणजी लाहोटी.............................सदस्य

## : महाविद्यालय विकास समिती :

श्री. लक्ष्मीरमणजी बंकटलालजी लाहोटी..........................अध्यक्ष
श्री. ललीतभाई कस्तुरचंदजी शाह.................................सदस्य
श्री. रामराव शंकरराव पाटील .....................................सदस्य
श्री. सिद्धेश्वर मन्मथअप्पा कोरे ..................................सदस्य
श्री. विशाल रमेशचंद्रजी अग्रवाल ................................सदस्य
श्री. नयनकुमार द्वारकादास नावंदर................................सदस्य
श्री. चैतन्य शामसुंदर भार्गव.......................................सदस्य
श्री. रविंद्र हेमंतकुमार व्होरा.......................................सदस्य
श्री. रमेश गोविंदलालजी बियाणी .................................संस्था पदसिद्ध सचिव
प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड..................................पदसिद्ध सचिव
प्रा. डॉ. सुनील साळुंके..........................................IQAC समन्वयक
प्रा. डॉ. प्रशांत मान्नीकर .........................................विभागप्रमुख प्रतिनिधी
प्रा. डॉ. प्रदीप सूर्यवंशी..........................................शिक्षक प्रतिनिधी
प्रा. डॉ. सुनिता सांगोले .........................................शिक्षक प्रतिनिधी
प्रा. डॉ. मच्छिंद्र खंडागळे .......................................शिक्षक प्रतिनिधी
श्री. नवनाथ भालेराव.............................................प्रशासकीय कर्मचारी प्रतिनिधी

## : शालेय समिती :

श्री. ललीतभाई कस्तुचंदजी शाह..................................अध्यक्ष
श्री. रामराव शंकरराव पाटील .....................................सदस्य
श्री. उमाकांत नागनाथअप्पा केराळे ...............................सदस्य
श्री. दत्तात्रय मन्मथअप्पा लोखंडे..................................सदस्य
श्री. नरेशकुमार सोमनाथ पंड्या ..................................सदस्य
श्री. रमेश गोविंदलालजी बियाणी .................................संस्था पदसिद्ध सचिव
डॉ. शिवाजी गायकवाड ..........................................प्राचार्य
प्रा. अनिल माळी ................................................उपप्राचार्य
डॉ. दिलीप नागरगोजे.............................................शिक्षक प्रतिनिधी

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| **मराठी विभाग** | | | ८ |
| १. | स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीचे बदलते जीवन | कु. वाघमारे प्रतिक्षा | ९ |
| २. | ७५ वर्षातले स्त्री स्वातंत्र्य : सत्य आणि विपर्यास | कु. तलवारे रचना | ११ |
| ३. | स्वातंत्र्योत्तर काळातील भारताचे परराष्ट्र धोरण | कल्याणकर रमेश | १४ |
| ४. | स्वतंत्र भारताची वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती | कु. विभुते सुमित्रा | १६ |
| ५. | स्वातंत्र्याने मला काय दिले! | कु. तांदुळे सुरेखा | १८ |
| ६. | स्वतंत्र भारताची शैक्षणिक प्रगती | कु. देशपांडे वैष्णवी | २२ |
| ७. | स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक परिवर्तन | कु. गायकवाड पुनम | २४ |
| ८. | स्वातंत्र्योत्तर काळातील सांस्कृतिक प्रगती | शिंदे माधव | २७ |
| **सामाजिकशास्त्रे विभाग** | | | २९ |
| १. | भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि परराष्ट्रीय धोरण | कु. शिंदे श्रद्धा | ३० |
| २. | भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल | कु. गवळी प्राजक्ता | ३३ |
| ३. | स्वातंत्र्याची ७५ वर्षे आणि विनिमय व्यवस्था | कु. गाडे वैष्णवी | ३६ |
| ४. | स्वतंत्र भारताच्या कृषी व्यवस्थेची ७५ वर्षे | कु. चिकटे तनुजा | ३८ |
| ५. | स्वतंत्र भारत आणि परराष्ट्र धोरणाची वाटचाल | कु. सोळुंके तनुजा | ४० |
| ६. | भारताची सामाजिक वाटचाल | कु. सारडा रूपाली | ४२ |
| ७. | भारताची राजकीय वाटचाल | कु. बदमे वैष्णवी | ४५ |
| ८. | भारताची आर्थिक वाटचाल | सय्यद इम्रोज निसार | ४७ |
| ९. | स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक क्षेत्राचा विकास | कु. पाटील मयुरी | ४९ |
| १०. | भारतीय स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी | कु. भोसले अपर्णा | ५२ |
| ११. | आम्ही भारतीय व अमृत महोत्सव | कु. मगर प्रिती | ५४ |
| १२. | भारताची सांस्कृतिक वाटचाल | कु. डावरे मानसी | ५८ |
| १३. | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि वनीकरण | कु. जटाळ चंदाराणी | ६० |

**हिंदी विभाग** ६३

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स्वतंत्रता एक पहल | कु. वाघमारे आरती | ६४ |
| २. | आजादी का अमृत महोत्सव | कु. वाघमारे आरती | ६६ |
| ३. | आत्मनिर्भरता का अमृत महोत्सव | कु. सय्यद आलिमा तब्बसुम | ६७ |
| ४. | आजादी के बाद हिन्दी का वैश्विक परिदृष्य | कु. पठाण आसमा कलीम | ७१ |
| ५. | राजनिती के युवक | शेख मुख्तार | ७३ |
| ६. | युवाओं के बढते कदम | माने शुभम | ७५ |
| ७. | आजादी की उपलब्धियाँ | कु. पठाण नसिमा | ७७ |

**English Section** 79

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | India's Culture : Something Different | Naik Pratuksh | 80 |
| 2. | Than Chance | Pathan Wasim | 81 |
| 3. | Azadi Ka Amrit Mahotsav | Miss. Tagalgave Deepali | 82 |
| 4. | Fitness Matnra | Pathan Wasim | 84 |
| 5. | 75th Independence Day | Miss. Thakur Radhika | 85 |
| 6. | 75 Independence Day and Politics | Miss. Fase Pranali | 87 |
| 7. | Indians Did It | Miss. Takre Rajani | 88 |
| 8. | 75th Independence Day & Political Condition | Miss. Khalangre Deepika | 89 |
| 9. | Independence Day | Miss. Jadhav Lakshmi | 91 |
| 10. | About Fighter India & It's Culture | Miss. Dixit Ankita | 93 |
| 11. | Entrenchment of the Case System in India | Miss Gurav Shraddha | 95 |
| 12. | Journey of India from Independence | Miss. Takre Rajani | 97 |

**विविध विभागांचे अहवाल** ९८

**दयानंद गुणवत्ता शिष्यवृत्ती व पारितोषिके** १२३

# मराठी विभाग



# स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीचे बदलते जीवन

**कु. वाघमारे प्रतिक्षा**
बी.ए. प्रथम वर्ष

विसाव्या शतकात स्त्री जीवनात मोठ्या प्रमाणात बदल झाले; त्याचे मुख्य कारण म्हणजे तिला सापडलेला मनाचा प्रकाश. फुले, आंबेडकर, कर्वे आणि इतर अनेकांच्या प्रयत्नांतून तिला विद्यालयाची कवाडे उघडी झाली. पाटी-पेन्सिल हातात घेतलेल्या स्त्रीने अगदी अल्प काळात विद्यापीठाच्या अंतिम परीक्षाही पार केल्या. आज एकविसाव्या शतकात



प्रत्येक क्षेत्रात प्रत्येक कसोटीत स्त्री पुढे आहे. कोणतेही काम तिला अशक्य राहिले नाही. राजकारण, समाजकारण, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान अशा सर्व क्षेत्रात तिने यशस्वी भरारी घेतली आहे. परंतु हे झाले असामान्य स्त्रीबाबत. सर्वसामान्य स्त्रीबाबत काय आढळते? ती सुद्धा सुविद्ध झाली, जागृत झाली आहे. तिला आत्मभान झाले आहे. तिच्या स्वत:च्या मनाची जाणीव झाली आहे, आपले घर आपली मुले याबाबत ती स्वत:चे मत राबवते आहे.

आजच्या स्त्रीने एक सत्य जाणले आहे. आता ती कोणावरही अवलंबून राहू इच्छित नाही. ती जास्तीत जास्त स्वावलंबी होऊ इच्छिते. नोकरीबरोबर उद्योग, व्यापार क्षेत्रातही ती आपले कर्तृत्व दाखवत आहे. अगदी घरात राहणारी स्त्री देखील आपल्या फुरसतीच्या काळात काहीना काही काम करून अर्थार्जन करते. एकेकाळी स्वयंपाकाची कामे करणे, मुले सांभाळणे ही कामे कमी प्रतीची मानली जात; पण बदलत्या काळानुसार पोळी-भाजीचे दुकान चालवणारी स्त्री स्वयंपाकी नव्हे तर उद्योजिका मानली जात आहे. कामाप्रमाणेच स्त्रीने आपल्या राहणीमानात आपल्या पोशाखात बदल केला आहे, परंतु तो आता कुणाला खटकत नाही. साडीपेक्षा सलवार वा टॉप हे पोशाख अधिक सुटसुटीत व सोयीचे वाटतात. आजची स्त्री आपल्या स्वत:विषयी जागरूक आहे. यासाठी आवश्यक व्यायाम ती करते. आजच्या छोट्या कुटुंबात मुलगा व मुलगी यांच्या संगोपनात फरक केला जात नाही. शहरातील ही विचार परंपरा हळूहळू खेड्यापर्यंत झिपरत आहे. विज्ञानामुळे जग जवळ आले आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात घडणाऱ्या घटना स्त्रीला समजतात आणि त्याप्रमाणे स्वत:ला बदलण्याचा प्रयत्न ती करीत आहे. आजच्या युगातील स्त्री ही विचारी आहे. ती काळानुसार बदलू पहात आहे. गेल्या शतकातील स्त्री आणि आजची स्त्री यात महदंत आहे. आजच्या स्त्रीचा मार्ग विकासाकडे, प्रगतीकडे आणि वैभवाकडे जातो आहे.

स्त्रियांची बुद्धिमत्ता ही निसर्गत:च असते असं खुद्द महाकवी कालीदासांनी म्हटले आहे. असे असूनही, 'बायकांना काय कळतं?' असे बोलून मोकळे होणारे असंख्य लोक समाजात वावरताना दिसतात. केवळ पुरुषप्रधान विचारांची लोकंच अशी वक्तव्य करू शकतात. आजची स्त्री ही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून समाजात बरोबरीने उभी राहणारी स्त्री आहे. आज स्त्रियांना खूप महत्त्व प्राप्त झाले आहे.

• • • •

# ७५ वर्षातले स्त्री स्वातंत्र्य : सत्य आणि विपर्यास

**कु. तलवारे रचना शंकरराव**
एम.ए. द्वितीय वर्ष

स्त्री किती प्रमाणात स्वतंत्र आहे? तिला निर्णय स्वातंत्र्य आहे? ती हिंसेला नाही म्हणू शकते? स्वत:ची पिळवणूक होऊ न देता ती काम करू शकते? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आपल्याला द्यावी लागणार आहेत.

स्वातंत्र्यानंतरच्या जवळजवळ सत्तर वर्षांच्या काळात भारतीयांच्या एकंदर आयुष्यात मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत. त्यातही थोडे अधिक बदल स्त्रियांच्या आयुष्यात झाले आहेत. त्यांच्या साक्षरतेत वाढ झाली आहे आणि त्याचाच परिणाम त्यांच्या प्रगतीवरही झालेला आहे. स्त्रियांचे विविध स्तरांतील, विविध विषयांवरचे काम आता जगासमोर यायला लागले आहे. त्यांना आपल्या कर्तव्याबरोबरच येणाऱ्या हक्कांची जाणीवही होऊ लागली आहे. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध, त्यांना न्याय मिळण्यासाठी नवीन कायदे केले जात आहेत. या साऱ्यामुळे जसजसा बदल एकूण स्त्रियांमध्ये होतो आहे, त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात होतो आहे. त्याचे प्रतिबिंब समाजावरही पडलेले दिसते. मात्र हे सारे घडले आहे, मूठभर स्त्रियांच्या आयुष्यात आणि त्यांच्याच छोट्याशा परिघात. भारतीय राज्यघटना समानतेवर आधारलेली असली, त्यात लिंगभेद, वर्णभेद आणि वर्णभेदाला जागा नसली तरी प्रत्यक्षात तसे दिसत नाही. समानता अस्तित्वात नाही हे वास्तव इतके स्पष्ट आहे की ते सिद्ध करून दाखवण्याची गरज नाही. स्त्रियांचे स्थान कुटुंबात आणि पर्यायाने समाजातही गौण आहे.

संपूर्ण देशात केलल्या एका पाहणीत स्त्रियांना सामोरे जावे लागणाऱ्या हिंसेसंदर्भात काही माहिती गोळा करण्यात आली. इतकी खासगी आणि संवेदनशील माहिती स्त्रिया एका अनोळखी व्यक्तीला देत असतील का? कदाचित सगळ्या देत नसतीलही. त्यामुळे पाहणीत दिसणारे आकडे नि:संशय कमी आहे. हिंसा याहून अधिक प्रमाणात होत असणार याची शक्यता आहे. परंतु किमान इतक्या स्त्रिया हिंसेला सामोरे जात आहेत हे तरी कळले. मिळालेल्या आकड्यांचे महत्त्व यासाठी की, किमान त्या मोकळेपणाने बोलल्या.

स्वत:ला असणारी समस्या स्वत: जवळच मान्य करणे, त्याविषयी इतर कोणाशी तरी बोलणे, चर्चा करणे हे समस्येवरील उत्तर शोधण्याची पहिली पायरीच समजायला हरकत नाही.

हिंसेची माहिति गोळा केल्यानंतर असे लक्षात आले की, दर तीन पैकी किमान एकीला, वयाची पंधरा वर्षे पूर्ण केल्यानंतर मारहाण किंवा शारीरिक इजेचा अनुभव आला आहे. सर्व्हे क्षणापूर्वीच्या एका वर्षात अशा घटना ३८% स्त्रियांच्या आयुष्यात घडल्या आहेत. हे आकडे अजिबात उत्साहवर्धक नाहीत; कारण यापूर्वी अशाच प्रकारे झालेल्या पाहणीतून आलेल्या आकड्यांपेक्षा हे जास्त आहेत.

एकीकडे स्त्रियांची प्रगती होते आहे, त्यांचे शिक्षण वाढते आहे, शिकणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण वाढते आहे. मग हे आकडे असे का दिसतात? खरेच स्त्रियांना होणारी मारहाण, इजा वाढते आहे का? की हे आकडे आणखी काही सांगतात? म्हणजे असे होते आहे का की, स्त्रिया त्यांच्या शिक्षणामुळे त्यांना मिळत असणाऱ्या एक्सपोजरमुळे अधिक प्रांजळ झाल्या आहेत. आपल्याला येत असलेल्या अनुभवाकडे अधिक तटस्थतेने पाहू लागल्या आहेत आणि त्यामुळे आलेला अनुभव सांगून मोकळ्या होत आहेत. याचे नेमके उत्तर आपल्याला या पाहणीतून मिळत नाही. परंतु विचार करायला मात्र प्रवृत्त करणे हे समस्या मान्य करणे आणि अनुभव कथन करणे हे उतत्र शोधण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल असेल तर आकडे वाढले असले तरी वाटचाल योग्य मार्गाने सुरू आहे आणि तसे नसेल तर मात्र परिस्थिती काळजी करण्यासारखी आहे.

शारीरिक इजेबरोबरच या सर्वेक्षणात लैंगिक आणि भावनिक हिंसेबद्दलही माहिती आहे. स्त्रियांच्या मनाविरुद्धचा केलेला लैंगिक व्यवहार ही एक प्रकारची हिंसाच असल्याचे यात मानले आहे. तसेच मानहानीकारक, मनाला लागेल असे बोलणे, टोमणे मारणे हा भावनिक हिंसाचार समजला आहे. त्यानुसार १०% स्त्रियांनी लैंगिक हिंसेचा तर १६% स्त्रियांनी भावनिक हिंसेचा अनुभव आल्याची माहिती दिली आहे. या दोन्ही हिंसांचे प्रमाण शारीरिक हिंसेपेक्षा कमी आहे. कदाचित विवाहित स्त्रियांच्या आयुष्यात या आणि अशा गोष्टी पुष्कळदा घडत असल्याने त्याला हिंसा म्हणून नमूद करायला हवे असे अनेकींना वाटले नसावे. कारण दिलेल्या व्याख्येनुसार त्या हिंसांचे प्रमाण कितीतरी जास्त असणार यात शंका नाही. शारीरिक हिंसा ही फारच ठळक असते. त्यामानाने भावनिक हिंसा अधिक सूक्ष्म स्तरावर होत असते. तिन्ही प्रकारच्या हिंसांच्या माहितीचे विश्लेषण करताना समोर आलेल्या बाबी म्हणजे हिंसा शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात जास्त आहे. तसेच जसजशी आर्थिक स्थिती सुधारत जाते, शिक्षण वाढत जाते तसतशी हिंसा कमी होत जाते. शिवाय एकंदरीत स्त्रियांना त्रास देण्याचे प्रमाण एकत्र कुटुंबात विभक्त कुटुंबाच्या तुलनेने कमी आहे. याचाच अर्थ ग्रामीण भागात, विभक्त कुटुंबात

राहणारी अशिक्षित आणि गरीब स्त्री सर्वात जास्त प्रमाणात हिंसेला बळी पडते. पुन्हा एकदा स्त्रियांच्या संदर्भात विचार करताना त्यांनी शिक्षण घेण्याची किंवा खरे तर शक्य तितके अधिक उच्च शिक्षण घेण्याची आवश्यकता अधोरेखित होते. शिवाय घरी इतर माणसे असतील आणि तिला कुटुंबाचा आधार असेल तर ती जास्त सुरक्षित राहील. हिंसा होताना त्यात दुसरी व्यक्ती आणि या ठिकाणी बऱ्याच वेळेला तर प्रत्यक्ष नवरा सहभागी असतो. कित्येक वेळेला स्त्रिया असहाय्य असतात. तर कधी काही कारणांमुळे प्रतिकार करू शकत नाहीत. याचाच अर्थ प्रत्यक्ष हिंसा होणे त्यांच्या हातात नसते. पूर्वी जरी स्त्रियांनी अशी हिंसा मान्य केलेली असली तरी आता हिंसा मान्य नसणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण वाढल्याचे याच पाहणीतून दिसून येते. पुरुषांच्या तुलनेत मिळणारे दीर्घ आयुष्य अधिक जगण्यायोग्य करून त्याप्रमाणे पूर्ण क्षमतेने जगणे सर्वच स्त्रियांसाठी फार महत्त्वाचे आहे. वाढलेले आयुर्मान हे त्यांच्या अधिक चांगल्या आयुष्याकडे चाललेल्या वाटचालीची एक महत्त्वाची पायरी आहे. किमान काही विशिष्ट स्तरात तरी शिक्षण वाढते आहे. ज्ञानाच्या कक्षा रूंदावत आहेत, हळूहळू स्वत्वाची जाणीवही रूजायला सुरुवात झाली आहे. तरीही त्यांना अजून बराच लांबचा पल्ला गाठायचा आहे; कारण भारतातील बहुसंख्य स्त्रियांच्या संदर्भात काही प्रश्न अजूनही उत्तराच्या प्रतीक्षेत आहेत.



# स्वातंत्र्योत्तर काळातील भारताचे परराष्ट्र धोरण

**कल्याणकर रमेश रघुनाथ**
एम.ए. द्वितीय वर्ष

स्वतंत्र भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची स्थुल जडणघडण स्वातंत्र्यपूर्ण काळातच झाली. अखिल भारतीय काँग्रेसने आंतरराष्ट्रीय प्रश्नासंबंधी वेळोवेळी स्वीकारलेल्या धोरणातूनच ते उत्क्रांत झाल्याचे दिसून येते. हे बऱ्याच अंशी त्याच्या राजकीय अनुभवातून साकारले आहे. स्वातंत्र्यापूर्वीच काँग्रेसने आंतरराष्ट्रीय प्रश्नासंबंधी अनेक ठराव संमत केलेले होते. ब्रह्मदेश इंग्रजांनी जिंकल्याबद्दल असंतोष व्यक्त करण्यात आला (१८८५). ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी कारवायांसाठी भारताचा तळ म्हणून वापरण्यास हरकत घेण्यात आली.

काँग्रेसचे हे साम्राज्यविरोधी धोरण पहिल्या महायुद्धानंतर अधिकच स्पष्ट झाले. इंग्रजांच्या खलिफाविरोधी धोरणांचा निषेध म्हणून भारतात खिलाफत चळवळ सुरू करण्यात आली. १९२० मध्ये आयरिश लोकांच्या स्वातंत्र्य लढ्यास पाठींबा देण्यात आला. तर १९२८ मध्ये इजिप्त, सिरिया, पॅलेस्टाईन आणि इराक यांचे त्यांच्या साम्राज्याविरोधी संघर्षाबद्दल अभिनंदन करण्यात आले. भारताचे हे धोरण स्वातंत्र्यानंतरही नेटाने चालविले गेले. भारत स्वत: ब्रिटीश साम्राज्यवादाचा बळी असल्यामुळे यासंबंधी त्याच्या नेत्यास वाटणारी तळमळ स्वाभाविक आहे. भारतीय नेत्यांचा साम्राज्यवादाचा अनुक्रम हा पाश्चिमात्य देशापुरताच मर्यादित असल्याने साम्राज्यवादाचा संबंध त्यांनी फक्त पाश्चात्य देशाशी लावणे समजू शकते. स्वातंत्र्योत्तर काळात प्रामुख्याने संयुक्त राष्ट्रात ठराव संमत करून घेऊन इंडोनेशिया, मोरोक्को, अल्जेरिया इत्यादी आफ्रिकी आशियाई देशांच्या मुक्तीसाठी वातावरण तयार करण्यात भारताने उल्लेखनीय कामगिरी बजावली. या भूमिकेतूनच १९५३ मध्ये इंग्लंड व फ्रान्स यांनी सुएझ कालव्यासंबंधी केलेल्या सैनिकी हस्तक्षेपास भारताने विरोध केला.



नेहरूंचे चरित्रकार मायकेल ब्रेशर यांच्या

मते नेहरू हे भारतीय परराष्ट्रीय धोरणांचे शिल्पकार होत. इतकेच नव्हे तर परराष्ट्रीय धोरण ही त्यांची मक्तेदारी होती. एका अर्थाने हे खरे आहे. काँग्रेसने १९२८ मध्ये परराष्ट्रीय धोरणासाठी स्वतंत्र विभाग सुरू केल्यापासून त्याची धुरा पंडितजी अखेरपर्यंत सांभाळत होते. देशातील राजकीय पक्ष व एकसार लोकमत यांच्यातही नेहरूंच्या धोरणाविषयी सर्वसाधारण मतैक्य होते.

पाकिस्तानसंबंधीच्या धोरणाविषयी मात्र कधीकधी मतभेद व्यक्त होत. लोकसभेतही हंगेरीतील पेचप्रसंग, तिबेटचे चीनने केलेले सामिलीकरण सोडता १९५९ पर्यंत नेहरूंच्या धोरणांवर फारशी टीका झालेली दिसत नाही. देशातील राजकीय पक्ष व एकंदर लोकमत यांच्यातही नेहरूंच्या धोरणांविषयी सर्वसाधारण मतैक्य होते. लोकसभा, पक्ष, उच्च नोकरवर्ग, लष्करी अधिकारी या सर्वांनी नेहरूंच्याच दृष्टीतून परराष्ट्रीय धोरणाकडे पाहिले. तथापि स्वत: नेहरूंनी मात्र यासंबंधी सर्व श्रेय स्वत:कडे घेण्याचे नाकारले.

आपल्या जागी दुसऱ्या कोणीही हेच धोरण स्वीकारले असते; कारण ते भारताच्या परिस्थितीनेच ठरले आहे असे ते म्हणत. भारतातील अभिजन वर्गाचे व नेहरूंचे जीवनानुभव आणि त्यावरील वैचारिक प्रभाव हे सारखेच असल्यामुळे नेहरू परराष्ट्रीय धोरणापुरते तरी भारतीय विचारांचे प्रतिनिधित्व करीत होते असे म्हणता येईल. भारताची भौगोलिक स्थिती, रशिया व चीनशी असलेले निकटत्व लक्षात घेता शितयुद्धाच्या संदर्भात त्यांनी स्वीकारलेली तटस्थतेची भूमिका स्वाभाविक वाटते. एकीकडे भारताचे आर्थिक मागासलेपण दूर करण्यासाठी आणि समताधिष्ठिता स्थापन करण्यासाठी रशियाच्या आदर्शाविषयी वाटणारे आकर्षण, तर दुसरीकडे पाश्चात्य उदारमतवादाच्या भारतीय नेतृत्वावरील पगडा या दोन ध्रुवातून मार्ग काढण्यासाठीही अलिप्तवादी धोरण भारतास स्वीकारार्ह वाटले असावे.

भारतातील लक्षणीय मुस्लिम लोकसंख्या त्यांच्या धार्मिक निष्ठा आणि खनिज तेलाविषयी भारताचे परावलंबित्व लक्षात घेता, मध्य अशियात भारताने अरब देशास अनुकूल धोरण स्वीकारले यात नवल नाही. धोरणाचे समर्थन करण्यासाठी कितीही मोठमोठी तत्त्वे सांगितली, तरी अखेरीस देशहिताच्या दृष्टीतूनच परराष्ट्रीय धोरण ठरवावे लागते असे नेहरूंनी म्हटले आणि हे हित कोणते हे ठरविण्याबाबत नेहरूंचे नेतृत्व सर्वांनी मान्य केल्याचे दिसते.

नेहरूनंतरच्या कालखंडात वेगळा परराष्ट्र मंत्री जरी नेमण्यात आला तरीही या क्षेत्रात तत्कालीन पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालीच झाल्या. परराष्ट्रीय धोरणाची समीक्षा करण्यात मंत्रिमंडळाने आणि संसदेने या काळात जास्त भाग घेतला. महावीर त्यागी यांनी १९६६ मध्ये तर अशोक मेहता यांनी १९६८ मध्ये आपला विरोध व्यक्त करण्याकरिता मंत्रिमंडाळाचा राजीनामा दिला होता हेही विसरून चालणार नाही.

# स्वतंत्र भारताची वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती

**कु. विभुते सुमित्रा यादव**
एम.ए. द्वितीय वर्ष

एकच तारा समोर
आणिक पायतळी अंगार
गर्जा जयजयकार क्रांतीचा
गर्जा जयजयकार

कवी कुसुमाग्रज यांनी केलेल्या या आवाहनाचे सार्थक होण्यास १५ ऑगस्ट १९४७ चा दिवस उजाडला. पक्षी पिंजऱ्यातून उडाला. स्वातंत्र्याची रम्य प्रभात झाली. असंख्य बलिदानांचे सार्थक झाले आणि भारताला पारतंत्र्यातून मुक्तता मिळून स्वातंत्र्य मिळाले. बघता-बघता स्वातंत्र्याचा प्रवास ७५ वर्षांचा होत आहे... आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. एखाद्या राष्ट्राच्या जीवनात ७५ वर्षांचा कालखंड हा जरी फार मोठा टप्पा नसला तरी राष्ट्रातील नागरिकांच्या जीवनात स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण करणे अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपली स्वातंत्र्याविषयी कोणती स्वप्ने होती? स्वातंत्र्याकडून आपल्या कोणत्या अपेक्षा होत्या? आज सत्य काय आहे? कुठे होतो आपण आणि आता कुठे आहोत? उणिवा काय राहिल्या आणि आता भविष्यात कशी पावले उचलावी लागतील? याचा विचार आपल्याला करायला लागेल. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवात आपण काय कमावलं आणि काय गमावलं याचे सिंहावलोकन करण्याच्या टप्प्यावर आपण येऊन ठेपलो आहोत. भारत हा नैसर्गिक साधनसंपत्ती आणि खनिज समृद्ध देश आहे. माथी हिमालय उभा आहे, पायी सागराच्या लाटा लोळण घालत आहेत. देशातून गंगा-गोदावरी, ब्रह्मपुत्रा सारख्या रक्त वाहिन्या वाहत आहेत. निर्जिव पक्षी आकाशी भरारी मारतो आहे. सैनिक आणि जवान डोळ्यात तेल घालून देशाचे सीमा रक्षण करत आहेत. किसान लोकराजा बनला आहे. आपल्या देशाला शिमला, कुलू-मनाली, उटी सारखी समृद्ध पर्यटन स्थळे लाभली आहेत. एकूणच आपला भारत देश 'सुजलाम सुफलाम' आहे.

आपल्या देशाला पौराणिक आणि ऐतिहासिक संस्कृतीचा वारसा लाभला आहे. अनेक जाती, धर्माचे, भाषांचे लोक येथे वारसा

घेऊन गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर यांच्यासारख्या थोर संतांची भूमी असलेल्या आपल्या देशाची संस्कृती आज जागतिक पातळीवर सर्वश्रेष्ठ संस्कृती मानली जाते. भारताने एकाच वेळी अध्यात्मात आणि विज्ञानातही उच्च दर्जाची कामगिरी केली आहे.

आरोग्य क्षेत्रात करण्यात आलेली गुंतवणूक रोजगाराच्या नव्या संधी देखील वाढवते. म्हणूनच केंद्र सरकारने या क्षेत्रात चार आघाड्यांवर एकाच वेळी पुढे जाण्याबाबत वचनबद्धता दर्शविली आहे.

एक- आजार प्राथमिक स्तरावर रोखण्यासाठी स्व्छतेला प्रोत्साहन, दोन- प्रभावी योजनेद्वारे गरिबांना स्वस्त आणि प्रभावी उपचार, तीन- पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा बरोबरच व्यावसायिकांची संख्या आणि गुणवत्ता यात वाढ आणि चार- आरोग्य क्षेत्राशी संबंधित समस्यांवर मिशन मोड मध्ये भर.

या चारही आघाड्यांवर विजयी होण्यासाठी वैद्यकीय उपकरणांपासून औषधे, व्हेंटिलेटर, लस आणि शोध यांसह देखरेख प्रणाली पर्यंत संपूर्ण पायाभूत सुविधा उत्तम तऱ्हेने उभारण्यासाठी तयारी केली आहे.

प्रधानमंत्री आत्मनिर्भर स्वस्थ भारत योजनेच्या माध्यमातून चाचणी पासून उपचारापर्यंत एक नवी परिसंस्था तयार केली जाणार आहे.

१५ व्या वित्त आयोगाच्या शिफारसी स्वीकारण्यात आल्यास आरोग्य क्षेत्रात स्थानिक संस्थांना ७० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी उपलब्ध होणार आहे.

**भारतीय वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती:**

'भारतीय वैद्यकीय उत्तर अनुसंधान परिषद' या संस्थेने विविध रोगांवर संशोधन करणारी २६ केंद्रे देशभर सुरू केली. या संस्थेच्या संशोधनामुळे क्षयरोग व कुष्ठरोगावर नियंत्रण मिळवणे शक्य झाले. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगत वैद्यकीय शिक्षण व संशोधनाला चालना देण्यासाठी 'ऑल इंडिया इन्स्टिटट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस' या संस्थेची स्थापना झाली. प्रगत वैद्यकीय शिक्षण व या संस्थेवर वैद्यकशास्त्राच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या शिक्षणाची जबाबदारी टाकली गेली. वैद्यकशास्त्राच्या बहुतांश शाखांमधील पदवी व पदव्युत्तर शिक्षणाच्या सुविधा असलेली महाविद्यालये, संशोधनाच्या चांगल्या सुविधा, सुसज्ज सार्वजनिक इस्पितळे ही या संस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये होत. सर्वसामान्य माफक दरात वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देणे, परिचारिकांच्या प्रशिक्षणासाठी स्वतंत्र महाविद्यालये, हृदयविकार, मेंदूविकार व नेत्रविकारांवर उपचार करण्यासाठी सुपर स्पेशालिटी केंद्रे या संस्थेने काढली आहेत ही आपली मोठी उपलब्धी आहे.

• • • •

# स्वातंत्र्याने मला काय दिले!

**कु. तांदुळे सुरेखा**
एम.ए. द्वितीय वर्ष

स्वातंत्र हा शब्द बहुचर्चित आहे. राज्यशास्त्रात तर त्याचे प्रस्थ आहेच, पण आपल्या रोजच्या व्यवहारात आणि सार्वजनिक चर्चांमध्ये या शब्दाचा वापर सतत होत असतो. मात्र शब्द प्रचलित असला तरी त्यात अंतर्भुत असलेल्या तीन अर्थांची आपल्याला नेहमीच जाणीव असते अशातला भाग नाही.

**राष्ट्रीय स्वातंत्र्य:**

स्वातंत्र्याचा एक अर्थ म्हणजे 'राष्ट्रीय' स्वातंत्र्य. भारताला १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी मिळालेले स्वातंत्र्य हे याच प्रकाराचे आहे. त्यामागे ब्रिटिश राजवटीची आणि तिच्यापासून स्वतंत्र होण्यासाठी जनतेने दिलेल्या लढ्याची पार्श्वभूमी आहे. जगातील अनेक देश जबरदस्तीने वेगवेगळ्या युरोपीय देशांच्या साम्राज्याचा भाग बनवले गेले होते. त्या राजवटींपासून मुक्त होण्याचा अर्थ या राष्ट्रीय स्वातंत्र्यामध्ये सामावलेला आहे. भारत स्वतंत्र झाला असे आपण म्हणतो तेव्हा ब्रिटिशांच्या म्हणजे परकीय आणि वसाहतवादी राजवटीपासून स्वतंत्र झाला असे आपल्याला अभिप्रेत असते.

अशा प्रकारे स्वातंत्र्याचा हा अर्थ मुख्यत: वसाहतवादामुळे आपल्या परिचयाचा झालेला आहे. मात्र युरोपात तो राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेमधून आणि राष्ट्र-राज्य स्थापण्याच्या आधुनिक रिवाजातून व्यक्त झालेला दिसतो. एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीपासून विशेषत: विसाव्या शतकाच्या पूवार्धात युरोपच्या राजकीय फेररचनेमागे दोन प्रक्रिया कारणीभूत ठरल्या. एक म्हणजे वेगवेगळ्या समाजांची प्रबळ होत गेलेली राष्ट्रभावना व दुसरी म्हणजे तिला मिळालेली मान्यता. त्यातून स्वतंत्र राष्ट्रे-राज्ये निर्माण झाली.

त्याच दरम्यान वसाहतवादी राजवटींच्या विरोधात लोकलढे, क्रांत्या किंवा समझोते होऊन राष्ट्रीय समाजांना 'स्वातंत्र्य' मिळाले. विसाव्या शतकाच्या अंतिम टप्प्यात पुन्हा एकदा युरोपातील अनेक देशांची पुनर्रचना झाली. त्यांच्या अंतर्गत असलेल्या प्रदेशांची पुनर्रचना झाली. राष्ट्रीय भावनेला वाट मिळून जुना युगोस्लाव्हिया किंवा चेकोस्लोव्हाकिया हे देश विभाजित होऊन नवीन राष्ट्रे-राज्ये निर्माण झाली. सारांश आपल्या

वेगळ्या राजकीय अस्तित्वाची मागणी करणारे समाज जेव्हा स्वत:चे राज्य निर्माण करतात किंवा त्यासाठी मागणी करून लढा देतात तेव्हा 'राष्ट्रीय' स्वातंत्र्याचा प्रश्न त्यामध्ये गुंतलेला असतो. या अर्थाने स्वातंत्र्य या संकल्पनेचा राष्ट्र या संकल्पनेशी घनिष्ठ संबंध असतो.

**व्यक्तीचे स्वातंत्र्य:**

स्वातंत्र्याचा दुसरा परिचित अर्थ आहे व्यक्तीचे मूल्य. प्रतिष्ठा आहे आणि स्थान आहे ही कल्पना मुळात मान्य केल्याशिवाय व्यक्तीचे स्वातंत्र्य ही कल्पना ना प्रचारात येऊ शकते ना तिचे समर्थन करता येते. म्हणजे या दुसऱ्या अर्थाने स्वातंत्र्याबद्दल बोलायचे तर प्रत्येक स्त्री-पुरुष मनुष्य हा स्वत:चे स्वत: निर्णय घेऊ शकणारा, स्वत:चे हित ओळखणारा एक घटक आहे हे मान्य करावे लागते. व्यक्तिप्रतिष्ठा मान्य केल्याशिवाय या व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार करता येत नाही. या स्वातंत्र्यात आचाराचे आणि विचाराचे अशा दोन्ही प्रकारचे स्वातंत्र्य अंतर्भूत आहे. आपले हित कशात आहे हे ठरवून प्रत्येक व्यक्तीने व्यवसाय, वास्तव्य या बाबतीतले निर्णय घ्यावेत आणि आपले जीवन समृद्ध करावे; तसेच आपल्या रूचीप्रमाणे आणि निवडीप्रमाणे श्रद्धा बाळगणे, धार्मिक पूजाअर्चा व प्रार्थना करणे यांचाही स्वातंत्र्याच्या या दुसऱ्या अर्थात समावेश होतो. आपल्या विचारांची अभिव्यक्ती मोकळेपणाने प्रत्येकाला करता यावी हे देखील स्वातंत्र्यात अभिप्रेत असते. अशा स्वातंत्र्यामुळे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. व्यक्ती प्रगल्भ बनल्या तर त्यातून सामाजिक प्रगल्भता साकार होणे सोपे जाते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकशाही मध्ये प्रत्येक व्यक्तीला पुरुसे स्वातंत्र्य उपलब्ध असणे ही अत्यावश्यक बाब मानल्यामुळे स्वातंत्र्याचे समर्थन केले जाते. समाजात व्यक्तींना असणाऱ्या स्वातंत्र्याच्या निकषावर लोकशाहीचे मोजमाप केले जाते.

**गटांचे स्वातंत्र्य:**

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वातंत्र्याच्या आणखी एका अर्थाची चर्चा पुढे आली आणि ती म्हणजे समाजातील विविध गटांचे किंवा समूहांचे स्वातंत्र्य! राष्ट्रांचे स्वातंत्र्य आणि व्यक्तीचे स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी मान्य केल्या तरी आधुनिक समाज हे सुट्या व्यक्तींचे बनलेले नसतात तर राष्ट्र आणि व्यक्ती यांच्याखेरीज त्यांना जोडणारा दुवा म्हणून समाजात अनेक समूह असतात. या संदर्भात मुख्यत: राष्ट्राच्या अंतर्गत असणाऱ्या प्रादेशिक, धार्मिक किंवा पंथीय, भाषिक वगैरे समूहांचा विचार केला जातो. या समूहांना देखील स्वतंत्र अस्तित्व असते आणि म्हणून त्यांना अधिकार असावेत, ते समूहांचे अधिकार म्हणून स्वीकारले जावेत हा विचार विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पुढे आला. अर्थात त्याही आधी उदारमतवादी लोकशाहीत अल्पसंख्य समूहांना काही खास हमी किंवा संरक्षण या स्वरूपात वेगळे अधिकार असावेत हा विचार पुढे आलेला होताच; पण त्यापुढे जाऊन

आता असे मानले जाते की, समाजात अनेक समूह किंवा गट असतात आणि त्यांना पुरेशी स्वायत्तता असेल तर त्यांच्यात समतोल राहील. याचे कारण समाज अनेक गटांचा बनला आहे आणि त्या गटांच्या भाषा, रीती, संप्रदाय वेगळे असू शकतात याची जाणीव विसाव्या शतकात झाली. त्यातून समूहांच्या अधिकाराचा मुद्दा पुढे आला. स्वातंत्र्याच्या बाबतीत तीन प्रश्न नेहमीच उभे राहतात पहिला- या तीन स्वातंत्र्यांच्या परस्पर संबंधांचा, दुसरा- त्यांच्या व्याप्तीचा आणि तिसरा त्यांच्या अंमलबजावणीचा किंवा प्रत्यक्ष व्यवहारातील अस्तित्वाचा.

**कोणते स्वातंत्र्य मोठे?**

जहाल किंवा कडक राष्ट्रवादी लोक राष्ट्राचे स्वातंत्र्य हे सर्वोच्च मानून व्यक्तिस्वातंत्र्य किंवा समूहांचे स्वातंत्र्य हे दुय्यम मानतील तर टोकाचे व्यक्तिस्वातंत्र्यवादी लोक व्यक्तीच्या स्वातंत्र्यापुढे बाकी सगळे दुय्यम मानतील. कोणत्याही मूल्याच्या बाबतीत उभा राहणारा पेच इथेही उभा राहतो, तो विभिन्न मुल्यांची क्रमवारी ठरवण्याचा. मात्र राष्ट्रीय स्वातंत्र्य नसेल तर व्यक्तीचे किंवा समूहाचे स्वातंत्र्य मर्यादित तरी असेल किंवा नकली असेल आणि त्याउलट राष्ट्रातल्या व्यक्ती स्वतंत्र नसतील तर राष्ट्रीय स्वातंत्र्य निरर्थक ठरेल हेदेखील लक्षात ठेवणे अगत्याचे आहे.

म्हणजेच ही तिन्ही स्वातंत्र्ये परस्पर संलग्न आणि परस्परावलंबी आहेत आणि तरीही त्यांच्यात वेगवेगळा तणाव उत्पन्न होऊ लागला. असे तणाव असण्यात काही विपरित किंवा चमत्कारिक नाही; कितीतरी वेळा त्या-त्या धर्मपंथातील भाविकांना गुलाम करणारे तुरूंग असे या समूहांच्या अधिकाराचे स्वरूप बनते.

**मर्यादांची चौकट :**

यातूनच येणारा प्रश्न म्हणजे प्रत्येक स्वातंत्र्याची व्याप्ती काय असावी हा होय. एकदा राष्ट्राचे स्वातंत्र्य प्राप्त झाले की, कोणतेही राष्ट्र सहसा त्याच्यामधील प्रदेशांच्या वेगळे होण्याचा अधिकार मान्य करीत नाहीत ही राष्ट्रीय स्वातंत्र्याची काहीशी विसंगत बाजू आहे. प्रत्यक्षात मात्र अनेक राष्ट्रांमधील अंतर्गत प्रदेश वेळोवेळी स्वत:च्या 'राष्ट्रीय' स्वातंत्र्यासाठी झगडताना दिसतात.

राष्ट्राच्या स्वातंत्र्याशी निगडित असा आणखी एक प्रश्न असतो. राष्ट्र जेव्हा राज्याच्या रूपाने व्यक्त होते तेव्हा मूलभूत अशा मानवाधिकारांची मर्यादा आपोआप त्या राष्ट्राला स्वीकारावी लागते. ज्यांना नागरी स्वातंत्र्ये असे म्हटले जाते ती सहसा अमर्याद नसतातच. पण कायद्याने त्यांचे नियमन किती करावे हा पराकोटीच्या वादाचा मुद्दा नेहमीच आणि सर्वत्रच राहिलेला आहे. याचे कारण राज्यसंस्था ही नियमन करणारी संस्था असल्यामुळे तिचा कल जास्त करून व्यक्तीचे स्वातंत्र्य मर्यादित करण्याकडे असतो तर राज्य संस्थेने नागरिकांचे अधिकार मान्य करून वाटचाल केली पाहिजे असा आग्रह लोकशाहीचे पुरस्कर्ते धरतात. अर्थात त्यांनाही अमर्याद व्यक्तिस्वातंत्र्य अभिप्रेत नसते आणि तसे

ते कुठेही प्रत्यक्षात अस्तित्वात देखील नसते.

**व्यवहारातील स्वातंत्र्य:**

स्वातंत्र्यापुढचा तितकाच गुंतागुंतीचा पेच म्हणजे त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा असतो. हा मुद्दा व्यक्ती स्वातंत्र्याशी थेट संबंधित असला तरी राष्ट्रीय स्वातंत्र्याची सुद्धा या पेचातून सुटका होत नाही. एकविसाव्या शतकात थेट किंवा उघडपणे वसाहतवादी तर फारसा प्रचलित नाही; पण देशा-देशांमध्ये मोठी असमानता आहे. त्यामुळे एखाद्या देशाचे परराष्ट्र आणि संरक्षण धोरण असो की, बाजारपेठेविषयीचे आणि आयात-निर्याताचे धोरण असो त्यावर थेटपणे प्रभाव पाडणे किंवा त्यात हस्तक्षेप करणे हे बड्या राष्ट्रांना सहज शक्य होते. म्हणजे समाज स्वातंत्र्य वापरू देत नाही आणि सरकार समाजाच्या दादागिरीपुढे मान झुकवते अशा परिस्थितीत स्वातंत्र्याचा प्रत्यक्ष वापर दूर राहतो. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य असण्याचा मुख्य अर्थ म्हणजे समाजात त्याला मान्यता असणे.

एखाद्याचे विचार कितीही वेगळे असले, वागणे कितीही विक्षिप्त किंवा अप्रचलित असले तरी आपल्याला थेट इजा पोचत नसेल तर भावना दुखावण्याच्या नावाखाली अशा वेगळेपणाला न अडवण्याची स्वातंत्र्यवादी संस्कृती समाजाने किती स्वीकारली आहे यावर त्या समाजातील स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने अवलंबून असते.

**स्वातंत्र्याने काय दिले**

स्वातंत्र्य आपण लढून मिळवले असले तरी आपल्या संस्कार, संस्कृती, इतिहासात त्याची बीजं आढळतात. ते मिळवण्यासाठी ज्यांनी बलिदान दिले, लढा दिला, त्यांच्या ऋणात राहण्याची भावना आजच्या पिढीत आहे. त्याबरोबर त्याची जाण ठेवून वाटचालीची ग्वाहीही ही पिढी देत आहे. स्वातंत्र्य म्हणजे जीवनच, स्वातंत्र्य हेच आपले सर्वस्व आहे. कारण त्याने आपल्याला अस्तित्व दिले. वैचारिक मतभेद असले तरी सामाजिक समानता स्वातंत्र्याने दिली. सहजीवनाचा आनंद दिला, आचार-विचार-भ्रमण यांचे स्वातंत्र्य दिले. लोकशाहीच्या मूल्यांना अवकाश दिले. म्हणून आज आपण प्रगती करू शकतो. आपले आयुष्य स्वातंत्र्यानेच व्यापलेले आहे. हुकुमशाही राष्ट्रांचा विचार केला तर आपण उपभोगत असलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ काय हे समजते. स्वातंत्र्य म्हणजे जीवनच आहे. आयुष्याशी संबंधित निर्णय स्वत: घेण्याची मुभा हा अधिकार सर्वांना स्वातंत्र्यानेच दिला आहे. परंतु या स्वातंत्र्याबरोबर स्वत:च्या चांगल्या किंवा वाईट निर्णयाची जबाबदारी पदरी पडते. लहान असताना आपल्यासाठी काय वाईट किंवा काय योग्य हे पालकच ठरवितात. आपल्यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय खूप सुरेख फळ देतात तेव्हा आपण त्यांचे आयुष्यभर ऋणी राहतो. त्याचप्रमाणे देवदयेने मी स्वतंत्र भारतात जन्माला आलो, पारतंत्र्य म्हणजे काय याचा वाईट अनुभव ज्या लोकांप्रमाणे मला भोगावा लागला नाही त्या सर्वांना अभ्यंकर. आपले स्वातंत्र्य अबाधित आहे याचे श्रेय सीमेवर असणाऱ्या जवानांचे आहे.

# स्वतंत्र भारताची शैक्षणिक प्रगती

**कु. देशपांडे वैष्णवी सुमंतराव**
एम.ए. प्रथम वर्ष

भारतीय शिक्षणाचा विकास प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर काळात अतिशय वेगाने झाला. स्वातंत्र्योत्तर काळात उच्च आणि सर्वसाधारण शिक्षणातही प्रचंड वाढ झाली. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शिक्षणाचा विकास कशा पद्धतीने झाला हे पुढील काही मुद्दयांवरून स्पष्ट होते-

**सामान्य शिक्षणाचा विस्तार:**

१९५१ मध्ये आपल्या देशातील साक्षरतेची टक्केवारी १९.३ होती, ती २००१ मध्ये ६५.४ इतकी वाढली. १९९१ मध्ये ६ ते ११ वयोगटाती मुलांचे शाळेत दाखल होण्याचे प्रमाण ४३ टक्के होते ते २००१ मध्ये १०० टक्के झाले. प्राथमिक शिक्षक हे मुक्त आणि सक्तीचे होते. १९९५ पासून गळतीचे प्रमाण थांबवण्यासाठी मध्यान्ह भोजनाची सुरुवात करण्यात आली. प्राथमिक शाळांची संख्या ही जास्त प्रमाणात वाढू लागली आणि १९५० साली २.१० लाख असलेली ही संख्या २००१ पर्यंत ६.४० लाख इतकी झाली. १९५०-५१ मध्ये विद्यापिठांची संख्या २७ इतकी होती ती २०००-२००१ पर्यंत २५४ झाली.

**तंत्रशिक्षणाचा विकास :**

सामान्य शिक्षणाखेरीज तंत्रशिक्षण हे मानवाच्या जीवनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. सरकारने या दृष्टिकोनातून औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालये, वैद्यकीय व दंत महाविद्यालय तसेच व्यवस्थापन संस्थांची स्थापना केली. यामध्ये तंत्रशिक्षण, भारतीय तंत्र शिक्षण संस्था (आय.आय.टी.), राष्ट्रीय तंत्र शिक्षण संस्था (एन.आय.टी.), भारतीय व्यवस्थापन संस्था (आय.आय.एम.), वैद्यकीय शिक्षण, कृषी शिक्षण यांचा समावेश आहे. भारतीय तंत्रशिक्षण संस्था (आय.आय. टी.) मध्ये अभियांत्रिकी आणि तंत्रशिक्षणातील शिक्षण व संशोधन आंतरराष्ट्रीय दर्जाचे होण्यासाठी मुंबई, दिल्ली, कानपूर, चेन्नई, खरगपूर, रूरूकी आणि गुवाहटी या सात ठिकाणी आयआयटीची स्थापना केली. पदवी, पदव्युत्तर व पीएच.डी. च्या स्तरापर्यंत तांत्रिक शिक्षण या ठिकाणी देण्यात येते. राष्ट्रीय तंत्रशिक्षण संस्था (एन.आय.टी.) या संस्थांमध्ये अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाचे शिक्षण दिले जाते. या संस्थांना प्रादेशिक अभियांत्रिकी



महाविद्यालये (आर. ई.सी.) म्हणून ओळखले जाते. संपूर्ण देशातून एनआयटीच्या केवळ १७ संस्था आहेत. या व्यतिरिक्त अभियांत्रिकी आणि तंत्रशिक्षण देणाऱ्या इतरही संस्था आहेत. भारतीय व्यवस्थापन संस्था (आय.आय.एम.) या संस्थांमध्ये व्यावसायिक व्यवस्थापन आणि प्रशासन विषयक शिक्षण दिले जाते. अहमदाबाद, बंगलुरू, कोलकाता, लखनऊ, इंदोर आणि कोझीकोड येथे या संस्था आहेत. वैद्यकीय शिक्षणाची संपूर्ण भारतामध्ये १९५०-५१ साली केवळ २८ महाविद्यालये होती, यांची संख्या १९९८-९९ पर्यंत १६५ झाली व दंत महाविद्यालयाची संख्या ४० इतकी झाली. कृषी क्षेत्रातील उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी जवळपास सर्व राज्यांमध्ये कृषी विद्यापिठांची सुरूवात करण्यात आली.

**स्त्री शिक्षण :**

भारतामध्ये स्त्री साक्षरतेचे प्रमाण अत्यतं नगण्य होते. भारतामधील स्त्री शिक्षणात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आपणास दिसून येते. स्त्री शिक्षणात २००१ च्या जनगणनेप्रमाणे स्त्री साक्षरतेचे प्रमाण ५२ टक्के व पुरुष साक्षरतेचे प्रमाण ७५.८ टक्के इतके होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये स्त्री शिक्षणास उच्च प्राधान्य देण्यात आले. अनेक राज्यांच्या सरकारांनी विद्यापीठ स्तरापर्यंत मुलींना शिक्षण शुल्क माफ केले. स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी स्वतंत्र शाळा व स्वतंत्र महाविद्यालये सुरू करण्यात आली. स्वातंत्र्योत्तर काळाच्या आधी स्त्रियांना कमी प्रमाणात शिकवले जात असे तर बऱ्याचदा शिक्षणापासून वंचितही ठेवले जात असे; परंतु स्वातंत्र्योत्तर काळानंतर स्त्रियांच्या शिक्षणावर भर देण्यात आला. स्त्रियांना सर्वच क्षेत्रात उच्च दर्जा देण्यात येऊ लागला.

**व्यावसायिक शिक्षण :**

१९८६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार शाळांच्या व्यावसायिकीकरणावर भर देण्यात आला. १९८८ पासून हा कार्यक्रम लागू करण्यासाठी केंद्र सरकार राज्य सरकारांना सातत्याने निधी देत आहे. या धोरणाच्या अनुषंगाने उच्च माध्यमिक अभ्यासक्रमामध्ये कृषी, मत्स्यपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, टंकलेखन, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, सुतारकाम हे विषय समाविष्ट करण्यात आले आहेत. ९३ व्या घटना दुरुस्ती नुसार सर्वांसाठी शिक्षण सक्तीचे करण्यात आले. ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांसाठी शिक्षण मोफत आहे. याच गोष्टीची पूर्तता करण्यासाठी सर्वशिक्षा अभियान सुरू करण्यात आले. यातच सर्व मुलांसाठी प्राथमिक शिक्षण हा मूलभूत हक्क असून ते सर्वांसाठी मोफत आहे.

वरील सर्व चर्चेतून हे स्पष्ट होते की, भारतीय शिक्षणाचा विकास प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर काळात अतिशय वेगाने वाढला आहे. ही स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाची देणगी आहे.

# स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक परिवर्तन

**कु. गायकवाड पुनम लालासाहेब**
एम.ए. प्रथम वर्ष

सामाजिक संरचनेत फेरबदल घडविणारी प्रक्रिया मानवाचे रीतिरिवाज, आचार-विचार, संस्था संघटना, जीवन पद्धती, भोवतालचा परिसर, व्यक्तीमधील परिवर्तन यामध्ये सतत बदल घडवीत असते. आदिम अवस्थेपासून ते सांप्रत काळापर्यंत मानवी समाजाच्या सर्व अवस्थांमध्ये सतत परिवर्तन झालेले दिसते.

मॅकायव्हर यांच्या मते सामाजिक संबंधातील परिवर्तनाला सामाजिक परिवर्तन म्हणता येईल. मूलभूत अर्थाने समाज रचनेतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय. अमेरिकन समाजशास्त्रज्ञ हॅरी जॉन्सच्या मते हे परिवर्तन जैविक, सांस्कृतिक, आर्थिक, तांत्रिक आणि राजकीय क्षेत्रातही घडून येते.

समाजातील कोणतेही बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन नव्हे तर सामाजिक कृतीचे व आंतरक्रियांचे आकृतिबंध मुल्ये, सांस्कृतिक फलिते आणि प्रतीके या अविष्कारकासह होणाऱ्या बदलाना सामाजिक परिवर्तन असते म्हणतात. समाजातच्या विविध भागाच्या परस्परसंबंधाच्या स्वरूपात बदल झाला की समाजरचनेत परीवर्तन घडून येते. म्हणजे पर्यायाने सामाजिक परिवर्तन घडून येते.

संकलित सामाजिक बदलामुळे मानवी सामाजिक इतिहासाची घडण झाली आहे. जनसांख्यिकीय संक्रमण किंवा एखाद्या नवराज्याची निर्मिती यासारखे महत्त्वाचे बदल ही पायाभूत परिवर्तने होत व इतर तुलनात्मक बदल सामान्य होत. संकलित सामाजिक परिवर्तनवादी समाजशास्त्र असा प्रश्न उपस्थित करतात की, व्युत्कतिनिष्ठ स्पस्टीकरण सर्व महत्त्वाच्या संक्रमंणांना देता येणार नाही. संकलित सामाजिक परिवर्तने सर्व सामाजिक वैशिक प्रक्रियात्मक गुणविशेषणांतून वेगळी करावी लागतील. समाजशास्त्र प्रामुख्याने प्रतिकात्मक सामाजिक वर्तनाचा अभ्यास करताना सर्व प्रकारचे आकृतिबंध सापेक्षत: स्थिर असूनही सामाजिक जीवनातील विशिष्ट कशी बदलू शकतात या गतिशील प्रक्रियेवर ते लक्ष केंद्रित करतात. सामाजिक विषमता आणि अस्पृश्यता त्याच्या निर्मूलनासाठी समाजातील व्यक्तीची त्याचे कौटुंबिक, सांस्कृतिक आणि

दैनंदिन व्यवहार बदलले. नव्या मुल्यांचे शिक्षण देण्यास सुरुवात केली. कल्याणकारी योजनांतूनही तळागाळातील माणसाच्या उद्याचे लक्ष्य महत्त्वाचे मानले जाते. जो कसेल त्याची जमीन झाली आणि औद्योगिक धोरण ठरविताना कामगार संघटनांना सहभागी करून घेण्यात आले. तसेच राज्य संस्थेत एकाधिकारशाही ऐवजी लोकशाही प्रस्थापित झाली. भांडवलशाही अर्थव्यवस्थेला समाजवादी लोकशाही व साम्यवादी अर्थव्यवस्था हे पर्याय पुढे आले. परंपरागत अवजारांऐवजी यंत्राचा वापर होऊ लागला. सतीची प्रथा, बहुपत्नीत्व रद्द होवून एकपत्नीत्वाचा कायदा झाला. हे सर्व बदल समाजव्यवस्थेत दीर्घकालीन परीवर्तन घडवून आणण्यास प्रेरक ठरले. सामाजिक परिवर्तन पुरोगामी किंवा प्रतिगामी वर्धमान किंवा ऱ्हासमान, स्थायी किंवा अस्थायी, कायमचे, हंगामी, योजनापूर्वक किंवा योजना विरहित, एक दिशावर्ती किंवा बहुदिशावर्ती, अपकारक किंवा उपायकारक, हितकारक किंवा हानीकारक अशा कोणत्याही प्रकारचे असू शकते.

सांस्कृतिक मानवशास्त्राचे दोन गट आहेत. एका गटाच्या मते सामाजिक परिवर्तनाचा उगम प्रसारात आहे; तर दुसऱ्या गटाच्या मते सामाजिक परिवर्तनाचा उगम शोधात किंवा आविष्कारात सापडतो. सामाजिक परिवर्तनाचा उगम प्रसारात आहे असे म्हणणाऱ्यांच्या मते फॅशन, कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, दळणवळणाची साधने, औषध यातील शोध-बदल प्रसारमाध्यमांद्वारे जगभर प्राप्त होतात. हे बदल प्राचीन काळापासून समाजातील लोकांना इतर लोकांपासून स्वीकारलेले असतात. या परिवर्तनामळेच कित्येक आदिवासी आपली विशेष प्रगती करून घेत आहे. न्यूझीलंड देशातील माओरी जमातीच्या लोकांनी या मार्गाचा अवलंब करून एका दशकात संस्कृत लोकांमध्ये स्थान मिळवले आहे. प्राचीन ग्रीक संस्कृतीचा पगडा सर्व जगभर पडला आहे. सामाजिक परिवर्तनाचा उगम शोधात किंवा आविष्कारात आहे असे म्हणणाऱ्यांच्या मते सांस्कृतिक प्रगती ही अन्य लोकांचे अनुकरण करून घडली आहे परंतु हे संभवनीय नाही. विविध समाजाचे दुगोचर होणारे सांस्कृतिक गुणविशेष त्या त्या समाजातील लोकांनी स्वतंत्रपणे लावलेल्या शोधातून निर्माण झालेले असतात.

प्रत्येक तंत्र वा कल्पना अगर आचार एका समाजातून दुसऱ्या समाजाकडे जाताना त्याच स्थितीत राहत नाहीत. इतर समाजाकडून घेतलेल्या गोष्टीचा आपल्या समाजाच्या वातावरणात योग्य उपयोग करता यावा म्हणून त्या गोष्टीमध्ये बदल केले जातात. म्हणजे प्रसार आणि शोध या दोन्ही गोष्टी एकमेकात अगदी बेमालुमपणे मिसळलेल्या आढळतात. म्हणून सामाजिक परिवर्तनाचा उगम प्रसार व शोध या दोन्ही गोष्टीत आहे.

यांत्रिक आणि तांत्रिक या नव्या शोधामुळे उत्पादनवाढीला आणि बाजारपेठेला खरेदी-विक्री व्यवहारांना वेग येऊन देशाची आर्थिक स्थिती सुधारते. परंतु असे सर्वत्र घडत नाही. कारण

देशाच्या आर्थिक मागासलेपणामुळे नव्या तांत्रिक यांत्रिक गोष्टीचा स्वीकार करू शकत नाही. जेथे राजकीय इच्छाशक्तीचा अभाव, नव्याला विरोध करण्याची वृत्ती अशा गोष्टींचा प्रभाव असतो त्यामुळे सामाजिक परिवर्तन कोणत्याही समाजात सारख्याच गतीने होते असे आढळत नाही.

बदलणाऱ्या परिस्थितीला अनुसरून मनुष्य आपल्या सामाजिक संबंधात जाणीवपूर्वक बदल करत असल्याने सामाजिक परिवर्तन घडते. मानवाची जगण्यासाठी सतत धडपड चालू असते. त्यासाठी तो प्रयत्नपूर्वक पर्यावरणाशी जुळवून घेऊन फेरबदल करत असतो. या पर्यावरणाशी येणाऱ्या संबंधातच परिवर्तनाची बीजे आढळतात. यंत्राचा उपयोग सुरू झाल्यावर शेकडो माणसे एकत्र येऊन कारखान्यात काम करू लागली. अठराव्या-एकोणीसाव्या शतकातील ग्रेट ब्रिटनमधील औद्योगिक क्रांतीने आधुनिक उत्पादनात आमूलाग्र बदल घडला याचे स्वरूप सर्वत्र आढळते. म्हणजेच पर्यावरणाशी येणाऱ्या संबंधातील बदलामुळे सामाजिक परिवर्तन घडून येते.

सामाजिक परीवर्तनाच्या स्वरूपासंबंधी दोन सिद्धांत सांगितले आहेत. एक सामाजिक परिवर्तन चक्राकार स्वरूपाचे असते आणि दुसरे रेषाकार स्वरूपाचे असते. कोणत्याही घटकांची जेव्हा अगदी पूर्वीची पुन्हा पुन्हा आवृत्ती होते तेव्हा चक्राकार स्वरूपाचे परिवर्तन घडते. ऋतुचक्र, कुंभमेळ्यासारखे उत्सव, उद्गम, विकास, ऱ्हास व नाश हा चक्राकार क्रम सामाजिक घटनांतदेखील



दिसून येतो. जेव्हा कोणत्याही घटनांचे एखाद्या विशिष्ट दिशेने निरंतर परिवर्तन होत असते. त्या कामामध्ये कधीही फरक पडत नाही आणि घटना केव्हाही त्याच स्वरूपात आवृत्त होत नाही तेव्हा रेषाकार किंवा रोखात्मक परिवर्तन असते. प्रगतीच्या दिशेने सरळ रेषेत चालू असणारे ते एक रेषात्मक परिवर्तन होय.

उर्ध्वगामी आणि अधोगामी चढ-उतार परिवर्तनात असतात. व्यापारातील तेजी-मंदी, चलनी नाण्याच्या मूल्यामधील वाढ-घट हे उर्ध्वगामी पद्धतीने होतात. कित्येकदा परिवर्तन तरंगाच्या स्वरूपाचे असते. लोकांच्या आवडी-निवडी, क्रिकेटच्या खेळाडूबद्दलचे प्रेम कमी अधिक होते. नेतृत्वाबद्दलची मते बदलतात, प्रसारमाध्यमे, जाहिरातीमुळे माणसे भारावून जातात आणि परिवर्तनास अनुकूल होतात.

# स्वातंत्र्योत्तर काळातील सांस्कृतिक प्रगती

**शिंदे माधव धोंडीराम**
एम.ए. द्वितीय वर्ष

भारत हा एक सांस्कृतीप्रिय देश आहे. या देशात १९४७ साली राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताचे विभाजन झाले तेव्हा हिंसक जातीय दंगली झाल्या. दोन्ही समाजात शांतता प्रस्थापित करणे ही एक समस्याच होती. १९४८ साली पाकिस्तान विरुद्ध युद्ध झाले. मोहनदास गांधी यांच्या आदर्शवादी प्रभावातून नेहरू तेव्हा पूर्णपणे बाहेर आले नव्हते. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पाश्चिमात्य संस्कृती व राजकीय तत्वज्ञान यांनी प्रभावित झालेल्या सुशिक्षितांनी प्रथम इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारावर आणि नंतर पुरातन चालिरिती आणि अंधश्रद्धा यांच्या विरुद्ध प्रचार करून समाज सुधारणांवर लक्ष केंद्रित केले होते.

भारत हा मानवी इतिहासातील प्राचीन देशांमध्ये गणला जातो. येथील लिखित इतिहास २,५०० वर्षांपूर्वीचा आहे. हा इतिहास वैभवसंपन्न आणि सामर्थ्यशाली असाच राहिलेला आहे. मौर्य साम्राज्य ज्याला गुप्त राज्य असेही म्हटले जाते. हे भारताच्या पहिले प्रभावी असे केंद्रिय शासन होते. भारतात ग्रामीण व शहरी स्वरूपांची मानवी वस्ती होऊ लागली व सिंधू नदीच्या काठावर त्यांचे हळूहळू सिंधू संस्कृतीत रूपांतर झाले. इ.स. पूर्व २५०० च्या सुमारास सिंधू संस्कृतीचा काल मानला जातो. मोहोंजोदडो व हडप्पा ही उत्वखननात सापडलेली शहरे आज पाकिस्तानात असली तरी भारतीय इतिहासात गणली जातात.

**भारताचा सांस्कृतिक इतिहास:**

भारतीय संस्कृतिचा इतिहास हा समृद्ध व वैविध्यपूर्ण आहे. सिंधू संस्कृतीचा उदय व अस्त, आर्यांचे स्थलांतर, ग्रिक, पर्शियन, शक, पहलव, कुशाण, हुण यांची प्राचीन काळातील आक्रमणे व त्यांचे भारतीयीकरण तसेच मध्ययुगीन काळातील इस्लामिक आक्रमणे होऊनही भारतीय संस्कृतीचा इतिहास समृद्ध व वैविध्यपूर्ण आहे. सांस्कृतिक प्रवास हा राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक मन्वंतरामधून घडतो.

संस्कृतीमध्ये भाषा, साहित्य, वास्तुकला तसेच संगीत, नृत्य, शिल्पकला, चित्रकला यासारख्या कलाविष्कारांचा अंतर्भाव होतो. एखाद्या कालखंडातील त्यांचा परस्परसंबंध आणि उत्क्रांती यांचे आकलन अपेक्षित आहे. वैदिक काळापासून

पुढे मात्र भारतीय इतिहास एका विशिष्ट उत्क्रांतीची साखळी दर्शवतो. ब्राह्मण साहित्य प्रकारामध्ये विधींच्या शास्त्रांचा उहापोह दिसतो.

मौर्य साम्राज्य हे भारतातील पहिले व एक वैभवशाली साम्राज्य म्हणून गणले जाते. मौर्याच्या काळातील कौटिल्याचे अर्थशास्त्र, सम्राट अशोकाचे स्तंभ व शिलालेख, अशोकाचा धम्म, बौद्ध धर्माचा प्रसार, स्तूप, विहार, वास्तूकला यांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. विधी व पशुबळी यांच्या अतिरेकाला मिळालेल्या प्रतिक्रियांपैकी वैदिक धर्माच्या अधिसत्तेला अमान्य करत वेगळे पर्याय निर्माण करणारी प्रतिक्रिया म्हणजे वेदोत्तर मौर्यपूर्व काळात ६४ वेगवेगळ्या पंथांचा उदय ही होय.

या ६४ पंथांपैकी जैन व बौद्ध धर्मांनी खऱ्या अर्थाने वैदिक धर्माला पर्याय निर्माण केला व त्याहीपुढे जाऊन बौद्ध धर्माने नवे आव्हान निर्माण केले. या तत्त्वज्ञानाने भारतामध्ये धार्मिक सुधारणेचा पाया रोवला आणि भारतीय समाज व संस्कृतीवर दूरगामी परिणाम केला. संस्कृतीचा अभ्यास ऐतिहासिक उत्क्रांतीच्या अनुषंगाने करणे उपयुक्त ठरते. कोणत्याही कालखंडाच्या संस्कृतीचा अभ्यास करताना तत्कालीन सामाजिक, आर्थिक व राजकीय संदर्भाचा अभ्यास आवश्यक ठरतो. कारण हा संदर्भ कलेच्या, साहित्याच्या अभिव्यक्तीमध्ये प्रतिबिंबीत होतो. सिंधू संस्कृतीच्या कालखंडापासून मौर्यत्तर कालखंडापर्यंतचा संस्कृतीच्या प्रवासाच्या सारांशाचा वेध या रचनेतून दिसून येतो.

**भारतीय संस्कृतीची प्रगती :**

भारतीय संस्कृती हजारो वर्षांपूर्वीची आहे. आपल्या संस्कृतीवर अनेक परकीय आक्रमणे झाली; परंतु ती नष्ट झाली नाही. भारतीय संस्कृती उपासना, त्याग, संयम, सहिष्णुता इत्यादींचे मिश्रण असून ती आपणाला अंधारातून प्रकाशाकडे नेते. जगात जे जे मंगल आणि पवित्र आहे त्याचे आपल्याला दर्शन घडविते. साने गुरुजींनी भारतीय संस्कृतीचे यथार्थ वर्णन केले आहे. ते म्हणतात, 'भारतीय संस्कृती म्हणजे सहानुभूती, भारतीय म्हणजे विशालता, सत्याचे प्रयोग. भारतीय संस्कृती म्हणजे सारखे ज्ञानाचा मागोवा घेत पुढे जाणे होय.

स्वातंत्र्योत्तर काळातील संस्कृतीची प्रगती ही मानवी मनाला प्रसन्न तर करतेच पण त्यातून ज्ञानाचा मिळणारा गोडवा हा तर अनोखाच असतो. त्या त्या देशाची वेगळी संस्कृती असते. तिच्या रूढी, परंपरा प्रमाणे त्यांच्या चालीरीती बदलत जातता. यातून त्या समाजाचे वास्तव रूप चित्रित होते.



# सामाजिक शास्त्रे विभाग



# भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि परराष्ट्रीय धोरण

**शिंदे श्रद्धा अंकुश**
बी.ए. द्वितीय वर्ष

प्रस्तुत लेखामध्ये भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घेणार आहोत. यामध्ये प्रथम परराष्ट्र धोरण म्हणजे काय ते पाहू. देशाच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी इतर देशांबरोबर मैत्रीपूर्ण संबंध राखणे महत्त्वाचे आहे. असे संबंध विशिष्ट तत्त्वे आणि धोरणांवर आधारित असतात. अशा तत्त्वे आणि धोरणांना परराष्ट्र धोरण म्हणता येईल. परराष्ट्र धोरणाची प्रणाली साधी आणि संक्षिप्त असू शकते किंवा गुंतागुंतीची आणि संदिग्ध सुद्धा असू शकते. परराष्ट्र धोरणात निश्चितपणे राष्ट्र-राज्याची उद्दिष्ट्ये, नैतिक तत्वे आणि राष्ट्रहिताची परिभाषा यांचा समावेश होतो. परराष्ट्र धोरण पोकळित अस्तित्वात येऊ शकत नाही तर राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि ऐतिहासिक संदर्भामध्ये परराष्ट्र धोरण तयार होत असते.

राष्ट्राच्या-राज्याच्या निर्मितीशी संबंधित ऐतिहासिक घडामोडी राष्ट्र निर्मितीची वैचारिक तत्त्वे चौकट आणि राष्ट्र-राज्याच्या अस्तित्वाचे तार्किक अधिष्ठान यांच्या संगमातून राष्ट्राच्या-राज्य संस्थेचा प्रकार, अर्थव्यवस्थेचे स्वरूप व गरजा राजकीय परिस्थिती, भौगोलिक स्थान आणि सांस्कृतिक जडण-घडण यांच्या संयुक्त साच्यातून परराष्ट्र धोरणाला आकार प्राप्त होतो. आधुनिक काळात राष्ट्र-राज्यांना आपापल्या राष्ट्र हितांचे रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी परराष्ट्र धोरण आखण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

प्राचीन काळापासून जगातील इतर देशांशी सौहार्दाचे संबंध होते. पण ब्रिटीश राजवटीमध्ये त्यांच्या वसाहतवादी हेतूने प्रेरित परराष्ट्र धोरणामुळे भारताच्या इतर देशांशी असणाऱ्या संबंधामध्ये बदल झाला. भारताच्या परराष्ट्र धोरणाची स्थूल जडण-घडण स्वातंत्र्यपूर्व काळातच झाली. ब्रिटीशांच्या परराष्ट्र धोरणावर टीका करून राष्ट्रीय चळवळीतील धुरिणांनी सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि शांततापूर्ण सहअस्तित्व या तत्त्वांवर आधारित परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार केला.

स्वातंत्र्यप्राप्तीपासून ते आजपर्यंत

देशाच्या परराष्ट्र धोरण निर्मितीवर पंतप्रधानांचा विशेष प्रभाव दिसून येतो. स्वातंत्र्यानंतर पहिले पंतप्रधान आणि परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पंडित नेहरू यांनी ब्रिटीशांच्या परराष्ट्र धोरणातील कटू अनुभवापासून बोध घेत देशाचे परराष्ट्र धोरण आखले. अलिप्ततावाद, वसाहतवाद आणि साम्राज्यवादाला विरोध, वर्णद्वेष विरोध, जागतिक शांतता, प्रादेशिक सहकार्य, नि:शस्त्रीकरणाला पाठींबा ही भारतीय परराष्ट्रीय धोरणाची तत्त्वे आहेत.

नेहरूप्रणीत आदर्शवादी परराष्ट्र धोरणाच्या मर्यादा पाकिस्तान आणि चीनशी झालेल्या युद्धानंतर आणि भारताच्या पाश्चिमात्य देशांशी असणाऱ्या असमान संबंधामधून दिसून आल्या. इंदिरा गांधींच्या काळामध्ये परराष्ट्र धोरणामध्ये आदर्शवाद ते वास्तववाद असा बदल झाला. वाढती सैन्यशक्ती आणि वेगाने आकार घेत असलेला आण्विक कार्यक्रम, बांगलादेशाच्या निर्मितीतील भूमिका, शांततामय आण्विक चाचणी, अण्वस्त्र प्रसार बंदी (एनपीटी) करारावर स्वाक्षरी करण्यास नकार आणि भारत व सोव्हिएत रशिया यांच्यातील करार हा बदल दर्शवतो.

१९९० च्या दशकामध्ये सोव्हिएत रशियाचे पतन, शीतयुद्धाची समाप्ती झाली. याचवेळी भारत आर्थिक संकटातून वाटचाल करत होता. परिणामी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या माध्यमातून अमेरिकेच्या संपर्कात यावे लागले. यानंतर भारताने एलपीजी मॉडेलचा अंगीकार करून अर्थव्यवस्था खुली केली. या घटनेमुळे भारताचे परराष्ट्र धोरण व्युहात्मक बाबींकडून भू-आर्थिक बाबींकडे झुकले. या संरचनात्मक बदलामुळे भारताची परकीय मदतीकडून थेट परकीय गुंतवणुकीकडे वाटचाल सुरू झाली.



याचवेळी भारताने 'पूर्वेकडे पहा' धोरणाचा अंगीकार केला. यावेळी पूर्व आशियायी देशांमध्ये वेगाने आर्थिक विकास घडून येत होता. यामुळे पर्यटन, व्यापार आणि आर्थिक सहकार्य यांना चालना देण्याचा प्रयत्न होता. यानंतर 'गुजराज सिद्धांत'च्या साहाय्याने शेजारील देशांशी घेण्याची अपेक्षा न करता संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होता. यामुळे बांग्लादेशासोबत गंगा पाणी वाटप करार झाला. यानंतरचा कालखंडा 'प्रबुद्ध राष्ट्रीय हिताने' प्रेरित होता.

भारताने १९९८ मध्ये अणू चाचण्या केल्या. इस्त्रायलशी संबंध प्रस्थापित केले व सोबतच पश्चिम आशियायी राष्ट्रांबरोबर ऊर्जा राजनय सुरू ठेवला. भारताने नेहमी बहुध्रुवी जागतिक व्यवस्थेचा पुरस्कार केला. भारताने ब्रिक्स, आयबीएसए, जी-२०, जी-४ आदी संस्थांद्वारे उदयोन्मुख आर्थिक सत्तांबरोबर सहकार्याला बळ देण्याचा प्रयत्न केला. तसेच अमेरिका-भारत अणुकरारानंतर अमेरिकेशीही जवळचे संबंध प्रस्थापित केले. आतापर्यंत भारतीय परराष्ट्र धोरणाचा आढावा घेता. गेल्या काही दशकांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेले बदल आणि त्यांचा भारतातील प्रभाव तसेच या बदलांना प्रतिसाद म्हणून आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये केलेला बदल व रणनिती यांचे सूक्ष्म आकलन महत्त्वाचे आहे.

सध्या पंतप्रधान  नरेंद्री मोदी यांच्या नव्या मंत्रीमंडळामध्ये परराष्ट्र धोरण व राष्ट्रीय सुरक्षा या विषयांशी निगडीत पदांचा भार या क्षेत्रातील तज्ज्ञ नोकरशहांकडे दिला आहे. याचाच अर्थ सरकारच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय संबंध, परराष्ट्र धोरण व राजनय हे महत्त्वपूर्ण विषय आहेत. मात्र या सरकारने युपीए सरकारची धोरणे तशीच पुढे चालू ठेवली आहेत.

कल पाश्चिमात्य राष्ट्रांकडे झुकलेला दिसतो. तसेच शेजारील देशांबरोबरच्या संबंधांना खूप महत्त्व दिले आहे. भारताच्या 'नेबरहूड फस्ट' या धोरणाने सध्या वेग घेतला आहे. कारण दक्षिण आशियातील श्रीलंका, बांग्लादेश, भुतान आणि मालदीव या देशांमध्ये सध्या भारतीय राज्याला व धोरणाला अनुकुल असे राजकीय पक्ष व नेते सत्तेत आहेत. उदा. बांग्लादेश जमीन हस्तांतरणाचा करार, सागरमाला, मौसम या परियोजनांवरून राष्ट्रीय सत्तेवर भर दिला जात असल्याचे स्पष्ट होते. देशांतर्गत आणि परराष्ट्र धोरणांचा व्यापक एकीकरणाचा दृष्टीकोन दिसत आहे.

भारत हा जगातील सर्वाधिक ऊर्जा वापरणाऱ्या देशांपैकी आहे. परिणामी ऊर्जा सुरक्षा हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा सर्वोच्च बिंदू बनला आहे. सध्याच्या परराष्ट्र धोरणामध्ये सातत्याबरोबर बदलांची काही लक्षणे दिसत आहेत. यामध्ये व्यापाराबरोबर सुरक्षा, संस्कृती, भु-राजकीय व भु-सामारिक स्वरूपाचे विषय फार महत्त्वाचे आहेत. परराष्ट्र धोरणाच्या समग्र आकलनासाठी एनसीटी प्रकाशनाचे 'इंडियाज फॉरेन पॉलिसी सिन्स इंडिपेंडन्स-व्ही. पी. दल' हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे.

• • • •

# भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल

**कु. गवळी प्राजक्ता कमलाकर**
बी.ए. द्वितीय वर्ष

स्वतंत्र भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची स्थुल जडणघडण स्वातंत्र्यपूर्ण काळातच झाली. अखिल भारतीय काँग्रेसने आंतरराष्ट्रीय प्रश्नासंबंधी वेळोवेळी स्वीकारलेल्या धोरणातूनच ते उत्क्रांत झाल्याचे दिसून येते. हे बऱ्याच अंशी त्याच्या राजकीय अनुभवातून साकारले आहे. स्वातंत्र्यापूर्वीच काँग्रेसने आंतरराष्ट्रीय प्रश्नासंबंधी अनेक ठराव संमत केलेले होते. ब्रह्मदेश इंग्रजांनी जिंकल्याबद्दल असंतोष व्यक्त करण्यात आला (१८८५). ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी कारवायांसाठी भारतास तळ म्हणून वापरण्यास हरकत घेण्यात आली.

काँग्रेसचे हे साम्राज्यविरोधी धोरण पहिल्या महायुद्धानंतर अधिकच स्पष्ट झाले. इंग्रजांच्या खलिफाविरोधी धोरणांचा निषेध म्हणून भारतात खिलाफत चळवळ सुरू करण्यात आली. १९२० मध्ये आयरिश लोकांच्या स्वातंत्र्य लढ्यास पाठींबा देण्यात आला. तर १९२८ मध्ये इजिप्त, सिरिया, पॅलेस्टाईन आणि इराक यांचे त्यांच्या साम्राज्याविरोधी संघर्षाबद्दल अभिनंदन करण्यात आले. भारताचे हे धोरण स्वातंत्र्यानंतरही नेटाने चालविले गेले. भारत स्वत: ब्रिटीश साम्राज्यवादाचा बळी असल्यामुळे यासंबंधी त्याच्या नेत्यास वाटणारी तळमळ स्वाभाविक आहे.

भारतीय नेत्यांचा साम्राज्यवादाचा अनुक्रम हा पाश्चिमात्य देशापुरताच मर्यादित असल्याने साम्राज्यवादाचा संबंध त्यांनी फक्त पाश्चात्य



देशाशी लावणे समजू शकते. स्वातंत्र्योत्तर काळात प्रामुख्याने संयुक्त राष्ट्रात ठराव संमत करून घेऊन इंडोनेशिया, मोरोक्को, अल्जेरिया इत्यादी आफ्रिकी आशियाई देशांच्या मुक्तीसाठी वातावरण तयार करण्यात भारताने उल्लेखनीय कामगिरी बजावली. या भूमिकेतूनच १९५६ मध्ये इंग्लंड व फ्रान्स यांनी सुएझ कालव्यासंबंधी केलेल्या सैनिकी हस्तक्षेपास भारताने विरोध केला.

वसाहतींना स्वातंत्र्य मिळावे असा एक ठराव संयुक्त राष्ट्राने करून त्याची अंमलबजावणी कितपत होते हे पाहण्यासाठी एक २४ सदस्यांची समिती नेमली आहे. भारत हा या समितीच्या प्रमुख सदस्य आहे. वसाहत वादाप्रमाणेच दक्षिण आफ्रिकेतील वंशभेदाविरुद्ध जागतिक लोकमत संघटन करण्यासाठी भारताने खुप प्रयत्न केले आहेत. भारतीय राज्य व्यवस्थेत परराष्ट्रीय धोरणाची जबाबदारी ही परराष्ट्रीय मंत्र्याची असते. धोरणासाठी तो लोकसभा जबाबदार असतो.

नेहरूंचे चरित्रकार मायकेल ब्रेशर यांच्या मते नेहरू हे भारतीय परराष्ट्रीय धोरणांचे शिल्पकार होत. इतकेच नव्हे तर परराष्ट्रीय धोरण ही त्यांची मक्तेदारी होती. एका अर्थाने हे खरे आहे. काँग्रेसने १९२८ मध्ये परराष्ट्रीय धोरणासाठी स्वतंत्र विभाग सुरू केल्यापासून त्याची धुरा पंडितजी अखेरपर्यंत सांभाळत होते. परराष्ट्रीय धोरणासाठी कॅबिनेटची एक समिती असली तरीही नेहरूंच्या मंत्रीमंडळातील इतर कोणीही परराष्ट्रीय धोरणात फारसा रस घेतला नाही.

नेपाळ, बांग्लादेश, भुतान, श्रीलंका या देशांचे दौरे करून मोदींनी शेजारी राष्ट्रांशी संबंध सुधारण्यावर भर दिलेला दिसतो. यामुळे भारतीय खंडातील चीनच्या हस्तक्षेपास काही प्रमाणात चाप लागलेला दिसतो. भारतामध्ये स्थिर सरकार आल्यानंतर परराष्ट्र धोरणात सातत्य होते. सहाजिकच परराष्ट्रीय संबंधात विश्वास निर्माण होतो. नव्वदच्या दशकानंतर राष्ट्रहिताला प्रथम प्राधान्य देणारे; तसेच वास्तववादी विदेश नितीचे धोरण स्वीकारणारे सरकार सत्तेवर असल्याने किमान या क्षेत्रात तरी भारताने वेगळीच उंची निर्माण केलेली दिसते.

आशियातील इतर देशांबरोबर संबंध सुधारत असताना त्यांनी इतिहासाची उजळणीही केली. भावनेला हात घालून सांस्कृतिक संबंध प्रस्थापित केले. 'ॲक्टईस्ट' धोरण नव्याने पुढे आणत आर्थिक बळकटीसाठी महत्त्वाचे पाऊल मोदींनी उचचले. आपल्या कार्यकाळात आशियाच्या सर्व शिखर परिषदांना हजेरी लावलेली दिसते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेचे कायमचे सदस्यत्व मिळावे म्हणून अनेक राष्ट्रांना त्यांनी आपलेसे करण्याचा प्रयत्न केला. मोदी त्यांच्या काळात शेजारील राष्ट्राशी संबंध सुधारण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात झाले. ईस्त्राईलला भेट देणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान ठरले. अमेरिकेचा विरोध असताना देखील इस्त्राइलशी युद्ध साहित्याबाबत करार करतात, तर अमेरिकेसारख्या महासत्तेच्या जवळ जाताना भारताची नवीन ओळख करून देत

आपले महत्त्व पटवताना दिसतात. न्युयॉर्कमध्ये 'हाऊ डी मोदी' कार्यक्रमाच्या माध्यमातून वेगळा प्रभाव दाखवण्याचा प्रयत्न करतात. मोदींनी ब्रिक्स (ब्राझील, चीन, भारत आणि द. आफ्रिका) यांच्याशी आधिक चांगले संबंध निर्माण केले. आणि युरोपातील जी-२० निर्माण केली. त्यांनी इतिहासाची उजळणीही केली. भावनेला हात घालून सांस्कृतिक संबंध प्रस्थापित केले. ॲक्टईस्ट धोरण नव्याने पुढे आणत आर्थिक बळकटीसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले. मोदींनी आपल्या कार्यकाळात 'आसियान'च्या सर्व शिखर परिषदांना हजेरी लावलेली दिसते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेचे कायमचे सदस्यत्व मिळावे म्हणून अनेक राष्ट्रांना त्यांनी आपलेसे करण्याचाप्रयत्न केला. या काळात पाकिस्तानबाबतच्या धोरणात आमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. अमेरिकेची भुमिकाही बदलताना दिसते. अमेरिकेची माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानात कडक भाषेत सुनावले होते. तसेच त्यांची आर्थिक मदत बंद केली होती. आता पाकिस्तानाला अमेरिकेच्या मित्रराष्ट्र यादीत स्थान नाही हा भारतीय परराष्ट्र कुटनीतीचा मोठाच विजय मानायला हवा.

• • • •



# स्वातंत्र्याची ७५ वर्षे आणि विनिमय व्यवस्था

**कु. गाडे वैष्णवी मधुकर**
बी.ए. प्रथम वर्ष

भारताची अर्थव्यवस्था ही विकसनशीलतेकडून विकसित होण्याच्या मार्गावर आहे. जगामध्ये पाचव्या क्रमांकावर असणारी भारतीय अर्थव्यवस्था ही वस्तुविनिमय पद्धतीपासून अभासी चलनापर्यंत येऊन पोहोचल्याचे दिसून येते. हा लेख म्हणजे थोडक्यात भारताची आर्थिक प्रगतीच्या दिशेने होणारी वाटचाल याचे उत्तम उदाहरण आहे.

बीटकॉईन सारख्या अभासी चलनाचा वापर होणाऱ्या जगात वस्तुविनिमय हे देखील विनिमयाचे साधन होते यावर विश्वासच बसत नाही. विनिमय म्हणजे वस्तुच्या बदल्यात वस्तू देणे-घेणे होय. वस्तुविनिमय हा पैशाचा वापर न करता केली जाणारी देव-घेव. बाजारांचा उदय व विकास हा वस्तुविनिमयाच्या संकल्पनेतूनच झाला या बाजारपेठांमध्ये न्याय्य वा योग्य मूल्य तसेच समानमूल्य यांसारख्या संकल्पनांचा उदय प्रमाणशीर असे विनिमय माध्यम नसतानाही झाला परंतु या वस्तुविनिमयात गरजांच्या दुहेरी संयोगाचा अभवा, विभाज्यतेची अडचण अशा प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या.

प्रत्येक शाखेत काही मुलभूत संशोधन असते जसे की विज्ञानात अग्नीचा शोध, यांत्रिक शास्त्रात चाकाचा शोध त्याचप्रमाणे मानवाच्या आर्थिक आयुष्यात 'पैशाचा शोध' हा असाच महत्त्वपूर्ण शोध आहे. त्यामुळे दैनंदिन व्यवहारात पैसा हा वस्तुविनियमातील समस्या दूर करतो. अर्थशास्त्रात पैशाची क्रांती नव्हे तर उत्क्रांतीच आहे, असे म्हणावे लागेल. पैशाचे स्वरूप हे काळाप्रमाणे झालेल्या बदलांचा परिणाम आहे.

वस्तुविनिमयानंतर पशू पैसा अस्तित्वात आला. इतिहास पूर्वकाळात देवाणघेवाणीचे माध्यम म्हणून पशूपैसा वापरला जात होता, उदा. गायी, शेळ्या, मेंढ्या इत्यादी परंतु विभाजनाच्या समस्येमुळे वस्तू पैसा अस्तित्वात आला. भारतामध्ये पारंपारिक काळाचा विचार करता ज्या वस्तू पैशाचे देवाण-घेवाणीचे माध्यम म्हणून वापरल्या जायच्या त्या हवामानानुसार व संस्कृतीनुसार होत्या. म्हणजेच प्राण्यांची कातडी, धान्य, शिंपले इत्यादी हे विनिमयाचे माध्यम होते. परंतु वस्तूंचा साठा करण्याच्या समस्येमुळे धातू पैसा अस्तित्वात आला. धातू पैसा तयार करताना

सोने, चांदी, तांबे, ॲल्युमिनिअम, निकेल इ .धातूंचा वापर केला जाता असे. परंतु मौल्यवान धातू आणि धातूंच्या तुकड्यातील असमानतेमुळे धातूंच्या नाण्यांचा शोध लागला. भारतीय चलनाचा इतिहास पाहता मोगलांच्या अखेरच्या काळात मराठा साम्राज्य उदयास आले. त्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी सोने (होन) व तांब्याची (शिवराई) नाणी काढली.

सुरुवातीला सन १९५० मध्ये भारतीय रूपयाची नाणी (आयएनआर) तयार केली गेली. दरवर्षी नवीन नाणी तयार केली जातात आणि ती भारतीय चलन प्रणालीचा हिस्सा आहेत. या नाण्यांची निर्मिती भारतातील कोलकाता, मुंबई, हैदराबाद आणि नोएडा येथे होते. आज १ रूपया, २ रुपये, ५ रूपये, २० रूपये इत्यादी नाण्यांचा यात समावेश आहे.

कागदी पैसा हा धातूच्या पैशाला पर्याय आहे. भारतात एक रूपयाची नोट व सर्व प्रकारची नाणी भारत सरकारकडून चलनात आणली जातात व त्यापुढील चलनाच्या निर्मितीचे अधिकार हे मध्यवर्ती बँकेकडे म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँकेकडे (आरबीआय) आहेत. त्यानंतर पतपैसा अस्तित्वात आला. यानंतरचे पुढचे पाऊल म्हणजे प्लॅस्टिक पैसा, डेबीट कार्ड, एटीएम कार्ड, क्रेडीट कार्ड यांचा समावेश प्लॅस्टिक पैशात होतो. यानंतर अस्तित्वात आला इलेक्ट्रॉनिक पैसा. इलेक्ट्रॉनिक पैशाला मौट्रिक मूल्य असून ते इलेक्ट्रॉनिक यंत्रणेच्या सहाय्याने म्हणजेच मोबाईल फोन, टॅबलेट, स्मार्ट कार्डस्, संगणक इत्यादी मार्फत हस्तांतरीत केले जाते.

आभासी चलनाच्या बाबतीज जग खुप पुढे गेले असले तरी त्यात भारताचे स्थानसुद्धा कमी नाही. म्हणूनच आज स्वातंत्र्याची ७५ वर्षे गाठत असताना भारतसुद्धा 'क्रिप्टो' करन्सीच्या मायाजाळात अडकत असताना दिसतो. नाणी आणि नोटा या स्वरूपात असलेल्या प्रत्यक्ष चलनापेक्षा वेगळे, न दिसणारे तरीही व्यवहार करता येणारे चलन म्हणजे आभासी चलन, अशी ही व्याख्या ढोबळ मानाने करता येईल. बिटकॉईन पासून सुरू झालेली आभासी चलनाचे व्यवहार लाईट कॉईन, रिपल, इथेरिअम, डॉजकॉईन, कॉइन्ये, नेम, डॅश, मोनेरा, ब्लॅक कॉईन अशा अनेक चलनामध्ये होत आहे. बिटकॉईन ही क्रिप्टो करन्सी आली आणि जग खरोखरच चलन क्रांतीच्या दिशेने एक पाऊल पुढे गेले.

इतकेच नव्हे तर भारत हा आभासी चलन या संकल्पनेपासून प्रगतीच्या मार्गावर म्हणजे पॉलिमर चलनाच्या दिशेने पाऊल टाकताना दिसत आहे.

• • • •



# स्वतंत्र भारताच्या कृषि व्यवस्थेची ७५ वर्षे

**कु. चिकटे तनुजा पांडुरंग**
बी.ए. द्वितीय वर्ष

गेल्या ७५ वर्षांमध्ये सरकारने जी धोरणे राबविली त्याचा उत्पादन वाढीवर अनुकूल परिणाम झाला. पण शेतकऱ्यांचे अज्ञान आणि अशास्त्रीय पद्धतीने कृषी व्यवस्था हाताळल्याने कृषी संकट ओढवलेले आहे. १९५१ ते १९६७ पर्यंत कृषी विकासाचा वृद्धिदर १.६ टक्क्यांनी वाढला तर राष्ट्रीय उत्पादनातील वाढीचा वेग ३.५ टक्के राहिला. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या भांडवल निर्मितीत कृषीक्षेत्राचा वाटा १९५०-५१ मध्ये १७.७ टक्के होता. तो २०१६-१७ मध्ये १५.५ टक्के झाला आहे. १९५०-५१ मध्ये भारतातील अन्नधान्य क्षेत्र केवळ ९७.३२ दशलक्ष हेक्टर इतके होते. उत्पादकता ५५२ किलोग्रॅम हेक्टर इतकी होती. २०१३-१४ च्या अंदाजानुसार २६४.४ दशलक्ष टन अन्नधान्याचे उत्पादन झाले.

१९६५ मध्ये कृषी किंमत आयोगाची स्थापना करण्यात आली. मार्च १९८५ मध्ये त्याच्या कार्याची व्याप्ती वाढवून त्याचे नामकरण कृषी खर्च व मूल्य आयोग असे करण्यात आले. हा आयोग केंद्र शासनास २५ मुख्य पिकांच्या किमान आधारभूत किमतीची शिफारस करते. ही आधारभूत किंमत पिकांचा उत्पादन खर्च, उत्पन्न व इतर अनुषंगिक माहितीच्या आधारे ठरविली जाते.



१९६७-१९८० पर्यंत कृषी विकासाचा दर ३.३ टक्के आणि सकल राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीचा दर ३.९ टक्के राहिला. कृषी क्षेत्राची प्रगती या काळात झाली. पण १९८० ते २००१ या काळात कृषी व देशाचे राष्ट्रीय उत्पन्न अनुक्रमे २.८ टक्के व ५.७ टक्के या दराने वाढले. यावरून कृषी विकासाचा दर मंदावल्याचे लक्षात येते. त्यापुढील काळात २००१ ते २०११ पर्यंत कृषी विकास किंचित म्हणजे ३.३ टक्क्यांनी वाढला. तुलनेने देशाचे सकल उत्पन्न मात्र ७.७ टक्क्यांपर्यंत गेले. अलीकडील काळात म्हणजेच २०११ ते २०२० या काळात कृषी विकासाचा वेग सरासरी ३.७ टक्के आणि देशाची सकल उत्पन्नातील वाढ ५.३ टक्के अशी राहिली. म्हणजे कृषी क्षेत्राचे देशाच्या विकासातील योगदान कमी झाले. २०२०-२१ मध्ये सकल राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी हिस्सा १९.९ टक्क्यांपर्यंत आहे. तत्पूर्वी तो १३ टक्क्यांपर्यंतु घसरला होता.

सध्या केवळ ४६ टक्के श्रमशक्ती पूर्णवेळ शेती करते. त्यामध्ये ९० टक्के मध्यम, लघु व सीमांत शेतकरी आहेत. १९९३-९४ साली ४८.६ टक्के होती ती २०१५-१६ मध्ये ५०.२ टक्क्यांपर्यंत वाढली आणि शेती कसणाऱ्या शेतकऱ्यांच्यातील सर्वात खालच्या स्तरातील ५० टक्के शेतकऱ्यांची संख्या याच काळात ३.८% वरून ०.४% पर्यंत घटलेली आहे. शेतकरी कुटुंबाचे दरडोई उत्पन्न रू. ८९३१ दर महा इतके आहे तर औद्योगिक कामगारांचे वेतन २३३९८ वरून ५४३७७ पर्यंत गेले आहे. शेतकरी कुटुंबाचे दरडोई कर्ज सरासरी रू. १,०४,६०२ इतके आहे.

शेतीतील खाजगी गुंतवणूक १९८३ नंतर सातत्याने वाढत आहे. सरकारी गुंतवणूक मात्र घटत चालली आहे. त्यामुळे सरकारी भांडवलनिर्मितीचा वेग मंदावलेला आहे ही शेतीवरची अनास्था दर्शविते. त्यामुळे दरवर्षी सुमारे दोन लाख शेतकरी कायमची शेती सोडून अन्य क्षेत्राकडे वळतात.

भारतातील जास्तीत जास्त लोक कृषी व्यवसाय करतात. स्वातंत्र्याप्राप्तीच्या वेळी भारतातील ७० टक्क्याहून अधिक लोक कृषी व संलग्न क्षेत्रावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रीतीने अवलंबून होते. २००१ च्या जनजणनेनुसार देशातील रोजगारात कृषी व संलग्न क्षेत्राचा हिस्सा ५८.२ टक्के आहे.

भारतातील शेत जमीनीपैकी फक्त ५३.६% जमीन जलसिंचनाखाली होती. भारतात सिंचनाचे प्रमाण २०१४-१५ च्या आकडेवारीनुसार आणि २०१७ च्या कृषी अहवालानुसार ४८.६% आहे. देशातील जल संसाधनांच्या विकासासाठी राष्ट्रीय जलनीती २००२ धोरण आखण्यात आले.

भारतातील लोकांचा मुख्य व्यवसाय कृषी असल्यामुळे अनेक प्रकारचे कृषी उत्पादन निर्यात केले जाते. भारत हा जगातील प्रमुख १५ कृषी वस्तूंच्या निर्यातक देशांमध्ये गणला जातो.

२०२१-२२ मध्ये कृषी विकास दर ३.९% तर तो आधीच्या वर्षी ३.६% होता.

• • • •

# स्वतंत्र भारत आणि परराष्ट्र धोरणाची वाटचाल

**कु. सोळुंके तनुजा सतिष**
बी.ए. द्वितीय वर्ष

देशाचे किंवा कोणत्याही राज्याचे इतर देशांशी असलेले परस्पर संबंध हा देशाच्या जडणघडणीतला महत्त्वाचा घटक आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. भारताचे स्वातंत्र्योत्तर काळातील परराष्ट्र धोरणाच्या प्रवासात जागतिक पातळीवर विविध देशांशी सुधारलेले संबंध दिसून येतात.

**परराष्ट्रविषयक धोरणाचा पाया :**

स्वतंत्र भारताच्या परराष्ट्रविषयक धोरणाचा पाया पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी रचला. पहिल्या १५ वर्षात भारताने पूर्व व पश्चिमेकडील दोन्ही सत्तांशी सलोख्याने संबंध राखले. दोघांकडून आर्थिक सहाय्यही मिळविले. नेहरूंनी १६ वर्षे परराष्ट्र मंत्रालय सांभाळले. तो काळ देश नेहरूंच्या अलिप्तवादी संकल्पनांनी भारलेला होता. तरी राजकीय आघाडीवर सोव्हिएत रशियाशी अधिक जवळीक दिसत होती.

**१९७७-१९८० या काळात परराष्ट्र धोरण :**

या काळात काँग्रेस व्यतिरिक्त इतर पक्षांच्या आघाडीने दिल्लीवर राज्य केले. नेहरूंनी एक बळकट आणि उच्चतम अर्थव्यवस्था देशाच्या हाती देण्याचा प्रयत्न केला. इंदिरा गांधींनी त्या अर्थव्यवस्थेला लोकप्रियतेची जोड दिली. १९७१ मध्ये इंदिरा गांधी यांच्या हाती सत्ता एकवटली. १९७१ मध्ये बांगला देश स्वतंत्र करण्यासाठी भारताने जी तडफ दाखविली त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील दबदबा वाढला. या कारवाईमुळे भारताचे सोव्हिएत रशियायी असलेले संबंध अधिक दृढ झाले. साहजिकच या युद्धावेळी व नंतरही अमेरिकेचा कल पाकिस्तानकडे राहिला. १९७४ मधील पहिल्या अणुचाचणीनंतर अमेरिकेने भारतावर काही बाबतीत बहिष्कार टाकला. या दोन्ही घटनांमुळे भारताचे अमेरिकेशी शत्रुत्व वाढत चालले आहे.

१९८० मध्ये अरब-ईस्राईल संघर्ष पेटलेला होता आणि दुसरीकडे इराण-इराक युद्ध अनेक वर्षे चालले; त्यामुळे तेलाचे भाव वाढले. १९९० च्या दशकात डिजिटल युग अवतरले. भारताची अर्थव्यवस्था जसजशी विकसित होऊ लागली तसा परराष्ट्र धोरणामध्ये बदल होऊ लागला.

**१९९० ते २००० पर्यंत परराष्ट्र धोरणात**

**झालेले बदल**

पी. व्ही. नरसिंहराव यांच्या काळात परराष्ट्र धोरण नव्याने आखण्यात आले. भारताचा अणू विषयक कार्यक्रम बाजूला ठेवण्यासाठी अमेरिकेकडून सतत दबाव येत होता.

१९९६ ते १९९८ या काळात पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांनी शेजारी राष्ट्रांशी, विशेषत: पाकिस्तानशी सलोखा राखण्यावर भर दिला. नंतरचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी व डॉ. मनमोहन सिंग यांनी याच धोरणाचा पाठपुरावा केला. सार्क देशांकडे भारताने अधिक लक्ष दिले आणि दक्षिण आशियाई राष्ट्रांशी आर्थिक व सुरक्षा संबंध मजबूत केले.

सन१९९८ मध्ये अटल बिहारीवाजपेयी यानी पाच अणु चाचण्या घेतल्या. यावर अमेरिकेची नाराजी ओढवून घेतलीच शिवाय निर्बंध देखील. त्यांच्या काळात अमेरिकेशी आण्विक करार करण्याबाबत धोरण आखले जात होते. १९९९ च्या कारगिल युद्धानंतर पाकिस्तानशी संबंध अधिकच चिघळत गेले. डॉ. मनमोहन सिंग यांनी चीन, पाकिस्तान व बांगला देश या देशांसाठी धोरण जाहीर केले होते. परंतु त्याची फलनिष्पत्ती झाली नाही.

**२००० नंतरचे भारतीय परराष्ट्र धोरण :**

२००५ ते २००७ या काळात पाकिस्तानचे प्रमुख परवेज मुशर्रफ यांच्याशी संवाद साधताना डॉ. सिंग काश्मीरप्रश्नी निर्णायक स्वरूपात आले होते. याच काळात चिनविषयीचे धोरणही काही प्रमाणात सुधारत होते. २००९ मध्ये पुन्हा सत्ता प्राप्त केल्यानंतर अमेरिकेशी असलेले संबंध दृढ करण्याचा प्रयत्न काँग्रेस सरकारकडून झाला नाही. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद ही नव्वदच्या दशकात मोठी समस्या बनली होती. आपले सरकार व राजनैतिक अधिकारी अमेरिकेच्या दबावाखाली राहताना दिसतात. काश्मीरमध्ये आजपर्यंत झालेल्या हल्ल्यात हजारो लोक ठार झाले. या बाबतीत कठोर मुकाबला करण्याऐवजी धरसोडीचे धोरण अवलंबिलेले दिसते.

भाजप पक्ष २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर अल्पावधीतच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जागतिक नेत्यांशी उत्तम संबंध प्रस्थापित केले. मोदींनी सुमारे ६२ देशांचा दौरा केला आणि तेथील उद्योजक व मुळ भारतीय वर्गाशी आवर्जुन संवाद साधताना दिसतात. या संवादात ते वेळोवेळी 'मेक इन इंडिया' चा आवर्जुन उल्लेख करताना दिसतात. जेणेकरून भारतात गुंतवणूक वाढेल आणि अर्थव्यवस्था बळकट होईल.

ईस्राईलला भेट देणारे मोदी पहिले पंतप्रधान ठरले. मोदींनी ब्रिक्स देशांशी अधिक चांगले संबंध निर्माण केले आणि युरोपातील जी-२० या बलाढ्य प्रगतशील देशांशी उत्तम जवळिक निर्माण केली. या काळात पाकिस्तानबाबतच्या धोरणात अमुलाग्र बदल झालेला दिसतो. अमेरिकेची भूमिकाही बदलताना दिसते.

• • • •

# भारताची सामाजिक वाटचाल

**कु. सारडा रुपाली रतन**
बी.ए. द्वितीय वर्ष

अनिष्ट चालिरितींना पायबंद घालून सामाजिक व्यवस्था, स्वास्थ व कल्याण यासाठी केलेले उपाय व बदल सामाजिक सुधारणा म्हणजे समाजात बुद्धिपरस्पर समाज हितकारक केलेले बदल होत. सामाजिक सुधारणांचा मूळ हेतू लोकांचे प्राकृतिक, सामाजिक, मानसिक, बौद्धिक व भावनात्मक स्वास्थ अबाधित राखणे हा असतो. या संज्ञेची व्याप्ती व कृतिकक्षा कालानुसार व सामाजिक कायद्यानुसार बदल असतो. उदा. कुटुंबनियोजन, सामाजिक सुरक्षा, दारिद्र्य विमोचन यांसारख्या कार्यक्रमामुळे तिच्या कृतिकक्षेत फेरफार झालेले आढळतात. शिवाय देशपरत्वे सामाजिक सुधारणात भिन्नत्व आढळते. उदा. मुस्लिम राष्ट्रांत स्त्रियांना बुरखा घालावा अशी स्थिती व बंधन आहे तर पाश्चात्य देशात मुस्लिम स्त्रियांना असे बंधन नाही. एवढेच नव्हे तर काही देशात सार्वजनिक ठिकाणात बुरखा वापरण्यास कायद्याने बंदी घातली आहे.

समाजात सतत काहीना काही बदल नेहमी घडत असतात. सुधारणा आणि संस्कृती या माणसांच्या अभिव्यक्तीतून निर्माण झालेल्या मानवनिर्मित परंपरा व चालिरीती होय. सामाजिक सुधारणा म्हणजे समाजाची सर्वांगीण सुधारणा होय. उदा. भारताच्या घटनाकारांनी सामाजिक सुधारणांमध्ये सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय आदी बाबींचा विचार केला जातो.



**राजा राममोहन रॉय (१८७२-१८८३)**

यांनी समाजसुधारणांची परंपरा सुरू केली. त्यांनी केलेल्या ब्राह्मो समाजाच्या स्थापनेमुळे भारतात एक नवे यूग अवतरले. बुद्धिप्रामाण्य, व्यक्ती स्वातंत्र्य आणि मानवी समानता ही तीन मुल्ये त्यांनी भारतीय समाजाला उपलब्ध करून दिली. नवरा मरण पावल्यानंतर त्याच्या पत्नीला त्याच्या चितेवरच जाळण्याची अमानुष प्रथा नष्ट करण्यासाठी तसेच कन्याविकय, कन्याहत्या, बाल विवाह, बालवृद्ध विवाह अशा ही चालीच्या बंधनातून भारतीय स्त्रीला मुक्त करण्यासाठी त्यांनी आंदोलन उभारले.

महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकर - लोकहितवादी - महात्मा ज्योतीराव फुले - सावित्रीबाई फुले - गोपाळ गणेश आगरकर - विठ्ठल रामजी शिंदे - डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

महात्मा फुले यांनी १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा स्थापन केली. पुढे आणखी दोन शाळा काढल्या. अस्पृश्यांसाठीही त्यांनी शाळा काढली. अस्पृश्यांना पिण्याचे पाणीही सहज मिळत नसे. ज्योतीरावांनी आपल्या वाड्यातल्या पाण्याचा हौद अस्पृशांसाठी खुला केला.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृशांच्या उन्नतीसाठी आयुष्य खर्ची घातले. धोंडो केशव यांनी स्वत: एक विधवेशी पुनर्विवाह केला होता. १८९३ साली त्यांनी विधवा विवाह प्रतिबंध निवारण मंडळ काढले.

सामाजिक सुधारणा संपूर्ण समाजासाठी केल्या जातात, तसेच एखाद्या समुहाचे प्रश्न हाताळण्यासाठीही केल्या जातात. एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील विकासासाठीही त्या कराव्या लागतात. उदा. सेना व्यवस्था, पोलीस खाते अशांमध्ये नव्या आचारसंहिता लागू कराव्या लागतात. राष्ट्रीय, शैक्षणिक धोरणांमध्ये अलीकडच्या काळात वैज्ञानिक दृष्टिकोन, नैतिक मुल्ये, अध्यात्मिक मुल्ये यांची एकत्रितपणे जोपासणा करणे.

स्वतंत्र देशात सामाजिक आणि देश म्हणून जगात भारताची ओळख झाली. भारताचा पाच हजार वर्षांचा सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक आणि राजकीय वारशाचा इतिहास जगासाठी आकर्षण ठरलेला आहे आणि स्वतंत्र प्रजासत्ताक भारताची गेल्या सहा दशकांतील वाटचाल हा जगासाठी कुतुहलाचा विषय आहे.

भारतीय उपखंडातल्या शेजारील देशांसाठी राजकीय लोकशाही ही अडथळ्यांची शर्यत ठरत असताना सांस्कृतिक, धार्मिक, भाषिकदृष्ट्या बहुजिनसी भारतात गेल्या सहा दशकात लोकशाहीचा प्रयोग यशस्वी होत आहे हे निश्चितच गौरवास्पद आहे. परंतु हे एवढंच पुरेसं आहे का?

राजकीय लोकशाहीबरोबर सामाजिक लोकशाहीची गेल्या सहा दशकातील भारताची वाटचाल आपणास काय सांगते? नागरिकांचे एकंदर देशाच्या प्रगतीवर स्थान काय अन् कुठे आहे हा प्रश्न आहे. राजकीय लोकशाहीबरोबर

सामाजिक लोकशाहीची गेल्या काही दशकातील भारताची वाटचाल आपणास काय सांगते?

बालमृत्यू, कुपोषण, भूक, स्त्री भ्रूणहत्या, साक्षरता, सार्वत्रिक लसीकरण, प्राथमिक आरोग्य या बाबतीत आपल्याला केव्हाच मागे टाकले आहे. आणि आपण मात्र मानव विकास निर्देशांक पाकिस्तानपेक्षा काही अंश पुढे आहोत यातच समाधानी आहोत. सेन, ड्रीझ यांच्या या पुस्तकातील माहिती आणि आकडेवारी अस्वस्थ करणारी, पण वास्तव आहे. अर्थशास्त्र हे शास्त्र समाजाच्या सर्वात तळाच्या माणसाचा विकास हा सेन यांच्यात अभ्यासाचा मुख्य विषय आहे. सेन, ड्रीझ हे लोकशाहीचे समर्थनच करतात. पण समाजात विषयमता वाढीस लागल्यास लाभार्थी व वंचित यांच्यातील दरी रूंदावू लागल्यास समाजात ताण वाढतो आणि हा ताण लोकशाहीचा पाया कमकुवत करू शकतो. देशातल्या दुर्गम आदिवासी भागात झपाट्याने फोफावलेला नक्षलवाद हे त्याचेच एक उदाहरण. यामुळे लोकशाही प्रणाली अधिक भक्कम करायची असेल तर समाजाच्या सर्व स्तरापर्यंत विकास प्रक्रिया कशी पोहोचेल हे देखील पाहिलं पाहिजे.

आज उशिरा का होईना, भारतात सर्वशिक्षा अभियान, जननी सुरक्षा योजना, निर्मल गाव अभियान राबवले जात आहेत. परंतु या सर्व योजनांची यशस्विता शेवटी इथल्या व्यवस्थेच्या प्रामाणिकपणावर अवलंबून आहे.

• • • •

# आजादी का अमृत महोत्सव

सय्यद तौफिक रफिक
बी.ए.द्वितीय वर्ष

आजादी का अमृत महोत्सव
युँ ही नही आ गया।
१५ अगस्त सन १९४७ को
लाल किले पर तिरंगा
युही नही फरह गया।
हजारो देश भक्तों की
कुर्बानी है इसके पिछे
आजादी के दिवाने की
कहानी है इसके पिछे।
१२ मार्च १९३० को
साबरमती से गांधी चले थे
सत्य अहिंसा की तलवारो से
गांधी जी लढें थे।
भगतसिंह के खुन में
देश भक्ती दौड रही थी
चंद्रशेखर आजाद ने
आजार हिंद फौज खडी की थी।
गुलामी की बेडीयों को तोडकर
हम स्वतंत्र भारत बने थे।
हर गली मोहल्ले में
आजादी के गाने बज रहे थे।
आज आजादी का अमृत महोत्सव
मनाया जा रहा है।
आजादी का ७५ वी वर्षगाँठ का
इंतजार किया जा रहा है।

# भारताची राजकीय वाटचाल

**कु. बदमे वैष्णवी जगदीश**
बी.ए. तृतीय वर्ष

एकाच पक्षाला बहुमत मिळणे हे काही २०१४ आणि २०१९ मध्ये प्रथमच घडलेले नाही. किंबहुना स्वतंत्र भारताच्या इतिहासात अनेक दशके काँग्रेसकडे स्पष्ट बहुमत होते परंतु त्याकाळी हा प्रश्न फारसा उद्भवला नाही.

१९५१-५२ मध्ये एकूण जागा ४८९ होत्या त्यात काँग्रेस पक्षाकडे ३६४ म्हणजे ७४.४३% जागा होत्या. १९५७-५८ मध्ये एकूण जागा ४८९ होत्या तर पुन्हा एकदा काँग्रेस पक्षाकडे ३६४ म्हणजे ७४.४३% जागा पुन्हा काँग्रेसकडेच होत्या. १९८४ मध्ये एकूण जागा ५४३ असताना काँग्रेस पक्षाकडे ३७१ म्हणजेच ७५.१०% जागा होत्या. आता, २०१४ मध्ये भाजपकडे ५४३ पैकी फक्त २८२ म्हणजे ५१.९३% जागा तर २०१९ मध्ये ३०३ म्हणजे फक्त ५५.८०% जागा भाजपकडे आहेत तरीही असा प्रश्न यावा म्हणजे आश्चर्यच आहे!



२०१४ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत १६५०+ पक्षांनी सहभाग घेतला, जी संख्या २०१९ मध्ये २२००+ वर गेली आहे. यात जेमतेम १०० पक्षांना एखादी जागा मिळते. म्हणजेच बाकीच्या पक्षांना फारसे काही स्थान नसते. सध्या स्थानिक पक्षाचे पेव फुटलेले आहे ज्यांना काही अपवाद सोडता राजकारणात काहीही स्थान नाही. त्यामुळे भारताची परिस्थिती 'एक देश एक पार्टी' या दिशेने चालली आहे असे वाटत नाही.

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. जगात जितके धर्म व पंथ असतील त्या सर्वांचे अस्तीत्व थोड्या फार प्रमाणात येथे आहेच. भारतातील मान्यताप्राप्त राजभाषाच २० पेक्षा अधिक आहेत. शिवाय इतर भाषा व बोलीभाषा आहेत, त्या वेगळ्याच. भारतात २८ राज्य व ८ केंद्रशासित प्रदेश आहेत व यांचे हितसंबंध कित्येक वेळा वेगवेगळे असतात. बऱ्याच वेळा तर दोन किंवा अधिक राज्याचे हित अगदी विरुद्ध असते. त्यामुळे प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व कायम राहणारच यात शंका नाही.

आपण म्हणू शकाल की युएसए किंवा ऑस्ट्रेलिया हे भारतापेक्षा मोठे देश आहेत.

अमेरिकेची पन्नास राज्य आहेत, मग तेथे असे परस्पर विरोधी हितसंबंधाचे प्रश्न उद्भवत नाही का? तर याचे उत्तर असे की, अमेरिका हा अगदी नव्याने निर्माण झालेला देश आहे. त्यामुळे तेथे भारतापेक्षा मोठे देश आहेत, अमेरिकेची पन्नास राज्य आहेत. ऑस्ट्रेलिया हा भारतापेक्षा मोठा देश आहे. त्यामुळे त्यात भारताएवढी संस्कृती दिसून येत नाही.

आपण असे म्हणू शकतो की, अमेरिकेची राज्य ही राज्यकारभाराच्या सोयीकरिता केलेले तुकडे आहेत तर भारतीय राज्य ही हजारो वर्षांच्या सांस्कृतिक मंथनातून नैसर्गिकरित्या तयार झाली आहेत. इतकी विविधता व परस्परविरोधी हितसंबंध असून देखील या सर्व राज्याचा मिळून एक भारत देश बनवणारी कोणती मजबूत अटूट शृंखला अथवा शक्ती आहे ते थोड्या शब्दात सांगणे आवश्यक आहे. शिवाय ते विषयांतर होईल, परंतु प्रादेशिक अस्मिता थोड्याफार प्रमाणात राहिलच व प्रादेशिक पक्ष व त्याचा प्रभाव कमी जास्त प्रमाणात राहीलच. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसमुक्त भारताची घोषणा केली आहे. परंतु तसे होणे तर सोडा, आज परिस्थिती अशी बनत चाललेली आहे की, भाजपा हाच काँग्रेसयुक्त बनत चालला आहे. सत्तेत भागीदार कर्ता सत्तालोलूप लोक भाजपात येत आहेत. याउपर या लोकांच्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत तर ते भाजपाला नासवून टाकतील. तेव्हा लोकांना पर्याय शोधावा लागेल.

भारतीय लोकशाही आता निश्चित झाली आहे की, जर कोणी जबरदस्तीने एक पक्षीय सत्ता आणायला निघाले तर जनता त्यांचाच बंदोबस्त करेल. तात्पर्य हे की, भारताची वाटचाल एक पक्ष या दिशेने चालली आहे असे समजणे चुकीचे आहे. स्वतंत्र झालेल्या भारत देशात काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष म्हणून खूप वर्ष होता, त्यावेळी दोन खासदारांपासून भाजपने सुरुवात केली होती. अर्थ असा की, सबके दिन आते है... मला असे वाटत नाही.

• • • • • • •

# अमुची संस्कृती नी विकास...

**कु. दीक्षित अंकिता बळवंत**

बी.ए.तृतीय वर्ष

समृद्धीच्या वाटेवरती असले जरी काटे
लढणारे आम्ही वीर ना अडखळू त्या वाटे
संस्कृती अमूची छत्रपती नी आंबेडकरांची
संकटापुढे ना धडपडणारी नी लडखळणारी
जिद्द नी विश्वास आमुचे शस्त्र
कौटील्याची कुटनीती नी छत्रपतीचा गनिमीकावा
अमुचे अस्त्र
आले कितीही तुफान कल्पवृक्षा परी
पुन्हा झेपासून उभे राहू
वीर शुरांच्या रक्ताने घडवलेल्या संस्कृतीला
कायम ठेवू
काळाप्रती बदल ही आवश्यक
भूमी-प्रती आदर नी संस्कृती
संस्कृती आणि बदलाचा युगप्रवर्तक अमूचा युवा
धागेदोरे भविष्याचे आहे त्याच्या जीवा
येवो करोना अथवा महामंदी
होवो किती युद्ध
राखेतून आकाशाकडे झेपावणाऱ्या
फिनिक्स सारखी आमुची जिद्द
आर्थिक वृद्धीसाठी घडेन युवा उभारेल उद्योग
राजकारणातले अमुचे मास्टर माईंड
घडवून आणतील सुयोग
कीड तर लागते काळानुकाळ पडिक लाकडाला
परंतु पुरातन विचारावर वैज्ञानिक
संशोधनाचा मुलामा
देऊन चिरकाळ टिकणाऱ्या त्या संस्कृतीला

# भारताची आर्थिक वाटचाल

**सय्यद इम्रोज निसार**
बी.ए. तृतीय वर्ष

भारताची अर्थव्यवस्था ही अमेरिकेन डॉलरच्या विनिमयाच्या दरात मोजल्यास जगातील १२ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. भारताचे वाषिक सकल उत्पन्न १,०८९ अब्ज डॉलर एवढे आहे (२००७). क्रयशक्तीच्या समानतेचा निष्कर्ष लावला तर भारताच्या अर्थव्यवस्थेचा जगात तिसरा क्रमांक लागतो.

जगातील सर्वात वेगात वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा चीन पाठोपाठ दुसरा क्रमांक आहे. भारताचा आर्थिक विकासदर २००६-०७ या आर्थिक वर्षात ९.४% एवढा आहे. परंतु अतिशय मोठ्या लोकसंख्येमुळे भारताचे वार्षिक दरडोई उत्पन्न मात्र ९६१ डॉलर एवढेच आहे, तर क्रयशक्ती वर आधारित वार्षिक दरडोई उत्पन्न ४,१८२ डॉलर एवढे आहे. जगातील बँक भारताची 'अल्प आय असणारी अर्थव्यवस्था' अशी गटवारी करते.

भारताच्या अर्थव्यवस्थेत खूपच वैविध्य दिसून येते. शेती, हस्त व्यवसाय, कापड गिरण्या, उद्योग धंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक गोष्टींचा समावेश यामध्ये होतो. भारतात काम करणाऱ्या लोकांपैकी दोन तृतीयांश लोकांचा उदरनिर्वाह अजूनही शेती अथवा शेतीशी संबंधित उद्योगावर चालतो. परंतु अर्थव्यवस्थेत विविध प्रकारच्या सेवांचाही वाढता वाटा आहे आणि अलिकडे महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. अलिकडील काही वर्षात भारतातील संगणक तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे तसेच उच्चशिक्षित आणि इंग्रजी बोलू शकणाऱ्या वाढत्या तरूण पिढीच्या प्रगतीमुळे भारत हळूहळू सर्व जगात बाह्यस्त्रोताच्या सेवा पुरवणारा देश म्हणून भूमिका बजावू लागला आहे.

भारत हा अतिकुशल तंत्रज्ञ पुरवणारा जगातील सर्वात मोठा निर्यातक आहे. याचबरोबर उत्पादन, औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, अतिसूक्ष्म तंत्रज्ञान, दूरसंचार, विमान निर्माण आणि पर्यटन या क्षेत्रांमधील भारताची क्षमताही वेगाने वाढताना दिसत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या बऱ्याचशा काळात भारतामध्ये समाजवादी अर्थव्यवस्थेचा मार्ग अवलंबण्यात आला. भारतात होणाऱ्या थेट गुंतवणुकीवर कडक बंधने होती. मात्र ९० च्या दशकात सुरुवातीपासून भारताने हळूहळू परकीय गुंतवणुकीवरील आणि व्यापारावरील नियंत्रण कमी करून आपली अर्थव्यवस्था आर्थिक सुधारांद्वारे खुली करायला सुरुवात केली आहे.

राजकारणातील मतभेद आणि भिन्न विचारधारांमुळे सरकारी उद्योगांचे खाजगीकरण

आणि भिन्न विशिष्ट क्षेत्रांमधील खाजगी आणि परकीय सहभागाला मार्ग खुला करणे अशा आर्थिक सुधारणांमधील काही महत्त्वाच्या गोष्टी मंद गतीने पुढे सरकत आहेत.

अतिशय वेगात वाढणारी लोकसंख्या आणि वाढती आर्थिक, सामाजिक विषमता हे भारतापुढील महत्त्वाचे प्रश्न आहेत. गरीबी हा देखील गंभीर प्रश्न आहे. मात्र स्वातंत्र्यप्राप्ती नंतर गरीबीचे प्रमाण बरेच घटत असल्याचे दिसते. अधिकृत चाचणीनुसार २००४-०५ मध्ये भारतातील २७% जनता दारिद्र्यरेषेच्या खाली होते. दारिद्र्य कमी करण्यासाठी त्यांच्या अडचणी दूर करण्याची गरज आहे. भारताचा आर्थिक इतिहास तीन कालखंडांमध्ये विभागता येतो. १७ व्या शतकापर्यंतचा ब्रिटीशांच्या राजवटी आधीचा कालखंड, ब्रिटीशांच्या राजवटीचा कालखंड आणि स्वातंत्र्योत्तर कालखंड. १९९१ नंतर महत्त्वाचे बदल केले गेले.

भारतामध्ये इ.स. पूर्व २८०० पासून इ.स. पूर्व १८०० पर्यंत सिंधू नदीच्या खोऱ्यामध्ये सिंधू संस्कृतीचा विकास झाला. सिंधू नदीच्या खोऱ्यातील या संस्कृतीतील बहुअंशी लोकांचे प्रामुख्याने शहर हेच राहण्याचे ठिकाण होते. हे लोक उदरनिर्वाहासाठी प्रामुख्याने शेती हा व्यवसाय करीत असत. तसेच प्राणी पाळत असत. तसेच शस्त्रे आणि हत्यारे यांचा वापर करीत. अन्य शहरांशी व्यापर करीत असत.

१८७२ च्या जनगणनेनुसार आत्ताच्या भारताच्या प्रदेशामध्ये ९९.३% लोक हे खेड्यांमध्ये राहत असत. या खेड्यांच्या अर्थव्यवस्था बहुअंशी एकमेकांपासून वेगळ्या आणि स्वतंत्र होत्या. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय होता. कापड विणणे, खाद्य पदार्थ बनवणे अशा खेड्यातील बाकीच्या हस्त व्यवसायांच्या गरजा शेतीतूनच पुरवल्या जात. त्यावेळच्या विविध सत्ताधाऱ्यांनी मान्यता दिलेली विविध नाणी प्रचलित होती; पण व्यापारासाठी चलनाचा वापर कमी होत असे. खेड्यातील व्यापार मुख्यत्वे वस्तुविनिमय अथवा मालाच्या अदलाबदलीतूनच होत असे. शेतकरी आपल्या महसुलातील काही भाग सत्ताधाऱ्यांना सोपवीत व हस्त कामगारांना त्यांच्या सेवांबद्दल शेतकऱ्यांकडून हंगामानंतर पिकांच्या उत्पादनातील काही वाटा मिळत असे. ते लोक वस्तू विनिमयाची पद्धत वापरत असल्याने ते माप चुकीचे होते हे लक्षात आल्यानंतर त्यांनी त्यात बदल केला.

अर्थव्यवस्थेच्या घडणीमध्ये धर्म, विशेषत: हिंदू तसेच एकत्र कुटुंब पद्धती आणि भारतातील जाती पद्धती यांचीही मोठी भूमिका होती. भारत हा विविध जाती धर्मानी बनलेला देश आहे. तसेच कुशल कामांच्या ज्ञानाचे पुढच्या पिढीला हस्तांतरण सहज शक्य झाले. काही विशेष व्यवसायांमधील कुटुंब त्याच व्यवसायांमध्ये पिढ्यान् पिढ्या काम करत असल्याने त्या विषयात अतिशय नैपुण्य मिळवणेही त्यांना शक्य झाले.



# स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक क्षेत्राचा विकास

**कु. पाटील मयुरी दयानंद**
बी.ए. प्रथम वर्ष

शेती एकूण उत्पन्नात भारताचा जगात दुसरा क्रमांक आहे. २००५ मध्ये शेती व लाकुडतोड, जंगल संवर्धन आणि मासेमारी अशा इतर संबंधित व्यवसायांचा भारताच्या वार्षिक सकल उत्पन्नामध्ये २८.६% इतका वाटा होता आणि या व्यवसायामध्ये कामगारांपैकी ६०% लोक काम करत होते. वार्षिक सकल उत्पन्नातील शेतीचा वाटा सतत घटत आहे, परंतु अजूनही शेती हाच अर्थव्यवस्थेचा सर्वात मोठा घटक आहे व भारताच्या अर्थ-सामाजिक विकासामध्ये या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. भारताच्या पंचवार्षिक योजनांमध्ये शेतीला नेहमी प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच सरकाकडून शेतकऱ्यांना अनुदाने, कर्ज व इतर सोयी वेळोवेळी पुरवण्यात आल्या. भारतातील हरितक्रांतीपासून शेती तंत्रज्ञान व सिंचन पद्धती यामध्येही सतत सुधारणा होत आहे. यामुळे शेतीचे दर एकारामागील उत्पन्न १९५० पासून सतत वाढत आहे, परंतु आंतरराष्ट्रीय उत्पन्नावरील तुलना केली तर भारतातील शेतीची उत्पन्न क्षमता जगातील सर्वाज जास्त उत्पन्नक्षमतेच्या सर्वसाधारणपणे ३०% एवढीच असते असे दिसते.

भारतातील शेतीच्या तुलनात्मक अल्प उत्पादन क्षमतेची काही कारणे पुढीलप्रमाणे आहेत-

१. निरक्षरता, सर्वसाधारण अर्थ-सामाजिक प्रगतीचा अभाव, जमीन कायद्यातील सुधारणांची संथ गती आणि शेती उत्पादनासाठी अकार्यक्षम अथवा अपुऱ्या वित्तसेवा आणि त्याच्या विक्री व वितरणासाठीच्या अपुऱ्या सुविधा.

२. भारतात शेतजमिनीच्या मालकीचे सरासरी क्षेत्रफळ इतर देशांपेक्षा तुलनेने कमी आहे (२०००० मीटर वर्ग अथवा कमी). तसेच जमिनीच्या मालकीचे वरील कमाल मर्यादेचे कायदे आणि काही बाबतीत कुटुंबातील तंटे यामुळे जमिनीची अधिकच छोटी विभागणी होण्याकडे कल असतो आणि त्यामळे छुपी बेरोजगारी वाढते आणि शेतकामगारांची कार्यक्षमता कमी होते.

३. आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि आधुनिक साधन सामग्री यांचे अंगीकरण भारतात अजूनही हवे तितके झालेले नाही. अशा तंत्रज्ञानाबद्दलचे अज्ञान, साधन सामग्रीच्या अधिक किंमत आणि

अल्प जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांसाठी अशा साधनसामग्रीच्या उपयोगाची अव्यवहारिकता.

**४.शेतीच्या अपुऱ्या जलसिंचन सुविधा :**

२००१ भारतातील शेत जमिनीपैकी केवळ ५३.६% जमीन जलसिंचनाखाली होती. यामुळे शेतकऱ्यांना अजूनही सिंचनासाठी पावसावर अवलंबून रहावे लागते. चांगला मौसमी पाऊस झाला तर अर्थव्यवस्थेत जोरात सुधारणा होते. दुष्काळाच्या काळात अर्थव्यवस्थेची वाढ मंदावते. तसेच शेतकऱ्यांना दिले जाणारे कर्ज नाबार्ड या वित्त संस्थेकडून नियंत्रित केले जाते. ही भारतातील ग्रामीण विकासाला मदत करणारी मुख्य बँक आहे.

**उद्योग :**

कारखान्यांच्या एकूण उत्पादनानुसार क्रमवारीत भारताचा जगात १४ वा क्रमांक आहे. भारताच्या कामगारांमधील १२% लोक औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करतात. औद्योगिक क्षेत्राचे उत्पन्न भारताच्या वार्षिक सकल उत्पन्नाच्या २८% एवढे आहे. आर्थिक सुधारणांनंतर भारतीय उद्योगांची आणि विदेशी उद्योगांची स्पर्धा वाढली. याचबरोबर सार्वजनिक उद्योगांसाठी राखून ठेवलेली बरीच क्षेत्रे खाजगी उद्योगासाठी खुली करण्यात आली. तसेच बऱ्याच सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरणही करण्यात आले. यामुळे उद्योगांमधील स्पर्धा वाढून भारतीय उद्योगांची कार्यक्षमता वाढण्यास मदत झाली आणि जलद गतीने वापरल्या जाणाऱ्या मालाच्या उत्पादन क्षमतेची प्रचंड वाढ झाली.

भारताच्या खाजगी क्षेत्रातील उद्योगांमध्ये आर्थिक सुधारांपूर्वी औद्योगिक घराणेशाहीचा बराच प्रभाव होता. विदेशी उद्योगांना टक्कर द्यायला या उद्योगपतींना राजकारण्यांशी संबंध राखून त्यांच्याकडून उद्योगांसाठी सवलती घेण्याची गरज पडे. अर्थव्यवस्था खुली झाल्यापासून अशा विशेष सवलती अथवा अनुदाने मिळणे कमी झाले. परंतु यामुळे विदेशी उद्योगांच्या तुलनेत मागे न पडता उलट भारतीय उद्योगांची स्पर्धात्मकता वाढत आहे असे दिसते. फोर्ब्स ग्लोबल २००० या फोर्ब्स नियतकालिकेमध्ये निघणाऱ्या उद्योगांच्या जागतिक क्रमवारीत भारताच्या ३४ कंपन्यांचा समावेश आहे.

**सेवा:**

सेवा क्षेत्राच्या उत्पन्नामध्ये भारताचा जगात १५ वा क्रमांक आहे. सेवा क्षेत्रात देशातील २३% कामगार काम करतात. या क्षेत्राचा अलिकडे वेगाने विकास होताना दिसत आहे. १९५१-८० मध्ये सेवा क्षेत्राचा विकास ४.५% इतक्या दराने होत होताना १९९१-२००० या काळात सेवा क्षेत्राचा विकास ७.५% दराने झाला. भारताच्या वार्षिक सकल उत्पन्नामध्ये या क्षेत्राचा सर्वात मोठा (५३.८) वाटा आहे. १९५० मध्ये हा वाटा फक्त १५% इतका होता. सेवामध्ये व्यवसाय संबंधित (माहिती तंत्रज्ञानाच्या सेवा, माहिती तंत्रज्ञान उपयोजित सेवा, व्यवसाय प्रणालीच्या बाह्य स्त्रोताच्या सेवा) उत्प्ननाच्या सेवा उत्पन्नाचा वाटा २००० मध्ये एक तृतीयांश इतका होता.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा वेगाने विकास होण्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत- पुरवठ्याच्या बाजूस इतर देशांपेक्षा कमी किमतीत काम करणाऱ्या आणि इंग्रजी बोलता येणाऱ्या उच्च शिक्षित तंत्रज्ञांची मुबलक उपलब्धता हा महत्त्वाचा घटक आहे तर मागणीच्या बाजूस परकीय ग्राहकांकडून भारतातील स्वस्त आणि चांगल्या प्रतीच्या माहिती तंत्रज्ञान सेवांना वाढती मागणी, तसेच परदेशातील कंपन्यांचा बाह्यस्त्रोताकडे वाढता कल हे कारण आहे. मात्र, भारताकडून होणाऱ्या निर्यातीला हातभार लावण्यास भारतातील माहिती तंत्रज्ञान आणि संबंधित उद्योगाची वाढती भूमिका असूनही २००३ मध्ये या उद्योगाचा वार्षिक सकल उत्पन्नातील वाटा केवळ १% इतका होता. तसेच या उद्योगांचे एकूण उत्पन्न सेवा क्षेत्रांच्या उत्पन्नाच्या १/५० इतकेच होते.

**बँक आणि इतर वित्तसेवा :**

भारतातील वित्त वितरण व्यवस्थेची दोन मुख्य अंगे आहेत -

१) अधिकृत क्षेत्र - खाजगी, सार्वजनिक व विदेशी बँका व सहकारी बँका

२) अनधिकृत क्षेत्र - सावकार, व्यक्तीश: कर्ज देणाऱ्या पतसंस्था तसेच इतर वित्त संस्था.

अजूनही भारतातील ग्रामीण आणि उपनगरी भागात सणासुदीला किंवा कार्यप्रसंगी बँकांकडून कर्ज न घेता अनधिकृत क्षेत्रातील व्यक्तीकडून पैसे घेणे पसंत केले जाते.

पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९६९ मध्ये १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यानंतर १९८० मध्ये आणखी ६ बँकांचा त्यात समावेश करण्यात आला. याचबरोबर बँकांना आपल्या एकूण पतपुरवठ्यापैकी ४०% (आताचा दर १०%) पत शेती, लघुउद्योग, किरकोळ व्यापार अशा विशेष क्षेत्रांसाठी राखून ठेवणे बंधनकारक केले गेले. बँकांच्या एकूण शाखा १९६९ मधील १०,१२० पासून २००३ मध्ये ९८,९१० इतक्या वाढल्या आहेत. तर प्रत्येक शाखेमागे ग्राहकसंख्या याच काळात ६३,८०० पासून १५,००० इतकी घटली आहे. बँकांच्या एकूण ठेवीमध्ये १९५१-१९७१ मध्ये ७ पट वाढ झाली तर १९७१ पासून १९९१ पर्यंत ठेवीमधील वाढ ३२.३ पट एवढी होती. बँकांच्या ग्रामीण शाखांमध्ये जरी १९६९ मधील १८६० अथवा एकूण शाखांच्या २२% पासून ३२,२६० अथवा ४८% एवढी वाढ झाली असली तरी देशातील पाच लाखांपैकी ३२,२६० खेड्यांमध्येच अधिकृत बँकांच्या शाखा आहेत.

अर्थव्यवस्था खुली करायला सुरुवात केल्यापासून भारत सरकारने बँकांच्या सेवांमध्येही मोठ्या प्रमाणात आर्थिक सुधारणांना मान्यता दिली आहे. यातील काही सुधार (जसे विलीनीकरणास प्रोत्साहन, सरकारचा हस्तक्षेप कमी करणे व नफा कार्यक्षमता आणि स्पर्धात्मकता वाढवण्यावर भर) राष्ट्रीयकृत बँकांशी संबंधित आहेत. तर इतर सुधारांमध्ये बँका आणि विम्याच्या सेवांमध्ये खाजगी व परकीय सहभागावर भर देण्यात आला आहे.

• • • •

# भारतीय स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी

**कु. भोसले अपर्णा राजकुमार**
बी.ए. तृतीय वर्ष

१५० वर्षांपेक्षा जास्त काळ पारतंत्र्यात राहून १५ ऑगस्ट १९४७ रोजी जे स्वातंत्र्य भारताला प्राप्त झाले त्याला ७५ वर्षे पूर्ण झाली. १५ ऑगस्ट या दिवशी आपण 'भारतीय' म्हणून एकत्र येत असतो. एकतेचे यापेक्षा चांगले उदाहरण आपणाला इतर वेळी पहायला मिळत नाही. आपल्या देशाची संस्कृती फार प्राचीन आहे. देशाच्या स्वातंत्र्याचा मोठा इतिहास आपल्यापुढे उभा आहे. सार्वभौम, समता, लोकशाही असल्याचा आपल्याला अभिमान आहे. तसेच या ७५ वर्षात विज्ञान, तंत्रज्ञान, दळण-वळण, उद्योगधंदे या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल घडून आला आहे. एकंदरीत या सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे.

जगामध्ये आपले एक वेगळे स्थान निर्माण करण्यास भारत देश सफल झाला आहे. उद्योग, कृषी, विज्ञान, तंत्रज्ञान या क्षेत्रात जरी भरभराट झाली असली तरी रोजगार निर्मितीच्या बाबतीत मात्र भारत खूप मागे आहे. ५०% तरूण असणाऱ्या देशामध्ये बेरोजगारीचा दरही खूप जास्त आहे. खरंच आपली प्रगती होत आहे का? असा प्रश्न पडतो.

जरी आजच्या घडीला भारत हा विकसनशील देश असला तरी आणखी आपल्या देशातील काही प्रदेशात, गावात, खेड्यात, वीज, पाणी, रस्ते, शिक्षण अशा आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध नाहीत. खरंच आपला विकास होत आहे? एकेकाळी जीडीपीचा ५०% हिस्सा असलेल्या कृषी क्षेत्रात आज आधुनिकीकरण तर

झाले आहे पण शेतकऱ्यांच्या आत्महत्याही वाढत आहेत. आपण खरंच आधुनिक होत आहोत?

'धर्मनिरपेक्ष' म्हणवल्या जाणाऱ्या या बलाढ्य देशात जातीच्या नावावर 'वोट' मागितले जातात. राजकीय पक्ष हे 'जातीवादी पक्ष' बनले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान व्यक्तींनी जातीवाद नष्ट करण्याचा प्रयत्न केला; पण हेच महान व्यक्ती आता जातीमध्ये वाटले गेले आहेत. यापेक्षा मोठे दुर्दैव ते काय? तर आपण खरंच धर्मनिरपेक्ष आहोत का? आज भारतीय समाज हा सुशिक्षित, सुधारलेला असला तरी या समाजामध्ये आजही स्त्रिया निर्भिडपणे स्वतंत्र वावरू शकत नाहीत. या देशात आजही बलात्कारासारखे अपराध सततच घडत आहेत. खरंच आपला समाज सुधारत आहे?

आरोग्याच्या बाबतीत मात्र भारत हा प्रगतीपथावर आहे. कधीकाळी अपुऱ्या आरोग्य सुविधा असणाऱ्या भारताने कोविड-१९ सारख्या महामारीच्या काळात सर्व जगाला मदतीचा हात पुढे केला. जगातील सर्व देशांना औषधे पुरवण्याचा प्रयत्न केला.

तसेच भारत हा अतिकुशल तंत्रज्ञ पुरवणारा जगातील सर्वात मोठा निर्यातक आहे. याचबरोबर, उत्पादन औषध निर्मिती, जैवतंत्रज्ञान, अतिसुक्ष्म तंत्रज्ञान, दूरसंचार, जहाज निर्माण, विमान निर्माण आणि पर्यटन या क्षेत्रामधील भारताची क्षमताही वेगाने वाढताना दिसत आहे. तसेच भारतीय अर्थव्यवस्था ही ७५ वर्षात भरभराट करत असून भारताची अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलरच्या विनिमयाच्या दरात मोजल्यास जगातील १२ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे.

स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या गेल्या ७५ वर्षांमध्ये भारताचा जागतिक पातळीवरील प्रभाव वाढत गेलेला आहे. इतर देशांबरोबरच्या संबंधामध्ये समतोल साधण्यापासून ते इतर देशांचे नेतृत्व करण्यापर्यंत. दक्षिण आशियातील प्रादेशिक सत्तेपासून ते आशिया खंडातील अग्रगण्य देश बनण्यापर्यंत, इतर आंतरराष्ट्रीय मोठ्या संस्था, संघटनांनी दिलेला आदेश किंवा घेतलेल्या निर्णयांचे निमूटपणाने पालन करण्यापासून ते आंतरराष्ट्रीय संस्था-संघटनांचा अजेंडा ठरवण्यापर्यंत, भारताचा आंतरराष्ट्रीय स्तरावरचा झालेला प्रवास हा अत्यंत महत्त्वपूर्ण स्वरूपाचा आहे.

दु:ख, दारिद्र्य, रोगराई, दुष्काळ, निरक्षरता, सीमावाद अशा खूप गोष्टींचा सामना करत गेल्या ७५ वर्षात भारत प्रगती करत आहे. पण आजही भारतीय समाजातील काही घटक या सर्व विकासापासून अलिप्त आहे. आदिवासी भागामध्ये मोठ्या प्रमाणात कुपोषणाचे प्रमाण आहे. आज भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करताना आपण काय कमावले काय गमावले व आपणाला कोणते उद्देश गाठायचे आहेत याचा विचार करणे आवश्यक आहे.

• • • •

# आम्ही भारतीय व अमृत महोत्सव

**कु. मगर प्रिती हणमंत**
बी.ए. द्वितीय वर्ष

''एकच तारा समोर
आणिक पायतळी हंगार
गर्जा जयजयकार क्रांतीचा
गर्जा जयजयकार''

कवी कुसुमाग्रज यांनी केलेल्या या आवाहनाचे सार्थक होण्यास १५ ऑगस्ट १९४७ चा दिवस उजाडला. पक्षी पिंजऱ्यातून उडाला. स्वातंत्र्याची रम्य प्रभात उजाडली. असंख्य बलिदानांचे सार्थक झाले आणि भारताला पारतंत्र्यातून मुक्तता मिळून स्वातंत्र्य मिळाले. बघता-बघता स्वातंत्र्याचा प्रवास ७५ वर्षांचा होत आहे. आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. एखाद्या राष्ट्राच्या जीवनात ७५ वर्षांचा कालखंड हा जरी फार मोठा टप्पा नसला तरी, राष्ट्रातील नागरिकांच्या जीवनात स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण करणे अनन्ससाधारण महत्त्वाचे आहे.

स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सवात आपली स्वातंत्र्यांच्याविषयी कोणती स्वप्ने होती? स्वातंत्र्याकडून आपल्या कोणत्या अपेक्षा होत्या? आज सत्य काय आहे? कुठे होतो आपण आता कुठे आहोत? उणिवा काय राहिल्या आणि आता भविष्यात कशी पावले उचलावी लागतील



याचा विचार आपल्याला करायला लागेल. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवात आपण काय कमावलं आणि काय गमावलं? याचे सिंहावलोकन करण्याच्या टप्प्यावर आपण येऊन पोहोचलो आहोत. भारत हा नैसर्गिक साधन संपत्ती आणि खनिज समृद्ध देश आहे. एकूणच आपला भारत देश 'सुजलाम सुफलाम' आहे.

आपल्या देशाला पौराणिक आणि ऐतिहासिक संस्कृतीचा वारसा लाभला आहे. अनेक जाती धर्माचे, भाषांचे लोक येथे एकत्र नांदत आहेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर यांसारख्या थोर संतांची भूमी असलेल्या आपल्या देशाची संस्कृती आज जागतिक पातळीवर सर्वश्रेष्ठ संस्कृती मानली जाते. भारत एकाच वेळी अध्यात्मात आणि विज्ञानातही अग्रेसर होत आहे. अनेक खेळ प्रकारात भारताने जागतिक दर्जाची कामगिरी केली आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात गेली ७५ वर्षे साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती या क्षेत्रांमध्ये नामवंत लेखक, साहित्यिक व कलावंतांनी आपला अमीट ठसा उमटवला आहे.

पण असे असले तरी एकीकडे प्रगती होत आहे आणि दुसरीकडे अनेक गोष्टी आपल्याला वेदना देत आहेत. स्वातंत्र्यासाठी अनेक शुर वीरांनी ऐन तारुण्यात बलिदान दिले. आपले संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्यासाठी खर्च केले. स्वातंत्र्यांसाठी त्यांनी रक्ताचा सडा सांडला. पण आम्ही मात्र रक्ताचा घाऊक बाजार मांडला असं कधीकधी उगाच वाटतं. चीन-पाकिस्तान सारख्या परकीय शक्ती सीमेवर आक्रमणाच्या तयारीत असतात. देशामध्ये दहशतवादी हल्ले होतात. उरी, पुलवामा सारख्या रक्ताळलेल्या आठवणी आपल्याला दुःख देतात. या देशातल्या शेतकऱ्याला आपल्या हक्कांसाठी आंदोलन करावे लागते. अनेक गरिबांना एक वेळेचे जेवण सुद्धा मिळत नाही. स्वर्गासारखा काश्मिर गुलाबाच्या सुगंधाने दरवळत राहण्याऐवजी रक्तात रंगताना पहायला मिळतो. धर्माच्या नावावरून जातीय दंगली होतात, तेव्हा भारत मातेच्या हृदयाचे शेकडो तुकडे होतात. एकाच आईची लेकरे एकमेकांच्या रक्तासाठी तहानलेली असतील तर... त्या आईची काय अवस्था होत असेल?

या साऱ्या आक्रमणांमध्ये अतिशय सामान्य माणूस भरडला जातो. जळणारी झोपडी आणि करपणारे रक्त मात्र भारतीयच आहे हे आपण का विसरतो हा खरा प्रश्न आहे. भ्रष्टाचाररूपी यंत्रणेमुळे मोठी व्यवस्था पोखरली जाते. रोज मोठ्या अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक होते, तेव्हा ज्यांच्या हाती आपण देशाची प्रशासन व्यवस्था सोपवली आहे तेच भ्रष्टाचाराने बरबटलेले पाहून असंख्य वेदना होतात. तुरुंगात असताना अनेक गुन्हेगार निवडणुका जिंकतात. दरवर्षी मोठमोठे घोटाळे उघडकीस येतात. सामान्य माणसाच्या हक्काची भाकरी गिळंकृत करणारी मंडळी या देशाचे मारेकरी आहेत. सत्यमेव जयते हे ब्रीदवाक्य आपल्या देशाची शान आहे. परंतु अशा दृष्ट प्रवृत्तीमुळे देश शोकग्रस्त होतो. कधी कधी देशासाठी फासावर चढणारे तरूण, अवघ्या चौदाव्या वर्षी शरीरावर गोळी खाणारे शिरीष कुमार यासारखे तरूण पाहिले तर आजच्या या

तरूण पिढीकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ त्यांना कधी कळेल का? असा प्रश्न पडतो.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपल्याला एक गोष्ट मान्यच करावी लागेल की, भारतीय स्वातंत्र्याने आपल्याला खूप काही दिले आहे. परंतु जो असमाधानाचा, असंतोषाचा सूर निघत आहे त्याला आपणच जबाबदार आहोत. आपली आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक प्रगती झाली पण मुल्यांचा ऱ्हास होत गेला. म्हणूनच एकीकडे आपण वैज्ञानिक प्रगतीच्या मार्गाने झपाट्याने परिवर्तन करत आहोत. परंतु त्याचवेळी दुसऱ्या बाजूने वेगाने वाढणाऱ्या भौतिक व अभौतिक समस्यांच्या दूष्ट विळख्यात आपण अडकल्याने स्वातंत्र्याचा श्वास गुदमरतोय... अशी अवस्था झालेली दिसून येते.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात शिक्षण क्षेत्रात ७५ वर्षात चांगली वाटचाल झाली आहे. १३० कोटींच्या देशात शाळा, कॉलेज आणि शिक्षण संस्था कितीही असल्या तरी कमीच पडणार. परंतु दुर्गम भागात खेडोपाडी शिक्षण पोहचले आहे. बुद्धीमान विद्यार्थी आपल्या भारताचे दूत आहेत. या प्रमाणे जगभर कोरोना संकटाचे सावट असतानाही शिक्षण चालू राहिले हेही मोठे यश मानावे लागेल.

कोरोना संकटात सारे जग हादरून गेले. चांगल्या आरोग्य यंत्रणा असलेले प्रगत देश थरकापले. या संकटात जगातील सर्व देश आपापल्या परीने या संकटाशी लढत होते. कोरोना विरुद्ध लढण्यासाठी दिवस-रात्र पोलिस, सैनिक, डॉक्टर्स, नर्स, सफाई कर्मचारी प्रयत्न करत होते. या संकटासाठी सर्व देश विकासामध्ये मागे पडले गेले. परंतु भारताने यामध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावून आपल्या सोबतच इतर देशांसाठी मदतीचा हात पुढे केला, हे विशेष!

भारत जागतिक पातळीवर नवनवे विश्वविक्रम करत असताना लस आणि कोरोना विरुद्ध दमदार कामगिरी करत असतानाच भारताने महागाईतही विक्रम नोंदविला आहे. एकाच वर्षात महामाई दामदुप्पट झाली आहे. चलनवाढ दोन आकड्यांवर पोहचली आहे.

अमृत महोत्सवाच्या निमित्ताने खुप सारे कार्यक्रम आयोजित होतील. राष्ट्रभक्तीपर गाण्याच्या स्पर्धा, स्वातंत्र्य संग्रामाचे कथा कथन, चित्रकला स्पर्धा या आणि अशा कार्यक्रमाने अमृत महोत्सवाचा जल्लोष वाढणार आहे. येणाऱ्या वर्षभरातील विविध उपक्रमांद्वारे स्वातंत्र्याचा अमृत कलश सर्व सामान्यांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

एक देशभक्त नागरिक, चांगला माणूस म्हणून आपणही या अमृत महोत्सवाचा एक भाग बनूया! जे शक्य असेल ते चांगले काम करूया! स्वातंत्र्य योद्धे व त्यांचे कार्य स्मरू या. एखादी व्यक्ती साक्षर करण्याचा प्रयत्न करून एखाद्या गरजू व्यक्तीला यथाशक्ती मदत करून, शासन यंत्रणेचे सर्व आदेश व कायदे पाळून समाजात चांगले काम करण्याचे कौतुक करूनही आपण या महोत्सवाचा आनंद घेऊया. ७५ वर्षांच्या स्वतंत्र देशाला अभिमानास्पद वाटेल तेच काम करायचे असा निश्चय करूया!!

विसरून जाऊ सर्व निराशा
स्वप्न उद्याचे फुलवूया
इतिहासातून धडा घेऊनी
भविष्य आपलु घडवूया!
अक्षर शिकुनी ज्ञान मिळवूनी
घडवूया नूतन सृष्टी
विज्ञानाचे पंख लावूनी
श्रद्धेला देऊ दृष्टी!
स्वराज्य आले सुराज्य येण्या
वेळ आता न लागेल
घराघरातून देशभक्ती
आणि समाज शक्ती जागेल!
स्वातंत्र्याचा अमृत वर्षी
समाज जागृत होईल
समाज साऱ्या भारतभूचे
स्थान अबाधित राहील!

•••••••••



# भारताची सांस्कृतिक वाटचाल

**कु. डावरे मानसी बाळू**
बी.ए. द्वितीय वर्ष

संस्कृती या शब्दामध्ये सम् हा उपसर्ग आणि कृ हा संस्कृत धातू आहे. संस्कृतीचा अर्थ सर्वसमावेशक कृती असा होतो. धर्मासह समग्र अंतर्बाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी संस्कृती हा शब्द वापरला जातो. प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे निसर्गात होणारा विकार आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करायचा संस्कार.

भारतीय संस्कृती ही देशाच्या इतिहासामुळे विलक्षण भूगोलामुळे आणि जनतेतील वैविध्यामुळे आकारास आली आहे. शेजारच्या देशातील चालिरीती, परंपरा व कल्पना सामावून घेत, भारतीय संस्कृतीने सिंधू संस्कृती दरम्यान जन्माला आलेले तसेच वैदिक काळात, दक्षिण भारतातील लोहयुग काळात बौद्ध धर्माच्या उद्‌भव आणि ऱ्हासाच्या काळात तसेच भारताचे सुवर्णयुग. मुसलमानी आक्रमण व युरोपियन देशांच्या वसाहतींदरम्यान झालेले बदल पचवून देखील स्वत:चे परंपरागत प्राचीनत्व टिकवून ठेवले आहे. भारतीय संस्कृतीने तिच्या इतिहासाने अद्वितीय भौगोलिक रचनेने वैविध्यपूर्ण लोकजीवनाने आणि शेजारील देशांच्या परंपरा व कल्पना स्वीकारून तसेच पुरातन परंपरा जपून आकार घेतला आहे.

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वात जुनी संस्कृती आहे. जी सुमारे ५००० वर्षे जुनी आहे. भारतीय संस्कृती ही जगातील महान संस्कृती मानली जाते. विविधतेमध्ये एकता हे विधान येथे सामान्य आहे. म्हणजेच भारत हा एक वैविध्यपूर्ण देश आहे. जिथे विविध धर्माचे लोक त्यांच्या स्वत:च्या संस्कृती आणि परंपरेसह शांततेने एकत्र राहतात. वेगवेगळ्या धर्मांच्या लोकांची भाषा, खाण्याच्या सवयी, चालीरीती इत्यादी भिन्न आहेत. तरीही ते एकतेने राहतात.

**भाषा :**

भारतात अनेक भाषा बोलल्या जातात. इथे जवळ-जवळ सर्व राज्यांमध्ये एक वेगळी भाषा बोलली जाते. भारताची मुख्य भाषा हिंदी आहे आणि मुख्य १७ भाषा भारतात बोलल्या जातात. येथे भाषांचे वेगळे महत्त्व आहे. तमीळ ही भारतातील सर्वात जुनी भाषा मानली जाते.

**वेशभूषा :**

आपल्या देशात अनेक संस्कृती आणि

अनेक भाषा असल्यामुळे, अनेक प्रकारचे पोशाख येथे आले आहेत. प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या प्रकारचे कपडे परिधान केले जाते. भारतातील सर्वात प्रसिद्ध वेशभूषा महिलांसाठी साडी आणि पुरुषांसाठी धोती कुर्ता मानली जाते.

**आदर :**

भारतात आई-वडिलांचा आदर करणे ही इथली संस्कृती मानली जाते आणि गुरूंनाही इथे मान सन्मान दिला जातो. कारण पालक आणि गुरू हेच महापुरुष असतात. जे आपल्याला आपले आयुष्य जगायला शिकवतात, अगदी कथांमध्ये सुद्धा. उदा. जेव्हा गुरू द्रोणाचार्यांनी एकलव्याला गुरू दक्षिणा म्हणून अंगठा मागितला तेव्हा एकलव्याने हसत हसत स्वत:चा अंगठा कापून गुरू द्रोणाचार्यांच्या चरणी ठेवला.

भारताचे राष्ट्रगीत 'जन-गण-मन अधिनायक जय है' जे रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिले आहे. ते देशाची संस्कृती आणि त्यांच्या मूल्यांवर प्रकाश टाकतात. आम्हाला अनेक परिस्थिती आणि आव्हानांना सामोरे जावे लागले पण भारताचा पाया हादरवण्याचे धाडस कोणी केले नाही.

**निष्कर्ष :**

काळाच्या ओघात भारतीय संस्कृतीत काही नवीन बदल झाले. लोकांच्या जीवनात संस्कृती आणि सभ्यतेमध्ये नवीन मूल्ये समाविष्ट केली गेली आहेत. आपण आपल्या वडिलांकडून भारतीय संस्कृती आणि इतिहासाच्या अनेक कथा ऐकतो आणि प्रभावीत होतो. आम्ही भारतीय हात जोडून नमस्कार करतो आणि वडिलांचे, आईचे, गुरूंचे पद स्पर्श करून त्यांचा आदर करतो.



# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि वनीकरण

**कु. जटाळ चंदाराणी गोविंद**
बी.ए. द्वितीय वर्ष

एक काळ असा होता की, ज्या वेळेस हिंदुस्थानात जंगलेच जंगले होती. त्या वेळेस आपले पूर्वज हातात कुऱ्हाडी घेऊन जंगले तोडावयास जात. 'पृथुपर्थवो ययुः' रूंद परशु हातात घेतलेले आर्य निघाले असे वेदात वर्णन येते. जंगले तोडून जमीन साफसूफ करून त्यांनी ती लागवडीस आणली होती. जंगले तोडणे जणू त्या वेळचा राष्ट्रधर्म होता. कोणत्याही धर्मकर्म असो त्या प्रसंगी होम व होमासाठी लाकूड रानातून आणले पाहिजेत यात हेच तत्व दिसते.

आज झाडे लावून मंगलमय वातावरण निर्माण करणे हा धर्म झाला पाहिजे. हिंदुस्थानातून झाडी तुटत चालली. त्यामुळे गावाचे सौंदर्य व संपत्ती कमी होत आहे. पाऊस कमी होत आहे. जळण महाग व दुर्मिळ म्हणून शेतात सोने पिकवणारे शेण गोवरीच्या रूपाने चुलीत जात आहेत या सर्व गोष्टीचा राष्ट्रीयदृष्ट्या विचार झाला पाहिजे.

गावाला नदी हवी व वनरायी हवी. नदी गावाला ओलावा देते. आमराई छाया देते. मुकी जनावरे नदीने पाणी पितात व उन्हात छायेखाली बसून रवंथ करतात. गुराखी त्या दाट छायेखाली बसून पाखरांच्या सुखाचा आस्वाद घेतात.

हे आमचे सोबती आहेत, किती महत्त्वाचे तरीही सारे जग का यांची कत्तल करत आहे. ज्या मुलाला आईचा हात लागत नाही ते मूल नीट वाढत नाही. मुलाच्या अंगावरून आईचा कोमल हात फिरला पाहिजे म्हणजे त्या मुलाला बाळसे येते. त्याला कळा चढते. गावाचे पण असेच होते पूर्वी. आज आपली खेडीपाडी उदास भगभगीत





दिसतात. त्यांच्या तोंडावर तेज नाही. याचे काय कारण? आईचे हात दूर झाले. झाडे म्हणजे भूमातेचे जणू हिरवे हिरवे हात ज्या गावांना हे हात कवटाळतात,ज्या गावाच्या डोक्यावर मातेचे मंगल हात आशीर्वाद देत असतात. त्या गावाला आनंद व शांती लाभते. परंतु हे भूमातेचे बळकट परंतु कोमल हात आज खेड्याभोवती कोठे आहेत? असे म्हणतात की, झाडे हवेतील ओलावा ओढून आणतात. जेथे झाडे अधिक तेथे पाऊस अधिक. रवींद्रनाथांनी एके ठिकाणी म्हटले आहे, झाडे म्हणजे भूमातेची प्रार्थना, झाडे म्हणजे भूमातेने देवाला जोडलेले हात, पृथ्वीने आपल्या लेकरांसाठी जी अंत:करणात प्रार्थना केली ती झाडांच्या रूपाने वर आली. किती गोड कल्पना!

एका अमेरिकन कवीने झाडांना देवाची हिरवी मंदिरे असे म्हटले आहे. किती गोड हे वर्णन. जे झाड स्वत: तापून जगाला छाया देते. स्वत:चे आंबट फळ जवळ ठेवून ते पिकल्यावर, गोड केल्यावर आपोआप अनासक्त रीतीने खाली सोडते. ज्या झाडाचा सारा बहर, ज्याचे जगणे मरणे विश्वासाठी, त्या झाडाखाली परमेश्वर नसेल तर कोठे असेल? बाहेरच्या दगडी मंदिरात हरिजनांना जाता येत नाही. परंतु हिरव्या मंदिरात तो येतो या मंदिरात तो झोपतो, झाड सर्वांना छाया देते, जणू ईश्वराचेच हे रूप. पापी या, पुण्यवंत या, अहिंसक या सर्वांचे स्वागत हा उदार हिरवा राणा करीत असतो. अशा या झाडांखाली वाढलेली भारतीय संस्कृतीही परमोच्च परमोदार वास आहे.

फुलांची पवित्रता आहे. भारतीय संस्कृती त्यागधर्म शिकवते, यज्ञधर्म शिकवते कारण वृक्ष म्हणजे मूर्तीमंत महान यज्ञ. भारतीय संस्कृतीच्या उपासकांनी तरी वृक्षाला विसरू नये. बेल लावा, तुळशी लावा, दूर्वा लावा, वड-पिंपळ, आम्र-बकूल लावा. झाडाखाली बसा. झाडाखाली जेवा. घरात काय रोज बसता व जेवता? घर म्हणजे कब्ररस्तान, चोहोबाजूने कोंडणाऱ्या भिंती. घरातील राहणे म्हणजे डबक्यात राहणे, तेथे मी व माझे, तेथे दृष्टी संकुचित होते. म्हणून मानवाने अधून-मधून

वनभोजन करावे, विशाल आकाशाखाली झाडांच्या संगतीत जेवावे, जीवनात जरा विशालता येईल. पत्रावळीवर जेवणे पवित्र मानले गेले आहे, तेथे सृष्टीचा जणू जिवंत संबंध आहे.

वृक्षांच्या हिरव्या रंगाच्या छत्र्या देवून भूमातेने आपल्या लेकरांना छत्रपती केले आहे. ती सोन्यामोत्याची छत्री कोणाला मिळेल त्याला मिळो. त्या छत्रीखाली छाया मिळण्याऐवजी आगच मिळवायची. परंतु या भूमातेने पसरलेल्या लहान मोठ्या लाखो छत्र्या, यांच्याखाली शितल छायेशिवाय दुसरे काय आहे? या छत्र्यांवर कधी कधी फुलांची ती नक्षी गुंफते. या छत्र्यांना रंगीत फळांची मोती लावते. मुलांचे किती गोड कौतुक! आई मुलांचे जे कौतुक करते, त्याला सीमा नाही.

वृक्षांचा महिमा मी किती सांगू, किती वर्णू. वृक्षाखाली उभे राहिले म्हणजे भावसमाधी लागण्याची पाळी येते. वृक्षाचे जीवन समोर येऊन स्वत:च्या जीवनाची लाज वाटते. डोळ्यांतून पश्चात्तापाचे पाणी वाहू लागते व त्या अश्रूंच्या वृष्टीबरोबरच पुढे जीवाला छाया देणाऱ्या पावित्र्याची रोपे हृदयात लावली जातात.

काळ हा किती भयंकर, अजून किती आहुती
पर्यावरण हेच आधार, नाही तर तू निराधार
वृक्ष हीच सुरक्षा, प्राणवायू देणारा
आपला शिरोधार

चला तर मग, झाडे लावू, झाडे जगवू. कारण, वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे!

• • • • • •




हिंदी
विभाग

# स्वतंत्रता एक पहल

**कु. वाघमारे आरती अशोक**
बी.ए. द्वितीय वर्ष

दक्षिण आफ्रिका में वकालत मे त्याग पत्र देकर मोहनदास करमचन्द गांधी ने सन १९१५ में भारत छोडो आंदोलन में अपनी महत्त्वपूर्ण भूमिका निभाई। सन १९२० से १९२२ तक असहयोग आंदोलन में महात्मा गांधी अंग्रेज सरकार के सभी कार्यों में असहयोग किया गया जो लगातार फरवरी १९२२ तक चलता रहा। जिससे स्वतंत्रता सेनानियों को एक नयी दिशा मिली।

सन १९१५ से १९२४ तक खिलाफत आंदोलन में अंग्रेजी हुकुमत की जडे उखाड फेकने के लिए स्वतंत्रता आंदोलनों में खिलाफत आंदोलन सबसे महत्वपूर्ण था। जो ९ वर्ष में मध्य






में मौलाना मुहम्मद अली और मौलाना शौकत अली के नेतृत्व में हुई थी। यह एक मुस्लिम समुदाय का उपविशवादियों के खिलाफ आंदालन था। साथ ही साथ हिंदू-मुस्लिम की एकता का परिचय देते हुए सन १९२४ तक यह आंदोलन चला।

सन १९४७ में आजादी के बाद जब स्वतंत्र भारत के सामने कई चुनौतिया थी। उस दौर में सबसे बडी चुनौती संविधान निर्माण करना था। वही दुसरी सबसे बडी चुनौती देशी रियासतों का एकीकरण करना था। इसी संविधान सभी को निर्माण करने के बाद २६ जनवरी १९५० में विश्व का सबसे बडा संविधान को अंगीकरण किया गया। स्वतंत्र भारत के सामने एक और बडी चुनौती देशी रियासतों का एकीकरण करना था। क्योंकि अंग्रेजो ने देशी राजाओं की स्वेच्छा पर छोड दिया था की प्रथम प्रधानमंत्री पंडीत जवारलाल नेहरू के नेतृत्व में देशी रियासतों का विलय भारत में किया गया था।

डॉ. भीमराव आंबेडकर द्वारा लिखीत संविधान को लागू करके देश के नागरीकों को मौलिक अधिकार, मौलिक कर्तव्य प्रदान किया गया। राष्ट्र को सुचारू रूप से चलाने के लिए जब ई संशोधन करने पडे। जातियों का भेदभाव एवं आतंकवाद जैसी परिस्थितीयों का सामना करना पडा। सीमा विवाद एक बडी चुनौती के रूप में रहा। कभी चीन तो कभी पाकिस्तान। उनके फन को कुचलने के लिए सन १९६५ चीन से और सन १९९९ में पाकिस्तान से युद्ध करना पडा।

आजाद हिंद फौज का गठन २१ अक्टूबर १९४३ में किया गया। उनका मानना था की सशस्त्र विद्रोह के माध्यम से अंग्रजी शासन को चुनौती दी जा सकती है। इसलिए उन्होने अस्थायी सेना का गठन किया। जिसे विश्व के कई देशों ने मान्यता दी थी। जैसे जर्मनी, इटली, जपान, चीन आदी।

इस प्रकार १९४७ में भारत आजाद हो गया था। मगर भारत की आजादी से भारत का विभाजन हुआ था जिसे पाकिस्तान नाम दिया गया। आखिरकार १५ अगस्त १९४७ के दिन आजादी का उत्सव मनाया गया।



# आजादी का अमृत महोत्सव

आजादी का अमृत महोत्सव
हम सबको मिलकर मनाना है
जन-जन की भागीदारी से
आत्मनिर्भर भारत बनाना है।

आजादी की वीरगाथा को
जन-जन तक पहुँचाना है
अनगिनत थे देश पे मिटने वाले
आखिर कितनों को हमने जाना है।

खोए बैठे जो कहीं अतीत में
अब सामने उनको लाना है
लहु तो उनका भी बहा था...
ठाना उन्होनें भी था कि
देश को आजाद करना है।

किस्सा उनकी वीरता का
देश के हर बच्चे हर युवा को बतलाना है
कुछ इस तरह हमको
अपना इतिहास बचाना है।

इतिहास के पन्नों को
एक बार फिर से पलटाना है
आजादी की वीर गाथाओं को
अखिर कितना हमने जाना है।

७५ सालों के आजाद भारत को
जाने कितना जमाना है
क्या पाया क्या खोया हमने
विचार इसपे फरमाना है।

लेकर सीख अतित से
कुछ नया हमको कर जाना है
इतिहास को अपने दिलों मे रखकर
भविष्य को बेहतर बनाना है
मिला है हमको ये सुनहरा मौका
इसको नहीं गवाना है
७५ सालों की उपलब्धियों को
दुनिया को बतलाना है
लेने है ७५ नए संकल्प
भारत को विश्वगुरू बनाना है।



# आत्मनिर्भरता का अमृत महोत्सव

**कु. सय्यद आलिमा तब्बसुम**
एम.ए. प्रथम वर्ष

हमारे भारत देश के महान स्वतंत्रता सेनानियों ने हमें १५ अगस्त १९४७ को अंग्रेजो की गुलामी से आजादी दिलाई थी। १५ अगस्त २०२२ वर्ष स्व तंत्रता दिवस की ७५ वी वर्षगाँठ को भारत सरकार आजादी का अमृत महोत्सव के तौर मना रहा है।

आजादी का अमृत महोत्सव मलतब नए विचारों का अमृत, नए संकल्पों का अमृत और आत्मनिर्भरता का अमृत है। आजादी का अमृत महोत्सव हमारे प्रधानमंत्री श्री नरेन्द्र मोदीजी द्वारा १२ मार्च २०२१ को लिया गया था, यह कार्यक्रम १५ अगस्त २०२३ भारत के ७८ वें स्वतंत्रता दिवस तक चलेगा। इस महोत्सव का आगाज गुजरात के साबरमती से किया गया। इस महोत्सव को मनाने का मुख्य उद्देश्य लोगों को यह याद दिलाना है कि स्वतंत्रता प्राप्ती की लडाई में हमने बहुत कुछ खोया है।

स्वतंत्रता सेनानियों के बलिदान और त्याग के बारे में जानकारी देना है। उन महान स्वतंत्रता सेनानियों के कारण ही आज २१ वीं सदी में भारत आत्मनिर्भरता के मार्ग पर तेजी से अग्रसर हो रहा है। आजादी के अमृत महोत्सव के दौरान भारत सरकार व राज्य सरकार द्वारा देशवासियों की जनभागीदारी से अलग-अलग आयोजन किए जाएँगे। इस आयोजन के माध्यम से वोकल फॉर लोकल अभियान को बढावा देने की कोशिश की जा रही है। इस महोत्सव कार्यक्रम से हम अपने देश के युवाओं को देश के प्रति उनके कर्तव्य के लिए प्रेरित करते हैं। और देश की आजादी के संघर्ष के इतिहास को याद रखते हैं।

आजादी का अमृत महोत्सव आजादी की लडाई के साथ-साथ आजाद भारत के सपनो और कर्तव्यों को देश के सामने रखकर आगे बढने की प्रेरणा देगा। आजादी का अमृत महोत्सव मनाना हम सब भारतवासियों के लिए बडे गर्व की बात है। आजादी का अमृत महोत्सव भारत की प्रगतिशील सामाजिक, सांस्कृतिक, राजनीतिक और आर्थिक पहचान का एक अवतार है।

यह महोत्सव भारत के उन सभी लोगों को समर्पित है जिन्होनें न केवल भारत के विकासयात्रा में महत्त्वपूर्ण भूमिका निभाई है, बल्कि उनके भीतर वह शक्ति और क्षमता भी है, जो भारत २.० को सक्रीय करने के लिए प्रधानमंत्री मोदी की दूरदृष्टी भावना से प्रेरित 'आत्मनिर्भर' भारत को साकार कर रहे है।

आजादी का अमृत महोत्सव के सफल

आयोजन और कार्यान्वयन के लिए सम्पूर्ण देश में जनभागीदारी से विभीन्न अभियानों का आयोजन किया जा रहा है। लोगों की बृहत भागीदारी से यह महोत्सव एक 'जनआंदोलन' बन गया है। जन भागीदारी के माध्यम से स्थानीय स्तर पर छोटे बदलाव महत्त्वपूर्ण राष्ट्रीय लाभ में सहायक सिद्ध होंगे।

स्वतंत्रता सेनानियों की स्मृती में भारत सरकार द्वारा देश भर में आजादी का अमृत महोत्सव नाम से विभीन्न कार्यक्रम भी आयोजित किए जा रहै हैं। इन कार्यक्रमों में फोटो प्रदर्शनियाँ, मुव्हींग व्हॅन, विभीन्न प्रतियोगिताएँ आदि शामील हैं। जो स्वतंत्रता सेनानियों के योगदान को दर्शाती है।

भारत की अर्थव्यवस्था को १९४७ से आज तक बडी सफलताए जरूर मिली, लेकिन बडी गलतियों के बाद। इसका सबसे बडा उदाहरण १९९१ में शुरू हुई आर्थिक उदारीकरण की प्रक्रिया थी। जिसने अगले ३० वर्षों तक अर्थजगत में आए बडे उछाल की नींव रखी। १९९१ में आर्थिक सुधार इसलिए नहीं लागू किए गए थे क्योंकि वे उस समय की सरकार की सुधारवादी सोच के प्रतीक थे। वे इसलिए आए, क्योंकि उस समय देश दिवालिया होने के कगार पर था और कुछ माह तक चली चंद्रशेखर सरकार को विदेशी बँको से कर्ज लेने के लिए देश का सोना गिरवी रखना पडा था।



लेकिन हमें उससे पहले भारत को मिली अन्य बडी सफलताओं की चर्चा करनी चाहिए। पहली हरित क्रांती और दुसरी श्वेत क्रांती। काफी समय तक अमेरिका द्वारा दान किए गए खादधान्य पर निर्भर रहने के बाद ६० के दशक में हमनें हाइब्रिड बिजों और खाद का प्रयोग करने के बाद ही आधुनिक खेती की तकनीक भी अपनाई। इससे हरीयाणा और पंजाब में हरित क्रांती आयी।

लेकिन १९९१ में देश में विदेशी मुद्रा की कमी की वजह से भारत को न सिर्फ लाइसेंस परमिट राज खत्म करना पडा बल्कि ऐसी नीतियाँ बनीं जिनसे सॉफ्टवेअर और फार्मास्युटिकल जैसी निर्यातोन्मुखी उद्योगों को १० वर्षो के लिए बडे टॅक्स लाभ दिए गए। इन्ही नितीयों की वजह से टाटा कंसल्टेन्सी सर्विसेस, इंफोसिस और विप्रो जैसी दुनिया की महानतम कंपनियाँ बनी। इनमें से टीसीएस और इन्फोसीस कि किमत तो आज १०० अरब डॉलर से भी अधिक है।

आज हम जेनेरिक दवाईयाँ और वैक्सिन के दुनिया के सबसे बडे निर्माता है। जेनेरिक दवाईयाँ बनाने वाली दुनिया की पाँच में से दो सबसे बडी कंपनिया भारतीय हैं। और भारत दुनीया का सबसे बडा वैक्सिन निर्माता बन गया है। आज यदि हम कोविड पर ठीक से काबू पा सके है, तो उसकी यही वजह है।

१९९१ में आए आर्थिक सुधारों ने देश में टेलीकॉम क्रांति को जन्म दिया। आज हमारे देश में ११८ करोड मोबाईल कनेक्शन है और शहरों में प्रति व्यक्ती १.३ टेलिफोन कनेक्शन है। और एक क्षेत्र में भारत चीन के बाद बहुत लंबी छलांग लगा रहा है, वह है डिजिटाईजेशन। विमुद्रीकरण यानी डिमॉनेटाईजेशन के बाद व्यापार औपचारिकरण करने का दबाव बढ गया है। और भारत के पास आज दुनिया का सबसे प्रगतिशील डिजिटल वित्तीय आर्किटेक्चर है।

तीन और बडी उपलब्धियाँ जिनमें हाईवे और ग्रामीण सडकों पर बडा निवेश दोनों ही वाजपेयी के जमाने की है। और तिसरा है गरीबी में तेजी से आई कमी। जो युपीए के समय शुरू हुआ। युपीए के १० वर्षों के शासनकाल में २७.१ करोड भारतीय गरीबी रेखा से उपर आ गए है।

इनके साथ १९९१ के बाद तीन और बडे परिवर्तन आए- शेअर का डिमॅटेरीयलाईजेशन या अमूर्तीकरण, नॅशनल स्टॉक एक्सचेंज की स्थापना और शेअर मार्केट के नियामक सेबी का गठन। इनकी वजह से भारत दुनिया की सबसे तेजी से बढने वाली शेअर मार्केट बन गया है।

कुल मिलाकर, भारत ने कृषी से लेकर सेवा क्षेत्र तक बडी उपलब्धियाँ हासील की है। उनमें मॅन्युफॅक्चरींग के उस चरण को छोड दिया, जिसमें बहुत से दुसरे देश फँसे रहे। कुछ वर्षो के बाद देखना होगा कि मोदी सरकार की 'मेक इन इंडिया' को बढावा देनेवाली प्रोडक्शन लिंकड इंसेंटीव योजनाओं का कितना असर हुआ।

आजादी के बाद भारत मे विकास करना बहुत बडी चुनौती थी क्योंकि अंग्रेजी शासन के दौरान भारत कि आर्थिक स्थिति बहुत ही खराब हो चुकी थी। जब अंग्रेज भारत में व्यापार करने के लिए आए थे तब उस समय पुरे विश्व की अर्थव्यवस्था में भारत की २३% - २५% हिस्सेदारी थी।

एवं २० दशक बाद जब हमें आजादी प्राप्त हुई यानी कि सन १९४७ में हमारा पुरे विश्व के अर्थव्यवस्था में मात्र ३% हिस्सेदारी रह गयी।

इससे आप समझ सकते है कि अंग्रेजी शासन ने भारतीय अर्थव्यवस्था की कमर तोंड दी थी। अंग्रेज भारत से कच्चा माल ले जाते थे और तैयार माल लाकर यहाँ पर बेचते थे। अंततः जिससे हमारे देशवासी बहुत गरीब हो चुके थे।

लोकतंत्र की स्थापना करना भी एक बहुत बडी चुनौती थी। करोडो लोगो की पहली बार मतदाता सुची तैयार करनी थी और लोगो को लोकतंत्र की जानकारी भी देनी थी। १९५२ में जाकर पहली बार चुनाव हुए लेकिन यह तैयारी करना कोई आसान काम नही था। और ऐसे में भारत देश को एक धागे में बांधकर रखना अपने आप में ही एक बहुत बडी चुनौती थी। एकता और अखंडता की समस्या आज भी हमारे भारत देश के सामने है।

भारत पर ब्रिटीशर्स ने २०० साल तक शासन किया। ना जाने कितने लोग शहीद हुए एवं अपने प्राण भी देश के लिए हँसते-हँसते कुर्बान कर दिए, जब जाकर १५ अगस्त १९४७ को हमे आजादी प्राप्त हुई। सन १९४७ से अब तक हमने कई बडी उपलब्धियाँ प्राप्त कि है। आर्थिक और तकनिकी दोनो क्षेत्रों में तरक्की की है।

भारत देश की अर्थव्यवस्था आज एशिया की तिसरी सबसे बडी अर्थव्यवस्था है। आजादी के बाद भारत तेजी से विश्वशक्ती बनकर उभर रहा है।

थोरियम आधारीत परमाणु ऊर्जा विकसित करने वाला एकमात्र देश भारत है। भारत के पास खुद की बनाई हुई परमाणु, पनडुब्बी, आईएनएस अरिहंत है, जिसमें परमाणु हथियार सुरक्षित रखे जा सकते है। चाँद और मंगल पर मानव रहित मिशन भेजने वाले ५ देशों में से एक भारत है। हमारा देश दुनिया मे एकमात्र ऐसा देश है जिसने हर वयस्क नागरिक को स्वतंत्रता के पहले दिन से ही मतदान का अधिकार दिया है। उत्पादन के मामले में भी भारत देश ने कई बडे-बडे देशों को पिछे छोडा है। सर्वाधिक पशुधन आबादी वाला देश भी भारत ही है।

आनेवाले समय में भी नए भारत के निर्माण के लिए नई नितियाँ और योजनाएँ बनाई जा रही हैं। जिसमें हमारी सरकार 'सबका साथ सबका विकास और सबका विश्वास' जैसी बातों पर जोर दे रही है।

महिलाओं बच्चों के लिए प्रधानमंत्री ने राशन की दुकान पर पोषण युक्त चाँवर, दाल, तेल, नमक आदि मुहैया कराने की बात की है। और स्वास्थ्य के क्षेत्र में अस्पताल में ऑक्सीजन प्लांट लगाने की बात भी उन्होंनें की हैं।

वैसे तो और भी बहुत सी योजनाएँ बनाई जा रही है। जिससे हमारा देश विश्व में और भी ज्यादा तरक्की एवं अपने आप में सक्षम एवं आत्मनिर्भर बन सकेगा।

अंत में मैं यह कहना चाहती हूँ कि आजादी जो हमे इतनी चुनौतियों का सामना करने एवं अपने सारे सुखों को ठोकर मारने के बाद प्राप्त हुई है, हमें उसका सम्मान करना चाहिए। जिससे भारत उन्नती की नई उँचाईयों को छू सके और विश्व में हमेशा ऐसे ही अपना नाम अग्रिम पंक्ती में बनाए रखें।

'अमृत महोत्सव ने ली अंगडाई है
यह तो आजादी की बधाई है।
पचहत्तर वर्ष बीते आजादी को
यह यात्रा अब सबको याद दिलानी है।'

• • • • • • • • •

# आजादी के बाद हिन्दी का वैश्विक परिदृष्य

**कु. पठाण आसमा कलीम**
एम.ए. द्वितीय वर्ष

इतिहास के पृष्ठों पर सत्य का उत्सव एवं साहित्य में अनुभव जीनत निरन्तरता के प्रतिकों मिथकों की अनुकरणीय श्रृंखला होती है। आज भूमण्डलीकरण के दौर में जब भाषाई महत्त्व को बाजार से जोडकर देखने की प्रक्रिया प्रारंभ हो चुकी है विश्व की पराजित भाषायें अपनी अपनी देसी अस्मिता बनाए रखने के लिए संघर्ष करती दिखाई दे रही है। इस संघर्ष को दक्षिण अफ्रिकी लेखकों की भाषाई बेचैनी मे स्पष्ट अनुभव किया जा सकता है।


The Indian caste system is perhaps the most extended surviving social system. Rural communities have long been arranged so the best is of caste the upper and lower castes almost always lived in segregated colonies. The community members not allowed to enter in the temples draw and drinking water from the same Well as higher caste hindus and their touch or even shadow was considered a bad omen and one could marry only within ones caste. Historians through say that until the 18th century the formal distinctions of caste were of limited importance to Indians, Social identities were much much more flexible and people could system solidified further during the Raj when only higher caste Hindus were appointed in administrative positions. After independence the leaders recognised the need to abolish it for integrated social development of the country . In 1950the practise of untouchability was aboilshed from the constitution which gurated the right to equality as a fundamental right to all country citizens.

One part of the constitution addressed to help to improve inequalities derived from the caste system. For the situation of Dalit (out caste) people who were untouchable widely discriminated over looked humiliated that time in the Hindu

practice. Despite the obstacles however some dalits an other low caste Indians such as B.R Ambedkar who outhored the Indian constitution and K.R. Narayan who become the nation first Dalit president have risen to hold prestigious positions in the country. That's the caste system going on. In this way the caste system continues year by year, nothing any more changes in it .The caste system continues year by year. Nothing any more changes in it. The caste system becomes a significant social system in India. One's caste effects their options regarding marriage, employment, education, economics, mobility, housing and politics among others.

Even though we are in the 21st century caste is still a divisive issue in India. From people in Haryana demanding reservation based on their caste to those Maharashtra demanding a Maratha quota. India has not been able to uproot the caste based nations that have been handed down generations.

Nine states in India that house more than 54% dalits have recorded more that 84% of caste based voilence against the scheduled caste (SC). The highest rates of voilence were recorded in Rajasthan, Madhya Pradesh, Bihar and Gujrat. The statistics show that the states that experiences voilence above the national average, are Uttar Pradesh, Kerala, Odisha and Andhra Pradesh. The menace lies not just in causing voilence but also addressing it. From 2009 to 2018 the atrocities on marginalised castes has increased by 6%. Some expets say that the crippling caste system in the country would have disappeared if not for the politicians.

Inter caste marriages are still not accepted in certain sections of the so-called educated citizens of the country. Among the 135 crore Indians, are 200 million Dalits that face voilence, harrashments and exclusion daily. Voilence against them is still rampant and often makes headlines in the country.

Specially the caste systems affects more on education and women. Financial insecurity has been the largest threat to the triumph of Dalit children. Child labour ends their educational abilities along with child marriage. Between 2005 and 2006, 18.2% of dalit girls under the age of 15 lost their innocence as they were married of illegally. Tracing the misfortunate of the Dalits further the state Bihar ranked lowest in 2007 and 2008 in terms of their treatment of women Bihar received a same of 68.2% for their barbaric treatment of women.

The one half of all poor children in Indian belong to the Dalit caste. This further inhibits their opportunities for growth and security, distant from the chokehold of poverty. School attendence among this group has risen from 64% to 77% in 6 years but this continues to leg behind the 84% seen among children of all other castes. So, there is nothing any information about remaining 33% of other Dalit children what are doing? The effect of the caste system on education in India has created this literacy divide.

The effect of the caste system on education in India has disappeared in modern times but can be seen in the poorest of states. With resources in places Dalits are being recognised for their unique qualities and contribution to society. The continued recognition of lower castes helps India move forward and past the restraints of negative labels. The recent decades with the spread of secular education and growing urbanisation the influence of caste has some what declined specially in cities where in differenct castes live side by side and inter caste marriages are becoming more commin.

Decades post independence



one can find Indians diversity and caste prevalence as parallel realities. In the 21st century caste still acts as a source of self-esteem, satiscation and contentment. In the developing India that we are living in we are happy to put our short comings under the carpet and project a happy picture. Most of the people engaged in manual scavenging in the country belong to the Dalit community. The community members are still associated with dirty material work with the rist. There are many shocking stories even happen today's related to casticism and that the media picked it up.

In spite of the 75 years passed since today India is still facing caste-based problems discrimination and in rural areas. Small village untouch ability is still in pra ctice (specilly Uttar Pradesh, Hariyana). Some say the caste system would have disappeared by now i the fireds were not regularly fanned by politicians. The caste system is the bane for the India society. It divides the Indian society into sectarian groups and classes. Even today it plays a predominent role in our society despite the growt of culture and civilisation.

At the end I want to say, the prevalence of caste in Indian society in the 21st century and 75th year of Independence or in the era of 'Azadi ka Amrit Mahotsav', might not be talked about as much however that does compensate for the fact that the influence is still running strong. What started as a part of one religion has spilled to other faits. Christains, Muslims and Sikhs now employ similar social satisfaction. As a country India must destroy the caste system before the caste system destroys India.

# Journey of India from Independence

**Miss. Thakre Rajani Hanumant**
B.A Second Year

It's 75 years of independence. India has several achievement In every sector like economy, Polity, social and Space too.

India has built a modern economy and first fastest growing economy in the world. in 1991 India has left only 1 billion $ but now in 2022 India has 633.33 billion $. the journey of 1 billion$ 633.33 billion $ is such a huge achievement. India only country in the world remained a democracy except 1 year.

After independence India adopted a centralised planning economy. Aim was to ensure a balanced development of economy and equal use of natural resources under Planning Commission Economy is planned through five year plans to development. It in Asian times people were unaware of many things due to lack of studies but now they are educated so they are aware of everything. not only that but India is also making various discoveries in space .

In recent years with the advancement of Computer technology and information technology as well as the growing number of highly educated and speaking English. India has gradually started playing the role of outstanding service to the whole world. India is the world's largest exporter of higher Technology.

We know that India's journey start from an undeveloped India. In in some years it will definitely become a developed India.

# विविध विभागांचे अहवाल



# सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळ

दरवर्षीप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनानुसार दि. २२-४-२०२२ रोजी मुलाखत प्रक्रियेद्वारे निवड संपन्न झाली. यावेळी शिंदे माधव धोंडीराम यांची अध्यक्षपदी तर पवार भरत महादेव यांची उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. तसेच पाटील ऐश्वर्या बालाजी-सचिव, आत्राम मनोहर - कोषाध्यक्ष, कांबळे सिद्धार्थ बाबासाहेब - प्रसिद्धी प्रमुख, शितोळे वैष्णवी अशोक - विद्यार्थी प्रतिनिधीपदी यांची निवड करण्यात आली तर शेख अजमोरा उस्मान, स्वामी अखिनी नागनाथ, सय्यद तोफिक रफिक व गुरुमे अभिषेक नरसिंग यांची सदस्यपदी निवड करण्यात आली.

दि. १०-५-२०२२ रोजी सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा.डॉ. गणेश बेळंबे यांच्या शुभहस्ते पार पडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, समन्वयक प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे व इतर सहकारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समन्वयक,
**प्रा.डॉ. रामेश्वर खंदारे**

# कमवा शिका योजना

दयानंद कला महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी 'कमवा आणि शिका योजना' राबवली जाते. या महाविद्यालयामध्ये येणारे बहुसंख्य विद्यार्थी हे ग्रामीण भागातून येतात. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असते. अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना स्वकमाईतून शिक्षण घेण्यास मदत व्हावी या हेतूने ही योजना महाविद्यालयात राबविली जाते.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी सूचना काढून इच्छुक विद्यार्थ्यांची प्राचार्य कक्षात मुलाखत घेण्यात आली. या शै. वर्षात दि. ११.१२.२०२१ रोजी रितसर सूचना काढून उपस्थित विद्यार्थ्यांमधून व त्यांची गरज लक्षात घेऊन २० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात हलकेसे एक तासाचे काम विभागून देण्यात आले. यामध्ये कार्यालय, ग्रंथालय, वर्ग खोल्या स्वच्छता, झाडाला पाणी घालणे, ग्रंथालयातील पुस्तकाची व्यवस्था, पुस्तक देव-घेव इत्यादी कामांचा समावेश आहे. अशा सहभागी विद्यार्थ्यांना महिन्याला ठराविक मानधन देण्यात आले. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्चासाठी महाविद्यालयाकडून थोडीफार आर्थिक मदत होते. याशिवाय विद्यार्थी दशेपासूनच श्रमप्रतिष्ठेचे महत्त्वही पटवून देण्याचे कार्य महाविद्यालय करते.

डॉ. रामेश्वर खंदारे
सन्वयक

# विद्यार्थी मंडळ

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये विद्यार्थी मंडळाच्या वतीने अनेक उपक्रम राबविण्यात आले. विद्यापीठ किंवा राज्य शासनाकडून विद्यार्थी मंडळाची स्थापना करण्यासंदर्भात कोणतेही स्पष्ट निर्देश आलेले नसल्यामुळे विद्यार्थी सचिव किंवा इतर पदाधिकाऱ्यांची निवड करणे शक्य झाली नाही.

दि. १२ व १३ मे २०२२ या दोन दिवशी 'अमृत' वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध ऊर्दू शायर प्रा. अब्दुल रब उस्ताद यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. तर समारोप लातूरचे जिल्हा माहिती अधिकारी श्री. युवराज पाटील यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले. स्नेहसंमेलनानिमित्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने स्वयंशासन दिन, पारंपारिक वेशभुषा दिन, आनंद नगरी, शेलापागोटे, संगीत शेलापागोटे, अंताक्षरी, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. उत्कृष्ट शेलापागोटे पुरस्कार प्राचार्यांच्या वतीने रोख रक्कम रू. ५००, रू. ३०० व रू. २०० देण्यात आले. याच अनुषंगाने विविध क्षेत्रात महाविद्यालयाचा नावलौकिक वाढणाऱ्या शैक्षणिक गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांचा तसेच राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात दैदिप्यमान यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. या प्रसंगी 'दयानंद श्री' पुरस्कार श्री. भरत काळे या विद्यार्थ्यास तर 'दयानंद श्रीमती' कु. पूजा माळी या विद्यार्थीनीस प्रदान करण्यात आला.

दि. ३०.५.२०२२ रोजी बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी दैनिक पुण्य नगरीचे उपसंपादक प्रा. रविकिरण गळगे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाया अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड हे होते. कार्यक्रमास बी.ए. तृतीय वर्षातील ३०० विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थी मंडळाच्या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, विद्यार्थी मंडळाचे माजी प्रभारी डॉ. प्रदीप सूर्यवंशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनिल माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे, रासेयो प्रभारी कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष कदम, राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रभारी ले. विवेक झंपले, सांस्कृतिक मंडळ प्रमुख व क्रीडा सचालक डॉ. अशोक वाघमारे, सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

**डॉ. सुनील साळुंके**
प्रभारी, विद्यार्थी मंडळ

# लोकप्रशासन विभाग

मा. अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव मा. श्री. रमेशजी बियाणी यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड आणि लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा.डॉ. रामेश्वर खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त सामाजिक मूल्यांची जाणीव करून देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी लोकप्रशासन विभागांतर्गत 'गुणवत्ता सुधार कार्यक्रमा'चे आयोजन करण्यात आले. लोकप्रशासन विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ. रामशेवर खंदारे, प्रा. डॉ. उर्मिला रेड्डी, प्रा. डॉ. शिवशंकर कसबे, प्रा. चैतन्य शिंदे, प्रा. अश्विनी धायगुडे, प्रा. स्फूर्ती समुद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले-

**लोकप्रशासन विषयातील करिअरच्या संधी**
**प्रमुख मार्गदर्शक : प्रा.डॉ. प्रीती पोहेकर**

दि. २७-१०-२०२१ रोजी लोकप्रशासन विषयातील करिअरच्या संधी या विषयावर कार्यक्रम आयोजन करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शन म्हणून राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा.डॉ. प्रीती पोहेकर या उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना करिअर बाबत मार्गदर्शन केले. विविध प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशासनशास्त्राच्या प्रशिक्षक म्हणून उपलब्ध असणाऱ्या संधीचे विवेचन त्यांनी केले. तसेच शासकीय धोरण निर्मिती व निरीक्षण यांमध्ये लोकप्रशासन अभ्यासकाला मोठ्या प्रमाणात वाव असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाज गायकवाड उपस्थित होते. लोकप्रशासन विभागप्रमुख प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे व विभागातील इतर सहकारी प्राध्यापक तसेच विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम युट्यूब च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**माहिती अधिकार कायद्याचे अवलोकन**
**प्रमुख मार्गदर्शक : प्रा. उर्मिला रेड्डी**

दि. २५.१२.२०२१ रोजी दयानंद कला महाविद्यालयात माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त सुशासन दिनाचे आयोजन करण्यात आले होते. भारतातील माहिती अधिकार कायद्याचे अवलोकन महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागातील प्राध्यापिका प्रा. उर्मिला रेड्डी यांनी केले. सुशासन ही प्राचीन संकल्पना असून त्यामध्ये माहिती अधिकार कायदा म्हणजेच सुशासन या संकल्पनेला अधिक बळकट करण्यासारखे आहे. माहिती अधिकार कायद्यामळे कमी झालेला भ्रष्टाचार तसेच जनसामान्यांचा शासन प्रक्रियेत वाढलेला सहभाग यावरही त्यांनी प्रकाश टाकला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

**प्रशासनातील उत्कृष्ट संकल्पनेचे सादरीकरण**
**मार्गदर्शक : प्रा.डॉ. उर्मिला रेड्डी**

दि. २७.१२.२०२१ रोजी दयानंद कला महाविद्यालयातील प्रशासनातील उत्कृष्ट संकल्पनेचे सादरीकरण आयोजित करण्यात आले. यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. उर्मिला रेड्डी यांनी मार्गदर्शन

केले. त्यांनी प्रशासनातील रचना कार्य प्रणालीची माहिती सांगून प्रशासनासाठी आवश्यक असलेले स्मार्ट वर्क संबंधीच्या विविध संकल्पनांचा आढावा घेतला. यात डिजीटल कंप्यूटर वर्क, ऑनलाईनचा वापर, प्रशासनातील ताणतणावाचे तसेच वेळेचे नियोजन यासोबत आधुनिक काळातील प्रशासनातील बदलत्या कार्यशैलीबद्दल माहिती सांगितली आणि राज्य व्यवस्थेतील प्रशासनाचे महत्त्व सांगितले.

**'सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती'**

**प्रमुख मार्गदर्शक : नरीन सिन्हा**

दि. ७.२.२०२२ रोजी लोकप्रशासन विभाग दयानंद कला महाविद्यालय व किल्ले धारूर येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनार संपन्न झाला. या वेबीनारच्या अध्यक्षस्थानी दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते तर प्रमुख उपस्थिती किल्ले धारूर येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. दीपक भारती आणि उद्घाटक म्हणून प्रा. राकेश राणा यांची उपस्थिती होती. सामाजिक शास्त्रातील संशोधकांनी समाज सद्य:स्थितीत कोणत्या सामाजिक समस्यांना सामोरे जात आहे, त्या सामाजिक समस्यांचा विषय म्हणून आपल्या संशोधनामध्ये सहभाग करणे काळाजी गरज असल्याचे प्रतिपादन प्रमुख मार्गदर्शक प्रो. नरीन सिन्हा (राजस्थान विद्यापीठ, जयपूर) यांनी केले. या वेबीनारचे सूत्रसंचलन प्रा. स्फूर्ती समुद्रे यांनी केले. तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. शिवशंकर कसबे यांनी करून दिला. आभार प्रदर्शन लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा.डॉ. रामेश्वर खंदारे यांनी कले. या कार्यक्रमाला देशभरातून जवळपास ८० सहभागी प्रतिनिधी उपस्थित होते.

**संशोधन प्रकल्प कसा लिहावा**

**प्रमुख मार्गदर्शन प्रा. अनिल गायकवाड**

दि. ७.४.२०२२ रोजी संशोधन प्रकल्प कसा लिहावा या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील प्रा. अनिता गायकवाड प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. शैक्षणिक क्षेत्रात प्रकल्प लेखनामुळे विद्यार्थ्यांना समाजातील विविध समस्या, समज-गैरसमज याची जाणीव होण्यास मदत होते असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी जवळगेकर हे होते. कार्यक्रमाचे आयोजन लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. उर्मिला रेड्डी यांनी केले तर सूत्रसंचलन प्रा. अश्विनी धायगुडे यांनी केले. आभार डॉ. शिवशंकर कसबे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. स्फूर्ती समुद्रे, प्रा. चैतन्य शिंदे व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कोरोना महामारी भित्तीपत्रक**

दि. २०.५.२०२२ रोजी दयानंद कला महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागामार्फत गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत 'कोरोना महामारी जागतिक आव्हान व उपाय' योजनांच्या संदर्भात विविध घटकांची भूमिका भित्तीपत्रक उद्घाटनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्क्रमाला प्रमुख मार्गदर्शक व उद्घाटक म्हणून डॉ. किशन ठाकूर, भीमाशंकर हॉस्पीटल टाका येथील संचालक उपस्थित होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन विभाग प्रमुख प्रा.डॉ. रामशेवर खंदारे तसेच प्रास्ताविक प्रा.डॉ. उर्मिला रेड्डी यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रमा शिंदे तर आभार सुप्रिया शिंदे या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.

**प्रा.डॉ. रामेश्वर खंदारे**

समन्वयक

# राष्ट्रीय सेवा योजना

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाबरोबरच सामाजिक जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी, त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास घडवून आणण्यासाठी, आपल्या जवळपासच्या परिसरातील लोकांमध्ये मिसळून त्यांना समजावून घेऊन रचनात्मक कार्य करण्यासाठी, स्वावलंबन, चारित्र्यवर्धन व सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करून तिचा विकास करण्यासाठी तसेच युवकांमधील नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी, राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी, समाजातील गोरगरीब वर्गाची सेवा करण्याची इच्छा विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करण्यासाठी, जातीभेद, वर्ण भेद, वंश भेद, भाषिक वाद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, हुंडा पद्धती, स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार, स्त्री-भ्रुणहत्या, मानवी हक्कांचे उल्लंघन, प्रदुषण, पर्यावरणाचा ऱ्हास यासारख्या समस्यांचे उच्चाटन करण्यासाठी व महात्मा गाधींचे स्वप्न साकार करून विद्यार्थ्यांच्या मनात मानव प्राण्याबद्दल सहानुभूती निर्माण करण्यासाठी प्रस्तुत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाची वाटचाल प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. कोरोना महामारीच्या काळातही शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये या विभागाने पुढील उपक्रम राबवून यशस्वी वाटचाल केली-

**१) दि. २१ जून २०२१ :**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. २१ जून २०२१ रोजी योग प्राणायाम शिबिराचे आयोजन ऑनलाईन पद्धतीने सकाळी ७.०० वाजता करण्यात आले.

**२) दि. ९ ऑगस्ट २०२१ :**

रासेयोचे स्वयंसेवक श्री. भरत पवार, अनिल गाडवे व सिद्धार्थ कांबळे यांनी भालचंद्र ब्लड बँक येथे जाऊन उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

**३) दि. १२ ऑगस्ट २०२१ :**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. उदयजी सामंत राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक व स्वयंसेविका यांच्याशी संवाद व 'राष्ट्रीय सेवा कोविड योद्धा सत्कार समारंभ' १२ ऑगस्ट २०२१ रोजी विद्यापीठ उपकेंद्र, लातूर येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात महाविद्यालयातील ११ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला व स्वयंसेवक भरत पवार याचा मा. उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देऊन कोविड योद्धा म्हणून सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शिक्षक आमदार मा.श्री. विक्रमजी काळे, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड कुलगुरु डॉ. उद्धव भोसले, प्र.कुलगुरू मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे, रासेयो संचालक मा. डॉ. शिवराज बोकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

**४) दि. १५ ऑगस्ट २०२१ :**

दयानंद शिक्षण संस्था आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री मा.ना. अमितजी देशमुख यांच्या शुभहस्ते भरत पवार याचा कोवीड योद्धा म्हणून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव मा. श्री. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. श्री. सुरेशजी जैन, संस्थेचे इतर पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, रासेयो चे सर्व कार्यक्रमाधिकारी उपस्थित होते.

**५) दि. २० सप्टेंबर २०२१:**

रासेयो, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वतीने प्रजासत्ताक दिन निवड शिबीर दि. २० सप्टेंबर २०२१ रोजी घेण्यात आले.

**६) दि. २४ सप्टेंबर २०२१ :**

राष्ट्रीय सेवा योजना वर्धान दिनानिमित्त महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात एकणू ५० स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या दिवशी महाविद्यालय व महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

**७) दि. २५ सप्टेंबर २०२१ :**

नेहरू युवा केंद्र संघटन, जिल्हा युवा समन्वयक कार्यालय लातूरच्या वतीने 'आझादी का अमृत महोत्सव' निमित्त फिट इंडिया, फ्रिडम रन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात रासेयोच्या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

**८) दि. १ ऑक्टोबर २०२१ :**

युवा बिरादरी या स्वयंसेवी संघटनेने औरंगाबाद येथे येलोरा मिट या कार्यक्रमाचे आयोजन १ ऑक्टोबर ते ५ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत करण्यात आले होते. या कार्यशाळेत रासेयो स्वयंसेवक श्री. भरत पवार व ऋषिकेश पवार यांनी सक्रीय सहभाग नोंदविला.

**९) दि. २९, ३० ऑक्टोबर २०२१ :**

लातूर शहर महानगरपालिका व रासेयो, दयानंद कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १८ वर्ष वयोगटाखालील युवकांसाठी मिशन युवा स्वास्थ्य कोवीड-१९ लसीकरण शिबीर राबविण्यात आले यामध्ये १८५ हून अधिक युवकांनी लसीचे डोस घेतले.

**१०) दि. २६ नोव्हेंबर २०२१ :**

संविधान दिनानिमित्त रासेयो विभागातर्फे संविधान सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताह दरम्यान संविधान उद्देश पत्रिका वाचन, भारतीय संविधानातील मुलभूत कर्तव्य वाचन, भारतीय संविधान समृद्ध जीवन जगण्याचा मार्ग, देशापुढील सद्य:स्थितीतील आव्हाने आणि संविधान, भारतीय संविधानातील नैतीक मूल्ये इत्यादी उपक्रम राबविण्यात आले.

**११) दि. २७ नोव्हेंबर २०२१ :**

सार्वत्रिक निवडणूक अधिकारी लातूर व रासेयो दयानंद कला महाविद्यालय, लातूर यांच्या वतीने मतदान नोंदणी अभियान संपन्न झाले. यामध्ये एकूण २११ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने मतदार नोंदणी केली.

१२) दि. १ ते ३१ डिसेंबर २०२१ :

स्व. विलासराव देशमुख शासकीय रूग्णालय, रासेयो व दयानंद कला महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ ते ३१ डिसेंबर २०२१ दरम्यान 'एड्स जनजागृती अभियान' राबविण्यात आले. यामध्ये अरूणकुमार गवळे यांचे एड्स जनजागृती व एड्स रोगावरील उपाय योजना यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. याशिवाय एचआयव्ही तपासणी, रक्त तपासणी पोस्टर्स स्पर्धा

इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ५२ विद्यार्थ्यांनी एचआयव्ही टेस्ट करून घेतली.

**१३) दि. २१-२२ डिसेंबर २०२१ :**

या कालावधीत उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र शासन युनिसेफ महाराष्ट्र व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यशाळेत भरत पवार या स्वयंसेवकाने सहभाग नोंदवला.

**१४) दि. २९ डिसेंबर २०२१ :**

जिल्हा शल्य चिकित्सालय लातूर व रासेयो दयानंद कला महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने एड्स जनजागृती अभियान घेण्यात आले. यात रासेयोच्या सर्व स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.

**१५) दि. १ जानेवारी २०२२ :**

राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक व स्वयंसेविका यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्टे, स्वयंसेवकांची कर्तव्य याची माहिती व्हावी म्हणून कार्याशाळा आयोजित करण्यात आली. या वेळी दयानंद कला महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. वामनराजी पाटील यांचे सविस्तर मार्गदर्शन णाले.

**१६) दि. २ जानेवारी २०२२:**

महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी कोवीड लसीकरण मोहिम राबविली.

**१७) दि. २६ जानेवारी २०२२ :**

राष्ट्रीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपन व वृक्षसंगोपन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये रासेयोच्या ८६ स्वयंसेवक व स्वयंसेविकांनी भाग घेतला.

**१८) दि. २७ फेब्रुवारी २०२२ :**

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, लातूर विभागातर्फे पल्स पोलिओ अभियान राबविण्यात आले. या मोहिमेत रासेयोच्या स्वयंसेवकांनी वेगवेगळ्या गावांमध्ये जाऊन पल्स पोलिओ अभियानासाठी आरोग्य विभागाची मदत केली.

**१९) दि. १४ एप्रिल २०२२ :**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त १४ एप्रिल २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे डॉ. संतोष पाटील यांचे भारतीय संविधान या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

**२०) दि. २२ एप्रिल २०२२ :**

'९५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' महाराष्ट्र महाविद्यालय, उदगीर येथे संपन्न झाले. या वेळी बाहेर गावाहून येणाऱ्या साहित्य प्रेमींना, अभ्यासकांना, विचारवंतांना संमेलन स्थळापर्यंत पोहचण्यास अडचण येऊ नये हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन महाविद्यालयातील रासेयोच्या वतीने लातूर शहरात तीन ठिकाणी मदत कक्ष स्थापन करण्यात आले. यामध्ये मध्यवर्ती बसस्थानक १, बसस्थानक २ व रेल्वे स्टेशन लातूर येथे कक्ष स्थापन केले.

**विशेष वार्षिक शिबीर २०२१-२२ :**

आधुनिक काळात देशातील तरुणांनी विशेषत: महाविद्यालयीन युवकांनी देशातील काही प्रश्नात्मक कार्य केले पाहिजे, ज्ञान संपादनाबरोबर समाजसेवेचे कार्य केले पाहिजे, समाजसेवेच्या माध्यमातूनच समाजाचा सर्वांगीण विकास होतो. स्वावलंबन, चरित्र्यवर्धन व सामाजिक बांधिलकी या मूल्यांचा समन्वय विद्यार्थी जीवनामध्ये घडवून

आणण्यासाठी व महात्मा गांधींचे स्वप्न साकार करण्यासाठी दयानंद शिक्षण संस्थेतील दयानंद कला महाविद्यालयात गेल्या अनेक वर्षांपासून रासेयो विभाग कार्यरत आहे. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव मा. रमेशजी बियाणी तसेच प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. अनिल माळी यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सुभाष कदम, प्रा. डॉ. सुनीता सांगोले व प्रा. डॉ. एम. एच. खंडागळे यांच्या परिश्रमाने विशेष वार्षिक शिबिरात विविध कार्यक्रम पार पडले.

# समाजशास्त्र विभाग

विद्यार्थ्यांच्या सामाजिक व भावात्मक जाणिवा वाढवण्याच्या दृष्टिकोनातून समाजशास्त्र विभाग नेहमीच प्रयत्नशील असतो. सामाजिक प्रश्नांची जाण आणि सोडवणूक विद्यार्थ्यांना आपल्या पातळीवरच व्हावी या उद्देशाने वर्षभरात अनेक उपक्रम घेण्यात आले.

**१२ ऑक्टोबर २०२१ :**

नवरात्र निमित्ताने महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला आणि सर्व १० महिलांना खजूर पाकिटांचे वाटप करण्यात आले. महाविद्यालय परिसरात काम करणाऱ्या या महिला निम्न आर्थिक स्तरातून आलेल्या दिसतात. त्यांना कुटुंबात स्वत:च्या आरोग्याची काळजी घेणे अवघड असते. त्यांच्या हिमोग्लोबीन वाढीच्या दृष्टीने त्यांना खजूर वाटप करण्यात आले. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, विभाग प्रमुख डॉ. अंजली जोशी, डॉ. भाऊसाहेब आदमाने आदी या वेळी उपस्थित होते. स्वच्छता महिला कर्मचाऱ्यांमध्ये संगीता कांबळे, जगदेव कांबळे, रूपाली सूर्यवंशी, रेखा घोडके, ललिता वाघमारे, मसिमा शेख, अर्चना आदमाने, शालन कबीर, ललिता पोरे व निर्मला दहिरे यांचा समावेश होता.

**२६ नोव्हेंबर २०२१ :**

आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले. विषय 'ऑर्गनायजेशनल चेंज थ्रु रिसर्च' असा होता. यावेळी रिसोर्स पर्सन म्हणून बेलफास्टा येथील क्वीन्स विद्यापीठातील डॉ. ॲलन जोसेफ आणि बेलफास्ट, आयर्लंड येथील ॲस्ट्रल एज्युकेशन लिमिटेडच्या डॉ. ऐश्वर्या पाटील उपस्थित होत्या. चर्चासत्राचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. अंजली जोशी यांनी केले. डॉ. भाऊसाहेब आदमाने यांनी आभार मानले. सदरील चर्चासत्र दोन सत्रात संपन्न झाले. या चर्चासत्रास भारत आणि आयर्लंड येथील प्राध्यापक व विद्यार्थी यांचा सहभाग होता.

**२८ ऑक्टोबर २०२१ :**

व्यक्तिमत्व विकास या विषयावर विस्तारित व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उमा व्यास, सामाजिक कार्यकर्त्या व अध्यक्ष बालकल्याण समिती, लातूर या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड होते. विभाग प्रमुख डॉ. अंजली जोशी यांनी प्रास्ताविक केले तर डॉ. भाऊसाहेब आदमाने यांनी आभार मानले.

**दि. २९ ऑक्टोबर २०२१ :**

समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी कोरोना लसिकरणावर आधारित पथनाट्य महाविद्यालय परिसरातील विद्यार्थी, प्राध्यापक व

कर्मचाऱ्यांसाठी तसेच दयानंद गेट समोरील रस्त्यावर नागरिकांसाठी सादर केले. कोरोना लसिकरणाचा वेग वाढवण्याच्या दृष्टीने हे पथनाट्य स्वत: विद्यार्थ्यांनी लेखन व दिग्दर्शन करून सादर केले. यात संकल्पना डॉ. अंजली जोशी, लेखन व दिग्दर्शन ज्योतिबा बडे, सादरीकरण ऋषिकेश लोंढे, श्रीनिवास बडे, सुदाम सुडे, राधा लोंढे, साक्षी सूर्यवंशी, ऋषिकेश आदमाने, सराजो लोळे, अंकिता दीक्षित यांनी केले.

समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी कोरोना विषाणूजन्य आजारासंबंधी माहिती व चिकित्सा करणारे लेखन केले. हे सर्व लेख एकत्रित करून विभागातर्फे 'कोरोनाचे अंतरंग' हे हस्तलिखित स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे डॉ. अब्दुल रब उस्ताद, प्रोफेसर, गुलबर्गा विद्यापीठ यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. या प्रसंगी सर्व सहभागी विद्यार्थी उपस्थित होते. ऐश्वर्या पाटील आणि श्रद्धा कुलकर्णी यांनी सर्व लेखांचे सुवाच्छ अक्षरात लेखन केले. ॲनिमेशन विभागाचा विद्यार्थी शिवप्रसाद जिडगे आणि केतन क्षीरसागर यांनी मुखपृष्ठ तयार केले. तसेच चैत्राली कुलकर्णी, अंकिता केंचे, ओम नाईकनवरे, पूनम हजारे, ऋषिकेश लोंढे, राधा लोंढे, स्नेहा बंडगर, जानम तांबोळी, शाहीन शेख, ऐश्वर्या पाटील आणि श्रद्धा कुलकर्णी यांनी अभ्यासपूर्ण लेख लिहून यात योगदान दिले.

**डॉ.प्रा. अंजली जोशी**
समाजशास्त्र विभाग

---

# विद्यार्थी-शिक्षक-पालक संघ

शै. वर्ष २०२१-२२ विद्यार्थी-शिक्षक-पालक संघाची स्थापना करण्यात आली. विद्यार्थी शिक्षक-पाक संघाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड आणि समन्वयक म्हणून प्रा.डॉ. रामेश्वर खंदारे यांची तर सदस्य म्हणून प्रा. विलास कोमटवाड यांची नियुक्ती करण्यात आली.

दि. ६ ऑगस्ट २०२१ रोजी दयानंद कला महाविद्यालय लातूर येथे विद्यार्थी शिक्षक-पालक संघ आयोजित 'कोरोना आजार समज गैरसमज' या विषयावर एकदिवसीय ऑनलाईन वेबिनार संपन्न झाला. या वेबीनारला प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद कला महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रा. महादेव वाघमारे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी शिक्षक पालक संघाचे समन्वयक प्रा.डॉ. रामेश्वर खंदारे यांनी केले. आभार प्रदर्शन भरत पवार या विद्यार्थ्याने केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील इतर प्राध्यापक तसेच विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने ऑनलाईन उपस्थित होते.

दि. १४ ऑक्टोबर २०२१ रोजी विद्यार्थी शिक्षक पालक संघ आणि लोकमत यांच्या संयुक्त विद्यमाने 'करलो सफलता मुठ्ठी में' या ऑनलाईन ग्रुमिंग सेशनचे आयोजन करण्यात आले. भविष्यातील करिअरच्या संधी तसेच विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये असंख्य विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सहभाग नोंदवला.

**प्रा.डॉ. रामेश्वर खंदारे**
समन्वयक

# संशोधन विभाग

राष्ट्रीय पातळीवर संशोधक म्हणून मान्यता मिळालेल्या संशोधक अभ्यासकांची परंपरा लाभलेले दयानंद कला महाविद्यालयाचे संशोधन केंद्र आहे. मराठी, हिंदी आणि इंग्रजी विषयातील अनुदानित पदव्युत्तर विभागासोबतच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची मान्यता या केंद्रास प्राप्त असून आज मितीस संशाधेन केंद्रात मराठी विषयात १६, हिंदी विषयात २३ तर इंग्रजी विषयात १५ असे एकूण ५४ संशोधन मार्गदर्शक आहेत. आज पर्यंत तिन्ही विषयात कार्यरत संशोधक विद्यार्थ्यांची संख्या एकूण ११० असून या नवीन शैक्षणिक वर्षात ३८ विद्यार्थ्यांनी संशोधन केंद्रात नोंदणी केली आहे. यावर्षी जवळपास १३ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्व मौखिकी दिली असून एकूण ९ विद्यार्थ्यांनी शोध प्रबंध विद्यापीठात सादर केले आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रबंधाची एक प्रत ग्रंथालयात पुढील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी ठेवली जाते. कारण याचा फायदा नवोदित संशोधकांना चांगला होत आहे. विद्यापीठाच्या सुचनेप्रमाणे प्रोग्रेस रिपोर्ट सेमिनार आणि कोर्सवर्कचे आयोजन नियमितपणे केले जाते.

या शैक्षणिक वर्षात संशोधन विभाग आणि ए. आर. बिर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर यांच्यात सामंजस्य करारनामा करण्यात आला आहे. महाविद्यालयातील प्राध्यापकांना संशोधनास चालना मिळावी म्हणून संस्थेच्या वतीने लघुशोध प्रकल्पास अनुदान दिले जाते. सदरील शैक्षणिक वर्षात चार प्राध्यापकांना लघुशोधक प्रकल्पासाठी प्रत्येकी रूपये १५००० इतके अनुदान मंजूर झाले आहे. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव मा. श्री. रमेश बियाणी यांच्याकडे असलेल्या दूरदृष्टीमुळे प्राध्यापकांच्या संशोधन कार्यास मिळणारे आर्थिक पाठबळ तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनामुळे संशोधन विभाग उत्तम कार्य करीत आहे. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित बैठका घेऊन संशोधन विभाग अद्यावत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात म्हणूनच परिसरातील संशोधक विद्यार्थ्यांना तसेच संशोधक मार्गदर्शकांना दयानंद कला महाविद्यालयात संशोधन विभागाची मदत होते.

डॉ. एस. बी. राऊतराव
समन्वयक
प्रा. व्ही. बी. झंपले
सहसमन्वयक

# वाङ्मय मंडळ

प्रस्तुत शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाने सर्व भाषा विषय मिळून एकच वाङ्मय मंडळ स्थापित केले. हिन्दी, मराठी व इंग्रजी या सर्व विषयांना योग्य प्रतिनिधीत्व देऊन वाङ्मय मंडळाची कार्यकारिणी तयार करण्यात आली. यामध्ये एम.ए. इंग्रजी द्वितीय वर्षातील कु. साधना धनाजी भोसले अध्यक्षपदी तर एम.ए. मराठी द्वितीय वर्षातील माधव धोंडीराम शिंदे आणि एम.ए. हिंदी प्रथम वर्षातील कु. मानसी बालाजी गायकवाड यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. सचिवपदी एम.ए. मराठी प्रथम वर्षातील आकाश जाधव तर बी.ए. इंग्रजी तृतीय वर्षातील कु. ऐश्वर्या बालाजी पाटील, बी.ए. हिंदी प्रथम वर्षातील महेश राजाभाऊ जाधव, बी.ए. इंग्रजी प्रथम वर्षातील कु. यशश्री शाहूराज पाठक यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

वाङ्मय मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची नेमणूक झाल्यानंतर प्रथम वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. शिवाजीराव जवळगेकर व प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालय, लातूरचे इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. बाळासाहेब भोसले उपस्थित होते. तीन विविध भाषेचे श्रोते समोर असल्यामुळे त्यांनी दोन भाषेत आपले मत मांडले. त्यांना दिलेला विषय 'भारतीय साहित्याचे पाश्चातीकरण' असा होता. या विषयावर त्यांनी अत्यंत सांगोपांगपणे भाष्य केले. या कार्यक्रमास मराठी विभागातील प्राध्यापक राजू मोरे व हिंदी विभागातील प्राध्यापिका डॉ. आग्रे यांनी विशेष सहकार्य केले.

वर्षभरात वाङ्मय मंडळाने विविध स्पर्धांचे आयोजन केले. यामध्ये भित्तीपत्रक स्पर्धा, निबंध स्पर्धा, वाद-विवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा आदींचा समावेश होता. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी वाङ्मय मंडळाचे प्रभारी प्राध्यापक म्हणून प्रा.डॉ. मच्छिंद्र खंडागळे यांची नेमणूक करण्यात आली. प्रा. राजु मोरे व प्राध्यापिका डॉ. आग्रे यांनी वरील सर्व स्पर्धा व कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

डॉ. एम. एच. खंडागळे
समन्वयक

---

# ग्रंथालय विभाग

भारतातील दहाव्या क्रमांकाचे व महाराष्ट्रातील एक नंबरचे ग्रंथालय म्हणजे दयानंद कला ग्रंथालय होय. अतिशय जुन्या ग्रंथांनी व्यापलेले असे आपले ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये १९११ पासूनचे मॅग्झीन्स आपणास पहावयास मिळतील. वेगवेगळी ग्रंथसंपदा, धार्मिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशी अनेक प्रकारचे ग्रंथ आपणास पहावयास मिळतील. आज आपल्या ग्रंथालयाची ग्रंथ संख्या १ लाख झालेली आहे. एक स्वतंत्र कला शाखेचे ग्रंथालय म्हणून आपली ओळख वेगळी आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये आपलेही ग्रंथालय नवनवीन बदल स्वीकारत आहे. 'DELNET' सॉफ्टवेअर मार्फत संपूर्ण जगामध्ये आपलेही ग्रंथालय कनेक्ट झाले आहे. जगातील कुठल्याही ग्रंथालयातील पुस्तक आपण मागवू शकतो व आपलेही पुस्तक संपूर्ण जगामध्ये 'DELNET' मार्फत पाठवू शकतो. आज

आपल्या ग्रंथालयात ६२ प्रकारचे मॅग्झीन्स, २७ प्रकारचे वृत्तपत्र येतात. तसेच N-LIST मार्फत आपण ६ हजारांहून अधिक मॅगझीन्स पाहू शकतो, वाचू शकतो. काळाबरोबर आपले ग्रंथालय डिजीटल ग्रंथालय होण्याच्या मार्गावर आहे. आता सध्या संपूर्ण संगणकीकरण झालेले आहे. विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना SOUL मार्फत प्रत्येक ग्रंथालयातील पुस्तक पहावयास मिळते. विद्यार्थी OPAC चा वापर करतात. पुस्तकांची डिमांड करतात. विद्यार्थ्यांना सुध्दा यामध्ये अनेक सुविधा ग्रंथालयामार्फत दिल्या जातात. ज्येष्ठ नागरिक, PhD, M.Phil, SET, NET, इतर कर्मचारी यांनाही ग्रंथालयामार्फत सुविधा दिल्या जातात.

**डॉ. अपर्णा पसारकर**
ग्रंथालय प्रमुख

# दयानंद स्पर्धा परीक्षा केंद्र

दयानंद कला महाविद्यालयात येणारा विद्यार्थी हा बहुतांशपणे ग्रामीण भागातील आहे. म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी व मा. सचिव रमेशजी बियाणी यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करता यावी, हे विद्यार्थी पुणे, मुंबई, औरंगाबाद किंवा इतर तत्सम शहरात आर्थिक अडचणीमुळे जाऊन अभ्यास करू शकत नाहीत म्हणून दयानंद कला महाविद्यालयातच युपीएससी, एमपीएससी, पीएसआय, एसआयटी, बँकिंग किंवा सरल सेवा भरतीच्या परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी इ.स. २०१२ मध्ये दयानंद स्पर्धा परीक्षा केंद्र स्थापन करण्यात आले. या केंद्रात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध सेवा सुविधा महाविद्यालयाकडून उपलब्ध करून दिल्या जातात. यामध्ये स्वतंत्र स्पर्धा परीक्षेचे अद्यावत ग्रंथालय, तसेच अभ्यासिका, मुला-मुलींसाठी स्वतंत्र अध्यापन इत्यादी सेवा पुरवल्या जातात. दरवर्षी अद्यावत स्पर्धा परीक्षेची पुस्तके ग्रंथालयात खरेदी केली जातात. पण शै. वर्ष २०२१-२२ मध्ये कोरोना संकटामुळे पुस्तक खरेदी करता आली नाहीत. ग्रंथालयात स्पर्धा परीक्षेस उपयुक्त मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रे, मासिके विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली.

या अभ्यास केंद्रात २५० विद्यार्थी आसन क्षमतेची सर्व सोयीनी युक्त अभ्यासिका उपलब्ध करून दणेयात आली आहे. यामध्ये १०० आसन क्षमतेची मुलींची व २५० मुलांची बैठक व्यवस्था या ठिकाणी आहे. ही अभ्यासिका सकाळी ७ ते रात्री ११ वाजेपर्यंत सुरू असते. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व बाहेरील विद्यार्थीही प्रवेश घेऊ शकतात. यासाठी २०० रूपये व्यवस्था शुल्क घेतले जाते. तसेच ज्यांना वाचनासाठी पुस्तके घ्यावयाची आहेत त्यांच्याकडून सुरक्षेसाठी १००० रुपये अनामत रक्कम घेतली जाते. विद्यार्थ्यामध्ये विविध स्पर्धा परीक्षांविषयी जन-जागृती व्हावी यासाठी विविध यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन व प्रशासनातील अधिकाऱ्यांची व्याख्याने आयोजित केली जातात. कोविड-१९ च्या संकटामुळे शै. वर्ष २०२१-२२ मध्ये बरेच दिवस अभ्यासिका बंद ठेवावी लागली. परंतु विद्यार्थ्यांना आवश्यक ऑनलाईन मार्गदर्शन या काळात करण्यात आले.

**प्रा.डॉ. सुभाष कदम**
समन्वयक

# कनिष्ठ महाविद्यालय

दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालय हे विद्यार्थ्यांना यशाकडे घेऊन जाणारा सर्वात जवळचा मार्ग म्हणून ओळखले जाणारे महाविद्यालय आहे. अशी ख्याती असलेल्या महाविद्यालयाचा उपप्राचार्य म्हणून काम करताना मला सार्थ अभिमान वाटतो. विद्यार्थ्यांचे यश आणि दयानंद कला महाविद्यालय हे दोन शब्द एकमेकांना पर्यायी झाले आहेत. कला शाखेत यशस्वी कारकीर्द करण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील विद्यार्थी इयत्ता दहावी नंतर लातूरच्या दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालयास प्रथम प्राधान्य देतात. आधुनिक तंत्र पद्धतीने अध्ययन-अध्यापनासाठी वापर, सरावातील सातत्य, गुणवत्ता विकास वर्गाचे उत्तम नियोजन, शैक्षणिक सहली, प्रदर्शन, लेखन, वाचन व संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी सातत्याने समन्वय असावा यासाठी अनेक योजना आखून दयानंद कला महाविद्यालय आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवून यशाची नवनवी शिखरे पादाक्रांत करीत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ वर्षाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. एस. पी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांची बैठक घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध समित्या गठित करण्यात आल्या. वर्षभराच्या कामकाजाचे उत्तम नियोजन करण्यात आले.

यश मिळविण्यासाठी आवश्यक असणारी सर्वात मोठी शक्ती म्हणजे आत्मविश्वास. हा आत्मविश्वास सरावातून निर्माण होतो. १२ वी बोर्ड परीक्षेत यश मिळविण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांकडून सातत्याने सराव करून घेण्यासाठी महाविद्यालयातील परीक्षा विभाग प्रमुख डॉ. गोपाल बाहेती, प्रा. शिवाजी राठोड व प्रा. जिगाजी बुद्रुके यांच्याकडे परीक्षा विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली. परीक्षा विभागाने वर्षभराचे उत्तम नियोजन करून इ. १२ वी वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ६ सराव परीक्षांचे आयोजन केले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक सराव परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यास अनुक्रम रुपये १०००/-, ७००/-, व ५००/- या प्रमाणे रोख पारितोषिके महाविद्यालयाच्या वतीने देण्यात आली.

इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांत गुणात्मक स्पर्धा वाढावी म्हणून त्यांना प्रोत्साहनपर अनेक रोख रकमेची पारितोषिके, सन्मानचिन्ह दिली जातात. दयानंद शिक्षण संस्थेकडून १२ वी बोर्ड परीक्षेत प्रथम येणाऱ्यास रु. ५०००/-, द्वितीय रू. ३०००/- व तृतीय रू. २०००/- रकमेचे बक्षीस दिले जाते. तसेच संस्था पदाधिकारी, माजी प्राचार्य, प्राध्यापक व माजी विद्यार्थी यांच्याकडूनही विविध रोख असे हजारो रूपयांची पारितोषिके विद्यार्थ्यांना दिली जातात. यामुळे महाविद्यालयाने १२ वी बोर्ड परीक्षेच्या निकालाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवली आहे.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशात केवळ महाविद्यालयाचा वाटा नसतो तर त्यांच्या कुटुंबाचाही मोलाचा वाटा असतो. त्यामुळे शिक्षक व पालकांमध्ये संवाद असणे आवश्यक असते. असा संवाद साधला जावा यासाठी दर शुक्रवारी व शनिवारी प्रत्येकी वीस विद्यार्थ्यांच्या पालकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात येते. बैठकीत विद्यार्थी व पालकांच्या समस्या समजून घेऊन व त्या समस्या सोडवून विद्यार्थी व पालकात एक विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यात येते.

उपस्थिती समितीद्वारे दर महिन्याला अनुपस्थित विद्यार्थ्यांची दखल घेऊन विद्यार्थ्यांच्या पालकांपर्यंत अनुपस्थिती बाबत लघु संदेशाद्वारे व प्रत्यक्ष दूरध्वनीद्वारे संपर्क करून माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांची ग्रामीण जीवनाची नाळ जोडून ठेवण्यासाठी आमच्या महाविद्यालयाचा एन.एस.एस. विभाग नेहमी अग्रेसर असतो. यासाठी महाविद्यालयात रा.से.यो.चे दोन युनीट कार्यरत आहेत. कार्यक्रम अधिकारी प्रा. विलास कोमटवाड व प्रा. सुरेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली वर्षभरात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अनेक उपक्रम राबविले जातात. तसेच सात दिवसाचे ग्रामीण भागात विशेष शिबीर घेण्यात आले.

मा. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या संकल्पनेतून इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी वर्गातील विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा मनसोक्त

वापर करता यावा यासाठी 'गोल्ड कार्ड' ही संकल्पना नव्यानेच राबविण्यात आली. त्यामुळे या योजनेचा अनेक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. तसेच त्यांच्यासाठी स्वतंत्र अभ्यासिकेची व्यवस्था देखील केली.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात महाविद्यालयाचा क्रीडा विभाग देखील मोलाचे योगदान देत आहे. या विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी कबड्डी, व्हॉलिबॉल, बॅडमिंटन, मैदानी स्पर्धा, जिम, क्रिकेट, योगा इत्यादी इनडोअर व आऊट डोअर क्रीडा प्रकारांचे आयोजन केले जाते. यातील अनेक विद्यार्थ्यांची निवड शालेय क्रीडा स्पर्धेत विभाग व राज्य पातळीवर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पूर्वी झालेली आहे.

शै. वर्ष २०२१-२२ मध्ये कोविड-१९ नंतर महाविद्यालय सुरूळीत सुरू झाले. जे खेळाडू नियमित सराव करू इच्छित होते अशा सर्व खेळाडूंचा कबड्डी, मैदानी स्पर्धा, बॅडमिंटन इत्यादी खेळांसाठी परीक्षेपूर्वी एक महिन्यापर्यंत नियमित सराव घेण्यात आला.

त्याचप्रमाणे काही मोजक्याच असोसिएशनच्या खुल्या स्पर्धा या काळात पार पडल्या. त्यापैकी 'लाठी काठी क्रीडा स्पर्धा' नेपाळ असोसिएशनतर्फे घेण्यात आल्या. त्यामध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा खेळाडू बिराजदार अजिंक्य बाळासाहेब हा सहभागी झाला व प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदकाचा मानकरी ठरला.

त्या खेळाडूला दयानंद शिक्षण संस्थेतर्फे प्रोत्साहनपर येण्याजाण्याचा व इतर खर्च म्हणून रू. २५०००/- रक्कम देण्यात आली.

महाविद्यालयातील विविध मंडळांच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेऊन जिल्हा व विभागीय स्तरावरचे पुरस्कार प्राप्त केले. तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दोन दिवसीय राज्य स्तरीय अर्थशास्त्र व सहकार परीषदेचे आयोजन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये सहकार क्षेत्राची जाणीव व्हावी म्हणून '२०-२०' या साखर कारखान्यास अर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची एक दिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले. 'आझादी का अमृत महोत्सव' निमित्त नळदुर्ग येथे सहलीचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयातील पर्यवेक्षक प्रा. डॉ. दिलीप नागरगोजे यांची महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे येथे तर्कशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळावर निवड झाली. तसेच समाजाचे दायित्व विचारात घेऊन प्रा. डॉ. दिलीप नागरगोजे यांनी आपल्या आईच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त महाविद्यालयातील गरीब व होतकरू एकूण २१ विद्यार्थिनींचे शैक्षणिक शुल्क रू. १७२४१/- भरून एक नवा आदर्श समाजासमोर निर्माण करण्याचे कार्य केले. तसेच इयत्ता १२ वी तत्त्वज्ञान विषयाचा संपूर्ण अभ्यासक्रम रू. ३५०००/- खर्च करून युट्यूबवर ऑनलाईन उपलब्ध करून दिला आहे. प्रा. डॉ. संदीप जगदाळे यांची विद्यापीठ गीत गायन समितीवर निवड झाली व त्यांनी तयार केलेले ध्वनिमुद्रण विद्यापीठाने स्वीकारले. तसेच स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड यांच्या वतीने आझादी का अमृत महोत्सव लातूर जिल्हा समितीवर त्यांना सदस्य म्हणून नियुक्ती मिळाली.

दयानंद महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करता नाविण्यपूर्ण उपक्रम नेहमीच राबविले जातात. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाचे परिणाम पाहता विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून महाविद्यालयातील लॉकडाऊन काळात १२ वी वर्गातील विद्यार्थ्यांकरिता ऑनलाईन तासिका सुरू करण्यात आल्या असून गुगल फॉर्मच्या माध्यमातून ऑनलाईन टेस्ट व असाइनमेंट घेण्यात आल्या. ऑनलाईन ई-लर्निंग मॉडेल्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पीपीटी, व्हिडिओ, ऑनलाईन लेक्चर व ई बुक्स संदर्भातील माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली. १२ वी च्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात आले. तसेच 'कमवा व शिका' या योजनेत विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊन त्यांना आर्थिक मदत करण्यातही आमचे महाविद्यालय अग्रेसर आहे.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, शालेय समितीचे चेअरमन मा. ललितभाई शाह, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. सुरेशजी जैन यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन तसेच प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड यांचे सूक्ष्म नियोजन व कार्यतत्परता आणि प्राध्यापकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल यशासाठी आमचे महाविद्यालय नेहमीच कटीबद्ध राहिल. धन्यवाद!

**प्रा.अनिलकुमार माळी**
उपप्राचार्य

# महिला तक्रार निवारण केंद्र

महाविद्यालयात सन २०१४ पासून महिला तक्रार निवारण समिती कार्यरत आहे. दर चार महिन्यांनी या समितीची बैठक घेण्यात आली. त्यामध्ये महिलांविषयक लैंगिक छळवणूकीच्या तक्रारींचा आढावा घेतला जातो. या समितीमध्ये नियमानुसार ५० टक्के महिला कार्यरत आहेत. डॉ. अंजली जोशी या समितीच्या अध्यक्षा असून दोन सामाजिक कार्यकर्त्या समितीच्या बहि:स्थ सदस्य आहेत. महिलांना काम करण्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण व्हावे यासाठी ही समिती कार्य करते. त्याचबरोबर महिलांसाठी समुपदेशन व उद्‌बोधनाचे कार्यक्रमही घेण्यात येतात.

या समितीमध्ये प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, डॉ. अंजली जोशी, प्रा. सुवर्णा लवंद, प्रा. दुर्गा शर्मा, प्रा. अंजली बनसोडे, श्रीमती अश्विनी सुरवसे, प्रा. अनिल माळी (उपप्राचार्य कनिष्ठ महाविद्यालय), श्री. नवनाथ भालेराव, श्रीमती चंद्रकला भार्गव, श्रीमती कुमुदिनी भार्गव यांचा समावेश आहे.

२०२१-२२ या शैक्षणिक वर्षात महिला तक्रार निवारण समितीने पुढीलप्रमाणे बैठका घेतल्या २५ जून २०२१, २७ जानेवारी २०२२ व ३१ मार्च २०२२.

२७ जानेवारी च्या बैठकीत ठरविण्यात आल्यानुसार ४ फेब्रुवारी रोजी 'स समानतेचा' हा लिंगभाव समानतेवर आधारित कार्यक्रम घेण्यात आला. समाजात रूजलेल्या स्त्री-पुरुष विषमते विषयी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती व्हावी या उद्देशाने सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती चंद्रकला भार्गव यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली आणि मार्गदर्शन केले. या प्रसंगी श्रीमती चंद्रकला भार्गव, श्रीमती कुमुदिनी भार्गव, अध्यक्ष डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य अनिल माळी आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शिवाजी गायकवाड यांनीही समयोचित मते व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी याप्रसंगी प्रश्न विचारून आपल्या मताचे योग्य समाधान जाणून घेतले. अनेक विद्यार्थ्यांनी चर्चेत सहभाग नोंदवला. या कार्यक्रमास ३०० विद्यार्थी व ८ प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. अंजली बनसोडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. दुर्गा शर्मा यांनी केले.

दि. ३१ मार्च रोजी महिला तक्रार निवारण समितीच्या बैठकीत समुपदेशन केंद्राचे उद्‌घाटन करण्यात आले. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती संगीता लाहोटी उपस्थित होत्या. त्यांनी समुपदेशनाची आवश्यकता आणि महत्त्व विशद केले. महिला तक्रार निवारण समिती उत्तम काम करीत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. समितीकडून महाविद्यालयातील विद्यार्थिनींना गरजेनुसार सातत्याने समुपदेशन केले जाते. या बैठकीस सर्व सदस्य उपस्थित होते. उद्‌घाटन सत्राचे सूत्रसंचालन प्रा. सुवर्णा लबंद यांनी केले तर आभार प्रा. दुर्गा शर्मा यांनी मानले.

दि. ६ एप्रिल ते ५ मे, २०२२ दरम्यान विद्यार्थिनींना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने 'बेसिक टू ब्राईडल' ही मेहंदीची कार्यशाळा एक

महिन्यासाठी घेण्यात आली. यात ३९ विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. दररोज २.२० ते ४.०० या वेळत हॉल क्रमांक ७ मध्ये प्रशिक्षक प्रीया कदम यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींना मेहंदीचे प्रशिक्षण देऊन मुलींना कुशन बनवले. पाचशे रूपये अशी अल्प फीस यासाठी ठेवण्यात आली होती. मेहंदीचा कोनही हातात धरता न येणाऱ्या मुलींना ही बेसिक पासून ते नववधूची मेहंदी काढण्यापर्यंत प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणानंतर आता या विद्यार्थिनी स्वतंत्रपणे मेहंदी ऑर्डर घेऊ शकतात.

दि. ९ मे रोजी या कार्यशाळेचा समारोप दयानंद शिक्षण संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य श्री. सागर मंत्री तसेच ब्लिसफूल ब्युटी पार्लरच्या संचालिका अंजली वांगे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी मेहंदी स्पर्धा घेण्यात आली. सर्वांनी यात सहभाग घेतला. प्रथम क्रमांक दिव्या राऊत, द्वितीय क्रमांक नेहा चौपवाड, तृतीय क्रमांक शुभांगी जाधव यांना बक्षिसे देण्यात आली. सर्व सहभागींना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. या कार्यशाळेच्या संयोजिका डॉ. अंजली जोशी या होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. सुवर्ण लवंद यांनी केले तर आभार प्रा. दुर्गा शर्मा यांनी मानले.

या मेहंदी वर्कशॉपमधून १८ हजार ३३० रूपये फी जमा करण्यात आली. ती पूर्णपणे प्रशिक्षक व विद्यार्थिनी प्रीया कदम यांना देण्यात आली. अभिमानाची बाब म्हणजे प्रिया कदम यांनी त्यातील तीन हजार रुपये विद्यार्थी कल्याण निधीला सुपूर्द केले. विद्यार्थिनींच्या सक्षमीकरणासाठी महाविद्यालयाने घेतलेल्या कष्टाचे साफल्य अशा प्रसंगी दिसून आले.

महिला तक्रार निवारण समितीचे अध्यक्षपद देऊन माझ्यावर प्राचार्यांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी आभारी आहे. माझे सर्व सहकारी, उपप्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय प्रा. अनिल माळी, प्रा. सुवर्णा लबंद, प्रा. दुर्गा शर्मा, प्रा. अंजली बनसोडे, श्री. नवनाथ भालेराव, अश्विनी सुरवसे यांची मी मन:पूर्वक आभारी आहे.

**डॉ.प्रा. अंजली जोशी**
अध्यक्ष,

---

# करिअर गाईडन्स अँड प्लेसमेंट सेल

महाविद्यालयातील बी.ए. आणि एम.ए. वर्गाच्या विद्यार्थ्यांना करिअरविषयी मार्गदर्शन करणे तसेच त्यांना नोकरी मिळण्यासाठी प्रयत्न करणे हा उद्देश ठेवून हा कक्ष वर्षभर कार्यरत असतो. कोवीड-१९ काळात लॉकडाऊनमुळे फारसे प्लेसमेंट कॅम्प महाविद्यालयाला आयोजित करणे शक्य झाले नाही. लॉकडाऊनला शिथीलता मिळतात आयसीआयसीआय बँकेचा कॅम्प आयोजित करण्यात आला. एनआयआयटी, आयएफबीआय च्या वतीने दि. २२ मे २०२२ रोज कॅम्पचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण ९८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. पहिल्या दिवशी परीक्षा घेण्यात आल्या. दुसऱ्या दिवशी मुलाखती घेऊन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. अनिकेत रमेश सूर्यवंशी, पंकज अशोक स्वामी आणि श्रावण अरविंद वाघमारे या विद्यार्थ्यांची आयसीआयसीआय या बँकेत निवड झाली.

या कक्षास कार्यक्रम घेण्यासाठी प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, डॉ. सुनील साळुंके, डॉ. शिवाजी जवळगेकर यांनी मौलिक मार्गदर्शन केले.

**डॉ. अंकुशकुमार चव्हाण**
समन्वयक

# फॅशन डिझाईन

२०२१-२२ पासून फॅशन डिझाईन विभागामध्ये बी.ए. फॅशन डिझाईन या अभ्यासक्रमामध्ये अतिरिक्त नवीन तुकडीस मान्यता मिळाली. तसेच बी.व्होक. फॅशन डिझाईन हा ३ वर्षांचा नवीन व्होकेशनल डिग्री कोर्स नव्याने सुरू करून विभागाचे विस्तारीकरण करण्यात आले.

शै. वर्ष २०२१-२२ ची सुरुवात अतिशय वेगळ्या पद्धतीने झाली. फॅशन डिझाईन विभागाची जाहिरात करण्याची सुवर्ण संधी झी २४ तास 'दयानंद कला महाविद्यालयातील व्यावासयिक रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचे वेगळेपण' या कार्यक्रमाद्वारे दि. ३०-७-२०२१ रोजी करण्यात आले. प्रा. सुवर्णा लवंद यांनी फॅशन डिझाईन मधील करिअर व त्यातील रोजगाराच्या सुवर्ण संधी या विषयावर प्रत्यक्ष प्रक्षेपणाद्वारे मार्गदर्शन केले. दि. १२-८-२०२१ रोजी फॅशन, ॲनिमेशन व इनरव्हील क्लब २४ यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन वेबीनार आयोजित करण्यात आला. या वेबीनारद्वारे 'फॅशन डिझाईन मधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम' प्रवेश व रोजगाराच्या संधी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कोरोना महामारीनंतर प्रथमच प्रत्यक्षरित्या फ्रेशर्स पार्टीचे आयोजन दि. २२-१०-२०२१ रोजी करण्यात आले. विविध स्पर्धांद्वारे मिस फ्रेशर्स सोफिया पठाण ची निवड करण्यात आली.

दि. २३-१०-२०२१ रोजी डॉ. इला डेड्रीया, मुबई (पीएच.डी.-टेक्स्टाईल ॲण्ड क्लोदींग) यांचे 'सस्टेनेबल स्टाईल ॲण्ड फॅशन' या विषयावर ऑनलाईन वेबीनारचे आयोजन करण्यात आले. या वेबिनारद्वारे फॅशन डिझाईन क्षेत्रातील विविध विषयाबद्दल माहिती देण्यात आली. या वेबिनारला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी व ते आत्मनिर्भर होण्यासाठी दयानंद शिक्षण संस्था व दयानंद कला महाविद्यालय यांच्याद्वारे दयानंद शॉपिंग कॉम्प्लेक्स या ठिकाणी गाळा उपलब्ध करून देण्यात आला व त्या ठिकाणी दिवाळीनिमित्त विद्यार्थ्यांद्वारे तयार करण्यात आलेले आर्टिकल्सचे भव्य प्रदर्शन व विक्री दि. ३०-१०-२०२१ पासून सर्वांसाठी खुले करण्यात आले होते.

फॅशन डिझाईन विभागाद्वारे दि. २२ व २३ डिसेंबर २०२१ रोजी दोन दिवसीय 'ड्रेपिंग ॲण्ड स्टिचिंग ऑफ नऊवारी साडी (रेडी टू वेअर)' वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले होते. नांदेड येथील प्रसिद्ध नऊवारी स्टिचिंग डिझायनर सौ. रूपाली वट्टमवार यांच्याद्वारे विद्यार्थ्यांना पेशवाई व मस्तानी या दोन प्रकारच्या साड्यांचे स्टिचिंग दाखविण्यात आले. या वर्कशॉपचा उद्देश प्रामुख्याने विद्यार्थ्यांना स्वत:चा व्यवसाय करता येईल व फॅशन सोबत परंपरेची जपणूक करून ग्राहकांना नऊवारी साडी रेडी टू वेअर मध्ये उपलब्ध होईल असा उद्देश होता. या वर्कशॉपसाठी

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक दिलीप नागरगोजे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतूक केले. या वर्कशॉपसाठी विभागातील सर्व प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

जागतिक महिला दिनानिमित्त रजस्वला प्राप्त काळात घ्यावयाची काळजी व त्याविषयी जागरूकता यावर प्रख्यात स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. ज्योती सूळ यांचे व्याख्यान दि. ११-३-२०२२ रोजी आयोजित करण्यात आले होते. फॅशन डिझाईन विभागातील विद्यापीठांतर्गत झालेल्या परीक्षेमध्ये विद्यापीठात सर्वप्रथम, सर्वद्वितीय व सर्वतृतीय येण्याचा बहुमान फॅशन डिझाईन विभागातील विद्यार्थिनींनी पटकावला.

दयानंद शिक्षण संस्थेद्वारे सर्व विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. यामध्ये अनुक्रमे बी.ए.फॅशन मधून मोहिनी शिंदे विद्यापीठात सर्वप्रथम, गीता रंगदळ विद्यापीठात द्वितीय, इंगळे सुप्रिया विद्यापिठात तृतीय तसेच एम.ए. फॅशन मधून सर्वप्रथम प्रियंका सोनटक्के, द्वितीय सुषमा रायठक, तृतीय मेघा कानडे यांचा समावेश आहे. शै. वर्ष २०२०-२१ मध्ये पदवी प्राप्त करताच जवळपास ७५% विद्यार्थिनींना रोजगाराच्या संधी प्राप्त झाल्या. त्याचबरोबर अश्विनी गायकवाड या विद्यार्थिनीचा आयआयटी हैद्राबाद या ठिकाणी पुढील शिक्षणासाठी निवड झाली. शै. वर्ष २०२१-२२ ची सांगता तृतीय वर्षातील विद्यार्थिनींना निरोप समारंभ देऊन करण्यात आली.

**प्रा. सुवर्णा लवंद**
विभाग प्रमुख

# इनक्युबेशन सेंटर

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना हेरून विविध क्षेत्रात त्यांना पुढे जाण्यासाठी, त्यांच्यामंध्ये पात्रता निर्माण करणे व त्यांना काळानुरूप करिअर कौशल्य विकसित व्हावीत म्हणून दयानंद कला महाविद्यालयामध्ये इनक्युबेशन सेंटर कार्य करते. त्यादृष्टीने या सेंटरच्या वतीने महाविद्यालयातील विविध मंडळे व विभागांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सहकार्य घेतले जाते.

दि. ४फेब्रुवारी, २०२२रोजी 'स' समानतेचा हा लिंगभाव समानतेवर आधारित कार्यक्रम घेण्यात आला. त्यासाठी महाविद्यालयातील महिला तक्रार निवारण समितीने पुढाकार घेतला होता. महिला तक्रार निवारण समितीच्या पुढाकारातूनच दि. ६ एप्रिल ते ६ मे, २०२२ या एक महिन्याच्या कालावधीत विद्यार्थिनींना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने 'बेसिक टू ब्राइडल' मेहंदीची कार्यशाळा घेण्यात आली. दि. २२ व २३ डिसेंबर, २०२१ रोजी दोन दिवसीय ट्रेपिंग ॲण्ड स्टिचिंग ऑफ नऊवारी साडी (रेडी टू वेअर) वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी महाविद्यालयातील फॅशन डिझाईन विभागाने पुढाकार घेतला होता.

दि. २२ मे, २०२२ रोजी महाविद्यालयात आयसीआयसीआय बँकेचा कॅम्प आयोजित करण्यात आला. त्यामध्ये महाविद्यालयातील ९८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. सदरील कॅम्पमध्ये महाविद्यालयातील अनिकेत सूर्यवंशी, पंकज स्वामी, श्रावण वाघमारे या विद्यार्थ्यांची निवड झाली. यासाठी महाविद्यालयातील करिअर गाईडन्स ॲण्ड प्लेसमेंट सेलने मार्गदर्शन केले.

**डॉ. आर. एस. पोरवे**
प्रभारी

# ॲनिमेशन विभाग

ॲनिमेशन विभागातील प्रथम वर्षाच्या भरघोस प्रवेशानंतर ॲनिमेशन मधील बागडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऊर्जेला द्विगुणित करण्यासाठी फ्रेशर्स पार्टीचे आयोजन करण्यात आले. यात ॲनिमेशन द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यामध्ये स्पर्धा घेऊन 'मिस्टर फ्रेशर्स' निवडण्यात आले. तसेच वेब डिझाईन मधील नवनवीन ट्रेंड्स्, टेक्नॉलॉजी आणि विविध करिअर समजण्यासाठी दि. २८-१०-२०२१ रोजी प्रोव्हेस ट्रेनिंग सोल्युशन ॲण्ड हायटेक स्कील, पुणे चे संस्थापक श्री. राहुल दाभाडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या मनातील कथा कलात्मक पद्धतीने सादर करता येण्यासाठी स्क्रीन प्ले खूप आवश्यक असतो तसे स्क्रीन प्ले रायटिंगवर खूप रोजगार उपलब्ध आहे. ही कला अवगत व्हावी यासाठी तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि. ७ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२१ दरम्यान करण्यात आले. या कार्यशाळेसाठी आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त प्रसिद्ध फिल्म समीक्षक व दिग्दर्शक, सचिव - प्रभात चित्र मंडळ पुणे येथील डॉ. संतोष गजानन पठारे यांना आमंत्रित करण्यात आले. त्यांनी या तीन दिवसात 'स्क्रीन प्ले रायटिंग' या विषयाचा गाभा दृकश्राव्य माध्यमाद्वारे विद्यार्थ्यांसमोर मांडला. कार्यशाळेस संपूर्ण दयानंद शिक्षण संस्थेच्या संकुलामधील विद्यार्थ्यांनी हिरीरीने भाग घेतला त्याचबरोबर स्वत:च्या संकल्पनेतील कथा लिहून नंतर त्या कथेचा स्क्रीन प्ले सादर केला.

ॲनिमेशन मधील करिअरच्या संधी काय आहेत हे समजण्यासाठी विविध कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अवेरनेस सेमिनार घेण्यात आले. त्यामध्ये दयानंद सायन्स कॉलेजमध्ये दि. ८ फेब्रुवारी रोजी, दयानंद कॉमर्समध्ये दि. ११ फेब्रुवारी रोजी, दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालयामध्ये दि. १४ फेब्रुवारी रोजी प्रा. दुर्गा शर्मा आणि प्रा. संतोष काकडे यांनी विद्यार्थ्यांना ॲडिमेशनमधील करिअर, ॲनिमेशन आहे काय? माजी विद्यार्थ्यांचा प्रगती आलेख याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

कन्या म्हणून जन्माला आल्यानंतर रजस्वला हे वरदान आहे परंतु योग्य ती काळजी न घेतल्यास हेच वरदान शापात बदलून कितीतरी महिला व मुली रोगाच्या बळी पडतात. याबद्दलची जागृती करण्यासाठी ११ मार्च २०२२ रोजी डॉ. ज्योती सूळ (प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ, सुळ हॉस्पिटल, लातूर) यांना आमंत्रित करून इनरव्हील आणि ॲनिमेशन व फॅशन डिझाईन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पाळीतील घ्यावयाची काळजी व त्याविषयी जागरूकता या विषयावर महाविद्यालयातील महिला व मुलींसाठी एक दिवसीय व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यासाठी विद्यार्थिनींनी आणि महिलांनी भरघोस प्रतिसाद दिला आणि डॉक्टरांसोबत आपल्या गैरसमजाबद्दल माहिती घेतली व योग्य काळजी समजून घेतली.

आजच्या युगात मार्केटिंगची जाण असणे

आवश्यक आहे शिवाय सोशल मिडियाचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे डिजिटल मार्केटिंग म्हणजे काय? कशा प्रकारे केली जाते? त्याचे फायदे काय? हे सर्व जाणून घेण्यासाठी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत श्री. राहुल दाभाडे (संस्थापक व संचालक, प्रोवेस ट्रेनिंग सोल्युशन अँड हायटेक स्कील, पुणे) यांच्या मार्गदर्शनाखाली तीन दिवसीय 'डिजीटल मार्केटिंग' वर्कशॉपचे आयोजन दयानंद शिक्षण संकुलातील टिचिंग-नॉन टिचिंग स्टाफसाठी दि. २९ मार्च ते ३१ मार्च २०२२ रोजी करण्यात आले. यामध्ये ४४ कर्मचारी सहभागी झाले. त्यांच्यासाठी शेवटच्या दिवशी स्पर्धा घेऊन प्रथम, द्वितीय आणि तृतीय येणाऱ्यांना पारितोषिक व सर्व सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आले.

वर्षअखेरीस तृतीय वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांची शेवटची परीक्षा संपण्याअगोदरच जॉब मिळाले. त्यामध्ये अक्षय पोतदार, मनन गटागट, नचिकेत साळुंके यांना कॉसमॉस माया प्रा.लि., मुंबई येथे ॲनिमेटर या पदावर नियुक्ती झाली तसेच आशुतोष घनगावे, रोहित हराळे, यादव पाटील, विशाल कांबळे, सुरज करंडे यांना एनवायव्ही, एफएक्स प्रा.लि. हैद्राबाद येथे मॅच मुव्हर या पदावर तर आशिष बनसोडे व आशुतोष सूर्यवंशी कायझन स्टुडिओ, पुणे येथे रोटो आर्टिस्ट जयेश तालेवार, डिजिकोर व्ही.एफ.एक्स स्टुडिओ पुणे प्रेप/पंट आर्टिस्ट या पदावर नियुक्ती झाली. त्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. दयानंद शिक्षण संस्था व प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देऊन वर्षाचा शेवट झाला.

**प्रा. दूर्गा शर्मा**
विभाग प्रमुख

# वाद-विवाद व वक्तृत्व मंडळ

भारतीय संस्कृतीतील एकूण ६४ प्रकारच्या कलांपैकी वाद-विवाद व वक्तृत्व ही एक कला विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावी म्हणून महाविद्यालयातील वाद-विवाद व वक्तृत्व मंडळ सतत प्रयत्नशील असते. जिल्हा, विभागीय, राज्य व राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या वाद-विवाद व वक्तृत्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे म्हणून मंडळ अविरतरित्या कार्य करीत असते. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथील 'स्व. नानाजी पालकर वक्तृत्व स्पर्धे'त मेघराज शेवाळे व श्रद्धा गुरव यांनी यशस्वी सहभाग घेतला.

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे ५ जानेवारी २०२२ रोजी आयोजित महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मेघराज शेवाळे या विद्यार्थ्यास तृतीय क्रमांक मिळाला. प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड यांनी वाद-विवाद व वक्तृत्व मंडळाच्या विविध कार्यक्रमांसाठी पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

**डॉ. बालाजी घुटे**
प्रभारी

---

# Movie Club

During this academic year 2021-22 the club screed literature based movies for M.A. English students. A a part of celebration of 'Azadi ka Amrut Mahotsav' one movie based an patriotism wass screen in the college auditorium.

Dr. Doke M. N.

# एन.सी.सी.

छात्रांमध्ये शील, शिस्त, संयम, निर्णयक्षमता, बुद्धी, एकोपा, समानता, राष्ट्राभिमान, उच्च विचारसरणी, ध्येयनिष्ठा, समयनिष्ठता, आज्ञाधारकपणा इत्यादी गुणांचा विकास व्हावा यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना कार्य करते. सोबतच असे गुण छात्र सैन्यात भरती करता यावेत यासाठी त्यांना प्रशिक्षित केले जाते. ही सेना भारतातील देशांतर्गत असुरक्षित प्रसंगी नागरी संरक्षणासाठी मोलाचे कार्य करणारी छात्र सेवा संघटना आहे. शै. वर्ष २०२१-२२ या वर्षी महाविद्यालयाच्या वतीने ५४ विद्यार्थ्यांना मैदानी चाचणी देऊन प्रवेश देण्यात आला. यापैकी सी प्रमाणपत्र परीक्षेसाठी ९ तर बी प्रमाणपत्र परीक्षेसाठी १२ कॅडेटना प्रवेश देण्यात आले तसेच सीनिअर अंडर ऑफिसर म्हणून अजय राठोड यांची निवड करण्यात आली.

शै. वर्ष २०२१-२२ हे वर्ष कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने याही वर्षी वार्षिक प्रशिक्षण शिबीर महाविद्यालयातच आयोजित कण्यात आले होते. २१ नोव्हेंबर २०२१ ते १५ नोव्हेंबर २०२१ यादरम्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरादरम्यान शस्त्र प्रशिक्षण, मॅप रिडींग, ड्रिल इत्यादींचे प्रशिक्षण देण्यात आले. हे वर्ष स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष असल्यामुळे वर्षाची सुरुवात ५३ महाराष्ट्र बटालियनच्या वतीने जनजागृती रॅली काढून झाली. या अभियानांतर्गत २३ सप्टेंबर रोजी एनसीसी विभागाच्या वतीने 'विविधतेत एकता'या भीमवर पोस्टर डिझाईन आणि लोगो डिझाईन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ऑनलाईन सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात आले होते. या संकल्पनेला महाविद्यालयातील एनसीसी कॅडेटस्नी उदंड प्रतिसाद दिला. केंद्र सरकारच्या पुनीत सागर अभियानांतर्गत साठलेल्या जलसाठ्यातील कचऱ्याच्या स्वच्छतेची मोहीम ७ एप्रिल रोजी खाडगाव येथील जलसाठ्यातील स्वच्छता करून राबविण्यात आली. याशिवाय १५ ऑगस्ट, २६ जानेवारी या राष्ट्रीय सणांच्या दिवशी महाविद्यालयाच्या प्रांगणात परेडचे आयोजन केले तसेच त्याच दिवशी लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे भव्य संचलनात कॅडेटस्नी सहभागी होऊन पालकमंत्र्यांसमोर महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. त्याचप्रमाणे १७ सप्टेंबर विद्यापीठ दिनानिमित्त आपल्या महाविद्यालयात परेडचे आयोजन करण्यात आले होते. तसेच योग्य दिनाचे औचित्य साधून घेण्यात आलेल्या कार्यक्रमात कॅडेट्सनी सहभाग नोंदवला. आमच्या कॅडेटना महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड, डॉ. प्रदीप सूर्यवंशी, डॉ. सुभाष कदम, डॉ. अशोक वाघमारे, प्रा. महेश जंगापल्ले व इतर अनेक प्राध्यापकांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य लाभले.

**प्रा.ले. विवेक झंपले**

# क्रीडा विभाग

वरिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंची स्वा.रा. ती. म., नांदेड अंतर्गत आंतर महाविद्यालयीन विविध क्रीडा स्पर्धा शै. वर्ष २०२१-२२ मध्ये निवड झाली. महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावून क्रीडा स्पर्धा खेळाडूंनी दैदिप्यमान यश मिळून दिले. बास्केट बॉल, फुटबॉल, व्हॉलीबॉल, क्रिकेट, खो-खो, वेट लिफ्टिंग, बेस्ट फिजिक्स, बॉक्सींग, कबड्डी, टेबल टेनिक, क्रॉस कंट्री, योगा, कुस्ती, ॲथलेटिक्स अशा विविध खेळांमध्ये खेळाडूंनी प्राविण्य मिळवून महाविद्यालयास घवघवीत यश प्राप्त करून दिले.

या सर्व स्पर्धांमध्ये १६५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. पैकी १२७ विद्यार्थ्यांनी ए झोन, सेंटर झोन आणि इंटर युनिव्हर्सिटी टुर्नामेंटमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला.

सोनल विजय सावंत या विद्यार्थिनीने नॅशनल व इंटरनॅशनल स्तरावर रौप्य पदक प्राप्त केले. तसेच तुर्की येथे झालेल्या स्पर्धेत सोनल सावंतने 'इस नामाब तुर्की' आंतरराष्ट्रीय रौप्य पदक पटकावले व खेलो इंडियामध्ये चौथा क्रमांक प्राप्त केला. आकाश गौड या विद्यार्थ्याने खेलो इंडियामध्ये सहभाग नोंदविला.

वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये विशेष प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना आणि आंतरविद्यापीठ स्पर्धा अशा विद्यार्थ्यास रक्कम रू. १५००/- व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

दयानंद कला महाविद्यालयाने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी विविध खेळांचे, बास्केट बॉल मुला-मुलींचे ए झोनची स्पर्धा व सेंटर झोन मुला-मुलींच्या स्पर्धे चे आयोजन केले. २१ जून रोजी 'योगा डे' चे आयोजन करण्यात आले. २६ जानेवारी या दिवशी 'एकता दौड'चे आयोजन केले. यामध्ये दयानंद कला महाविद्यालयाचे प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. महाविद्यालयातील क्रीडा विभागाचे व सांस्कृतिक विभागाचे विद्यार्थ्यांनी लातूर व देशात प्रथमच 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज' या भव्य कार्यक्रमांत अग्रेसर होऊन सहभाग नोंदविला.

**प्रा. डॉ. अशोक वाघमारे**

क्रीडा विभाग प्रमुख

• • • • • • •

# निसर्ग मंडळ

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी देखील महाविद्यालयात निसर्ग मंडळाची स्थापना केली गेली. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने निगर्स मंडळाची स्थापना केली जाते. या मंडळाच्या माध्यमातून पर्यावरण या विषयाशी संबंधित निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वृक्षारोपन, निसर्ग सहल या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

मानव आणि निसर्ग यांचे एक अतूट असे नाते आहे. निसर्गाशी मैत्री म्हणजे आरोग्य, जीवन आणि सुखी जीवनाची खात्री होय. मानवी जीवन समृद्ध करायला निसर्ग विविध अंगानी मदत करीत असतो. विद्यार्थ्यांना सभोवतालच्या भौगोलिक परिस्थितीची जाणीव व्हावी यादृष्टीने निसर्ग मंडळाच्या माध्यमातून भौगोलिक सहलींचे आयोजन करण्यात आले.

निसर्ग मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांसाठी प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे व इतर सर्व सहकारी प्राध्यापकांचे वेळोवेळी सहकार्य लाभले.

**डॉ. दयानंद शिरूरे**

प्रभारी

# सांस्कृतिक विभाग

सर्वच क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या दयानंद कला महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे विद्यार्थी दरवर्षी होणाऱ्या युवक महोत्सव, 'इंद्रधनुष्य' राज्यस्तरीय युवक महोत्सव, आंतर विद्यापीठ राष्ट्रीय युवक महोत्सवात प्राविण्य संपादन करतातच; परंतु यंदा कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे युवक महोत्सव झाला नसला तरी विद्यार्थ्यांनी गायन, वादन, नृत्य, नाटक, पथनाट्य अशा विविध कलागुणांना वाव देत सांस्कृतिक विभागाचा रथ अविरत सुरू ठेवला.

दि. १ नोव्हेंबर २०२१ रोजी कोरोनावर मात करण्यासाठी लसिकरण मोहिमेबाबत जनमानसामध्ये जाऊन जनजागृती करण्यासाठी पथनाट्य सादर केले. दि. ५ नोव्हेंबर २०२१ रोजी मराठी रंगभूमी दिनाचे औचित्य साधून 'रंग कलेचे' हा सांस्कृतिक कार्यक्रम सांस्कृतिक विभागाच्या आजी व माजी विद्यार्थ्यांनी सादर केला. दि. ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रबोधनात्मक जलसा सादर केला.

अखिल भारतीय विद्यार्थी परीषद राष्ट्रीय कला मंच प्रतिभा संगम साहित्य संमेलन २०२१-२२ मध्ये सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. तसेच गंगाधर करंडक एकांकिका स्पर्धा २०२२ मध्ये महाविद्यालयातर्फे तनुजा शिंदे, ज्योतिबा बडे व प्रतीक्षा पाटवकर यांनी 'ॲक्ट' ही एकांकिका सादर केली. दि. १४ एप्रिल २०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी महानाट्य सादर केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ललित व प्रयोगजीवी कला संकुल, नाट्यशास्त्र विभाग आयोजित 'एकपात्री अभिनय स्पर्धा २०२२' मध्ये महाविद्यालयाची विद्यार्थिनी तनुजा छगनराव शिंदे हिने रोख रक्कम १६०००/- रूपयांचे प्रथम पारितोषिक पटकाविले. दयानंद कला महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी विजय मस्के लिखित व दिग्दर्शित 'डीएसीएल' हे थीम साँग प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदर्शित करण्यात आले.

अभिनेत्री तनुजा शिंदे या विद्यार्थिनीच्या आगामी 'हरी ओम' या चित्रपटाचे आणि गायक राजन सरवदे यांच्या अल्बम साँगचे पोस्टर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते लॉन्च करण्यात आले. 'वात्सल्यम' ही एकांकिका विद्यार्थ्यांनी सादर केली. भाजपा सांस्कृतिक प्रकोष्ठच्या वतीने घेण्यात आलेल्या 'लघुपट स्पर्धा-२०२२' मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये एम.ए. प्रथम संगीतचा विद्यार्थी ज्योतीबा हनुमंतराव बडे याने दिग्दर्शन आणि बी.ए. तृतीय फॅशन डिझाईनची विद्यार्थिनी कु. प्रतीक्षा दगडू पाटवकर हिने अभिनय केलेल्या लघुपटास उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. दि. २४ जुलै, २०२२ रोजी पथनाट्य सादर करून वृक्ष लागवडीबाबत जनजागृती करण्यात आली.

**प्रा.डॉ. अशोक वाघमारे**
सांस्कृतिक विभाग प्रमुख

# 'आजादी का अमृत महोत्सव'निमित्त विविध उपक्रम

आजादी का अमृत महोत्सवानिमित्त दयानंद कला महाविद्यालयात खालील उपक्रम राबविण्यात आले-

१. ऐतिहासिक स्थळाची सहल : दि. २२ डिसेंबर, २०२१ रोजी ऐतिहासिक किल्ला नळदूर्ग येथे भेट दिली. यात ५५ विद्यार्थी व ३ प्राध्यापक सहभागी झाले होते.

२. दि. १२ जानेवारी, २०२२ रोजी क्रांतिकारक विरपुरुषांची चरित्रे व स्वातंत्र्य लढ्यासंदर्भातील ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. याचा ६४५ विद्यार्थी व सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला.

३. २२ जानेवारी, २०२२ रोजी 'स्वातंत्र्यांची ७५ वर्षे : उपलब्धी आणि आव्हाने' या विषयावर डॉ. संदीपान जगदाळे यांचे व्याख्यान घेण्यात आले. यात २४३ विद्यार्थी व २० प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला.

४. दि. १२ ऑगस्ट, २०२२ रोजी महराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिक मुर्गाप्पा खुमसे यांचा रेणापूर येथील निवासस्थानी जाऊन प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर, डॉ. रमेश पारवे व डॉ. अंकुश चव्हाण यांनी दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने सन्मान केला.

५. दयानंद कला महाविद्यालयातील संगीत विषयाचे डॉ. संदीपान जगदाळे यांनी 'स्वातंत्र्यांची ७५ वर्षे : उपलब्धी आणि आव्हाने' या विषयावर ७५ व्याख्याने देण्याचा संकल्प केला. यातील १८ व्याख्याने संपन्न झाली.

६. दि. १२ जानेवारी, २०२२ रोजी महाविद्यालयातील १००० विद्यार्थ्यांना दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने मोफत तिरंगा ध्वज वितरण करण्यात आले.

७. 'श्रेष्ठ भारत निर्माण हेतू' निमित्त ६ मे, २०२२ रोजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांचे '२०१२ ते २०२२ या दशकातील भारतातील राजकारण' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. अध्यक्षस्थानी पद्‌भूषण मा. डॉ. अशोकजी कुकडे हे उपस्थित होते.

८. दि. १८ जुलै, २०२२ रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : कार्यपद्धती या विषयावर महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक मा. डॉ. धनंजय माने यांच्या मार्गदर्शनाखाली दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ललितभाई शाह उपस्थित होते.

९. 'हर घर तिरंगा' जनजागृती करण्यासाठी दि. १२ ऑगस्ट, २०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजता हर घर तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. यात विविध राष्ट्रपुरुषांच्या वेशभूषा करून विद्यार्थी सहभागी झाले. वेशभूषा करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यात ४४५ विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

१०. 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत दि. १३ जानेवारी, २०२२ रोजी बाभळगाव जवळील आदिवासी गौंड वस्तीवर जाऊन दयानंद कला महाविद्यालयातील संगीत विभागाच्या वतीने प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज फडकविण्यात आला व तिरंग्याचे महत्त्व सांगण्यात आले.

११. दि. १७ ऑगस्ट, २०२२ रोजी विविध देशभक्त व स्वातंत्र्यसंग्रामातील चित्र पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात ५३ विद्यार्थ्यांनी यशस्वी सहभाग नोंदविला.

-मुख्य संपादक

# दयानंद गुणवत्ता शिष्यवृत्ती

- दयानंद शिक्षण संस्थेतर्फे महाविद्यालयातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती मिळत नाही अशा विद्यार्थ्यांना २०१९-२० पासून दयानंद गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे.
- दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने विद्यापीठीय पदवी व पदव्युत्तर परीक्षेत गुणवत्ता यादीत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख रूपये १०,०००/-, सर्वद्वितीय येणाऱ्यास रोख रूपये ७०००/- व सर्वतृतीय येणाऱ्यास रोख रूपये ५०००/- पारितोषिकाच्या स्वरूपात देवून गौरव करण्यात येतो.
- बी.ए. प्रथम वर्षात, बी. ए. द्वितीय वर्षात, एम.ए प्रथम वर्षात महाविद्यालयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस अभ्यासक्रम निहाय संस्थेच्या वतीने दयानंद गुणवत्ता शिष्यवृत्ती रु. ५०००/- प्रदान करण्यात येते.
- पूज्य चुडामणी बालासाहेब महाराज ट्रस्ट, लातूरच्या वतीने या महाविद्यालयातून बारावी, बी.ए. प्रथम व बी.ए. द्वितीय वर्ष या वर्गातून प्रथम व द्वितीय येणाऱ्या व याच महाविद्यालयात प्रवेशित अन्य शिष्यवृत्ती न घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनी यांना प्रत्येकी ५०००/- रूपये शिष्यवृत्ती डॉ. जी. बी. भुतडा शिष्यवृत्ती देण्यात येईल. तसेच एम.ए. हिंदी मध्ये प्रवेशित प्रथम दोन विद्यार्थी/विद्यार्थिनी ज्यांचे याच महाविद्यालयातून बी.ए.चे शिक्षण झाले आहे व ज्यांना अन्य शिष्यवृत्ती मिळत नाही त्यांनाही प्रत्येकी रू. ५०००/- शिष्यवृत्ती देण्यात येईल.
- इंग्रजी विभागाचे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक कै. प्रा. टी. एम. राव यांच्या स्मरणार्थ पदवी व पदव्युत्तर वर्गात इंग्रजी ऐच्छिक विषयात विद्यापीठात सर्वाधिक गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने पुढाकार घेऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ पातळीवर पारितोषिक ठेवण्यात आले आहे.
- विद्यापीठीय परीक्षेत बी.ए. तृतीय वर्षात महाविद्यालयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कै. रमाकांतराव कुलकर्णी पारितोषिक रोख १०००/- व प्रशस्तीपत्र व चांदीचे पदक चिन्ह ठेवण्यात आले आहे.
- बारावी कला, बी.ए. व एम.ए. हिंदीमध्ये जो विद्यार्थी/ विद्यार्थिनी बोर्ड/ विद्यापीठ परीक्षेत सर्वाधिक गुण घेऊन उत्तीर्ण होईल त्यांना डॉ. जी. बी. भुतडा या नावाने रौप्य पदक प्रदान करण्यात येईल.
- एम.ए. हिंदी प्रथम वर्षामध्ये प्रवेशित प्रथम पाच विद्यार्थी/विद्यार्थिनींना प्रत्येकी रू. १०००/- हिंदी विभागाकडून प्रदान करण्याचा उपक्रम सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्रारंभ.
- बी.ए.मध्ये प्रथम व एम.ए. हिंदी मध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास डॉ. घनश्याम भुतडा यांच्या वतीने चांदीचे पदक देवून गौरविण्यात येते.
- प्रा.डॉ. प्रदीप सूर्यवंशी यांच्या वतीने महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्रसेना विभागातील ज्या विद्यार्थ्यांची आर. डी. परेडसाठी निवड होते त्या विद्यार्थ्यांसाठी त्यांचे वडील लान्स नाईक शिवराम सूर्यवंशी पुरस्कार रोख रूपये २०००/- व स्मृतिचिन्ह देवून गौरविण्यात येते.
- प्रा.डॉ. नितेश स्वामी यांच्या वतीने कै. शंकरराव शिवमूर्ती स्वामी यांच्या स्मरणार्थ क्रीडा विभागात तीन वर्षामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यास रोख रूपये १०००/- व स्मृती चिन्ह देवून गौरविण्यात येते.
- सेवानिवृत्त न्यायाधीश अनिल बी. नाईक यांच्या वतीने त्यांच्या मातोश्री स्व. श्रीमती इंदिरा भालचंद्र नाईक व वडील स्व. भालचंद्र श्रीनिवास नाईक यांच्या स्मरणार्थ विद्यापीठ परीक्षेत बी.ए.तृतीय वर्षात महाविद्यालयातून सर्वप्रथम येणाऱ्या एका विद्यार्थ्यास न्या. अनिल बी. नाईक यांच्या स्व. वडीलांच्या नावाने व एका विद्यार्थिनीस त्यांच्या मातोश्री यांच्या नावाने प्रत्येकी रू. ५०००/- रोख पारितोषिक देण्यात येते.
- माजी इंग्रजी विभागप्रमुख डॉ. ए. पी. विठ्ठल यांच्या वतीने एम.ए. इंग्रजी प्रथम वर्षात महाविद्यालयातून प्रथम येणाऱ्या पण द्वितीय वर्षात प्रवेशीत विद्यार्थ्यास रोख पारितोषिक.
- श्री. विनोद पुरुषोत्तम घार यांच्या वतीने स्व.प्रा. पुरुषोत्तम घार यांच्या स्मरणार्थ समाजशास्त्र विषयात बी.ए.मध्ये महाविद्यालयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रू. ११००/- रोख पुरस्कार.
- प्राचार्य डॉ. पुनम नथवी, प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते, प्रा. मेघा पंडीत व प्रा. डॉ. अनुराधा सावरीकर यांच्या वतीने स्व. डॉ. पुष्पलता अग्रवाल यांच्या स्मरणार्थ बी.ए.तृतीय वर्षातील हिन्दी विषयात महाविद्यालयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख पुरस्कार.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड परीक्षेत विद्यापीठ गुणवत्ता यादीत गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या खालील विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु. 10000/-, रु. 7000/- व रु. 5000/- दयानंद गुणवत्ता शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आली**

| अ.क्र. | वर्ग | नाव | गणुवत्ता क्र. | शिष्यवृत्ती रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| | | **पदवी** | | |
| १ | बी.ए. | गोटके योगिता श्रीराम | १ | १०००० |
| | प्रशासकीय सेवा | कांबळे विद्वान संजय | २ | ७००० |
| | | बुद्दे प्रणिता प्रल्हाद | ३ | ५००० |
| २ | बी.ए. | दया किशन | १ | १०००० |
| | ॲनिमेशन | जांगिड सोनाली राजेंद्र | २ | ७००० |
| | | जनमले संघवी साहेबराव | ३ | ५००० |
| ३ | बी.ए. | शिंदे मोहिनी भाऊसाहेब | १ | १०००० |
| | फॅशन | रंगदाल गिता श्रीनिवास | २ | ७००० |
| | | इंगळे सुप्रिया संजय | ३ | ५००० |
| | | **पदव्युत्तर** | | |
| १ | एम.ए. मराठी | गवळी अक्षय अशोक | २ | ७००० |
| | | माने महानंद श्रीमंत | ३ | ५००० |
| २ | एम.ए. हिंदी | सय्यद सालेहा युसूफ | १ | १०००० |
| | | कांबळे सोनाली पांडुरंग | २ | ७००० |
| ३ | एम.ए.इंग्रजी | रांजनकर प्रीती गोपाळराव | १ | १०००० |
| ४ | एम.ए. | माने ऐश्वर्या अनिलराव | १ | १०००० |
| | लोकप्रशासन | माने पुनम अशोक | २ | ७००० |
| ५ | एम.ए. | घाटे स्नेहा दीपक | १ | १०००० |
| | ॲनिमेशन | बनसोडे श्रुती दीपकराव | २ | ७००० |
| | | सुरवसे अमोल दत्तात्रय | ३ | ५००० |
| ६ | एम.ए. | सोनटक्के प्रियंका विजयकुमार | १ | १०००० |
| | फॅशन डिझाईन | रायथक सुषमा गंगाराम | २ | ७००० |
| | | कानडे मेघा अशोकराव | ३ | ५००० |

**महाविद्यालयात पदवी / पदव्युत्तर वर्गात**
**प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेली शिष्यवृत्ती**

| अ.क्र. | वर्ग | नाव | शिष्यवृत्ती रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | बी.ए.प्रथम | नाईक प्रत्युक्षा श्रीकृष्णा | ५००० |
| २ | बी.ए. द्वितीय | सय्यद इमरोज नीसार | ५००० |
| ३ | बी.ए. ॲनिमेशन प्रथम | जिडगे शिवप्रसाद विश्वनाथ | ५००० |
| ४ | बी.ए. ॲनिमेशन द्वितीय | रेडवकर गार्गी श्रीनिवास | ५००० |
| ५ | बी.ए.ॲडमिनीस्ट्रेटिव्ह प्रथम | बादाडे कृष्णा मोहन | ५००० |
| ६ | बी.ए.ॲडमिनीस्ट्रेटिव्ह द्वितीय | दळवे हर्षदा सुरेश | ५००० |
| ७ | बी.ए. फॅशन प्रथम | जोशी गौरी सत्यनारायण | ५००० |
| ८ | बी.ए. फॅशन द्वितीय | पाटवकर प्रतिक्षा दगडू | ५००० |
| ९ | बी.ए. मराठी प्रथम | तांदळे सुरेखा गंगाराम | ५००० |
| १० | एम.ए. मराठी प्रथम | पठाण आसमा कलीम | ५००० |
| ११ | एम.ए. इंग्रजी प्रथम | भिंगोले सत्यवान परमेश्वर | ५००० |
| १२ | एम.ए. लोकप्रशासन प्रथम | कांबळे शुभांगी मारोती | ५००० |
| १३ | एम.ए. संगीत प्रथम | बनसोडे प्रियंका अनिल | ५००० |
| १४ | एम.ए. संगीत प्रथम | साबळे सुरज भीमराव | ५००० |
| १५ | एम. ए. ॲनिमेशन प्रथम | कदम संदेश देविदास | ५००० |
| १६ | एम.ए. फॅशन प्रथम | घाटे श्रीच्छा रामराव | ५००० |

## शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्राध्यापकांच्या संशोधन कार्याचा अहवाल

| अ.क्र. | प्राध्यापकाचे नाव | संशोधन पत्रिकेतील लेख | चर्चा सत्रात सादर केलेले लेख | | | | चर्चासत्र अध्यक्ष/ विषय प्रवक्ता | पुस्तकात लेख प्रकाशित | | प्रकाशित पुस्तके | | संशोधक मार्गदर्शक विद्यार्थी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विद्यापीठ स्तरीय | राज्य स्तरीय | राष्ट्रीय | आंतरराष्ट्रीय | | चर्चासत्र स्मरणिकेत | अन्य पुस्तकात लेख | लेखक | संपादक | एम.फील | पीएच.डी. |
| १. | डॉ. एस. पी. गायकवाड | १ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| २. | डॉ. एस.एन. जवळगेकर | - | - | - | - | - | २ | - | - | - | - | - | १ |
| ३. | डॉ. आर. एस. पारवे | १ | - | - | १ | - | - | - | - | - | - | - | - |
| ४. | डॉ. एस. व्ही. साळुंके | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५. | डॉ. पी. एस. सूर्यवंशी | - | - | - | - | - | ३ | - | - | - | - | - | - |
| ६. | डॉ. ए. बी. जोशी | १ | - | - | - | - | - | २ | - | - | - | - | - |
| ७. | डॉ. एस. पी. सांगोले | ६ | - | - | - | - | ३ | - | २ | १ | २ | - | १ |
| ८. | डॉ. पी. एम. मान्नीकर | - | १ | - | ३ | - | - | ४ | - | - | - | - | - |
| ९. | डॉ. ए. एन. चव्हाण | ५ | - | - | २ | - | २ | - | - | - | - | - | - |
| १०. | डॉ. बी. टी. घुटे | १ | - | - | - | - | २ | - | - | - | १ | - | - |
| ११. | डॉ. एस. जी. पाटील | २ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| १२. | डॉ. एन. एन. डोके | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| १३. | डॉ. एस. एम. कदम | १ | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | - |
| १४. | डॉ. एम. एच. खंडागळे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| १५. | डॉ. ए. एम. वाघमारे | १ | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| १६. | डॉ. आर. एम. खंदारे | ४ | - | - | ३ | १ | - | - | - | - | - | - | - |
| १७. | डॉ. एस. बी. राऊतराव | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| १८. | प्रा. व्ही. बी. झंपले | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | | | | | | | | | | | |

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

## शिक्षक कर्मचारी वर्ग

### वरिष्ठ विभाग

**प्राचार्य**– डॉ. गायकवाड एस. पी.

**मराठी विभाग**

डॉ. जवळगेकर एस. एन.
डॉ. सांगोले एस. पी.
डॉ. चव्हाण ए. एन.
डॉ. कदम. एस. एम.

**हिंदी विभाग**

डॉ. सूर्यवंशी पी. एस.

**इंग्रजी विभाग**

डॉ. मान्नीकर पी. एम.
डॉ. डोके एन. एन.
डॉ. खंडागळे एम. एच.
डॉ. राऊतराव एस. बी.
प्रा. झंपले व्ही. बी.

**अर्थशास्त्र विभाग**

डॉ. घुटे बी. टी.

**लोकप्रशासन विभाग**

डॉ. खंदारे आर. एम.

**तत्त्वज्ञान विभाग**

डॉ. साळुंके एस. व्ही.

**इतिहास विभाग**

डॉ. पारवे आर. एस.

**समाजशास्त्र विभाग**

डॉ. गायकवाड एस. पी.
डॉ. जोशी ए. बी.

**राज्यशास्त्र विभाग**

डॉ. पाटील एस. जी.

**शारीरिक शिक्षण विभाग**

डॉ. ए. एम. वाघमारे

### कनिष्ठ महाविद्यालय

**उपप्राचार्य** प्रा. माळी ए. डी.

**पर्यवेक्षक** डॉ. नागरगोजे डी. एन.

**इंग्रजी विभाग**

प्रा. कुलकर्णी एस. बी.
प्रा. भालेराव ए. डी.

**हिंदी विभाग**

डॉ. बाहेती जी. वाय.
प्रा. सूर्यवंशी एस. ए.

**राज्यशास्त्र विभाग**

प्रा. माळी ए. डी.

**अर्थशास्त्र विभाग**

प्रा. जोशी. डी. एम.
प्रा. क्षीरसागर एस. के.

**तत्त्वज्ञान विभाग**

डॉ. नागरगोजे डी. एन.

**इतिहास विभाग**

प्रा. कोमटवाड व्ही.डी.
प्रा. बनसोडे ए. ए.

**समाजशास्त्र विभाग**

प्रा. कोटे एस.एन.
प्रा. बुद्रुके जे. आर.

**शारीरिक शिक्षण विभाग**

डॉ. दीक्षित पी. बी.

**भूगोल विभाग**

डॉ. शिरूरे डी. एस.

**संगीत विभाग**

डॉ. कुलकर्णी डी. बी.
डॉ. जगदाळे एस. जी.

**संस्कृत विभाग**

प्रा. यादव सी. पी.

**विनाअनुदानित शिक्षक कर्मचारी**

**ॲनिमेशन विभाग**

प्रा. शर्मा डी. एस.
प्रा. काकडे एस. व्ही.
प्रा. शेख आय. ए.
प्रा. पतंगे एस. पी.

**फॅशन डिझाईन विभाग**

प्रा. लवंद एस. बी.
प्रा. पिपाडा एच. एम.
प्रा. देशमुख पी. के.
प्रा. रंगदळ गीता
प्रा. जोशी पल्लवी
प्रा. निलावार डी. एस.
प्रा. बिराजदार पी.व्ही.
प्रा. नाईक आर. जी.
प्रा. हालदार एस. टी.
प्रा. बजाज के. एस.
प्रा. आग्रे मानसी

**शिक्षकेतर कर्मचारी (अनुदानीत)**

| | |
|---|---|
| श्री. भालेराव एन. डी. | अधीक्षक |
| श्री. आडसूळ बी. एस. | क.लघुलेखक |
| श्री. पांचाळ एस.डी. | व. लिपिक |
| श्री. राठोड आर. जी. | व. लिपिक |
| श्री. जोशी एस. व्ही. | क. लिपिक |
| श्री. खोगरे व्ही. बी. | क. लिपिक |
| श्री. कुलकर्णी व्ही. जी. | क. लिपिक |
| श्री. शिंदे आर. बी. | क. लिपिक |
| श्री. ढोले डी. व्ही. | क. लिपिक |
| श्री. ठाकूर व्ही. वाय. | ग्रंथालय परिचर |
| सौ. दहिरे एन.आर. | ग्रंथालय परिचर |
| श्रीमती सुरवसे ए. ए. | ग्रंथालय परिचर |
| श्री. गिरबने डी. एम. | ग्रंथालय परिचर |
| श्री. टोम्पे आर. बी. | ग्रंथालय परिचर |
| श्री. मुंढे एस. एम. | सेवक |
| श्रीमती आदमाने सी.एम. | सेविका |
| श्री. बैनबोने जी. व्ही. | सेवक |
| श्री. मुगळे पी. व्ही. | सेवक |
| श्री. गायकवाड एम. एस. | सेवक |

**शिक्षकेतर कर्मचारी (विनाअनुदानित)**

| | |
|---|---|
| श्री. इंडे डी. पी. | लिपिक |
| श्री. प्रयाग एच. डी. | लिपिक |
| श्री. मुंढे जी. बी. | लिपिक |
| श्री. वांगस्कर एस.एम. | लिपिक |
| श्री. सूर्यवंशी टी. व्ही. | लिपिक |
| कु. सांडूर आर. बी. | लिपिक |
| सौ. तोंडारे एस. एल. | लिपिक |
| श्री. अतनुरे डी. एम. | लिपिक |
| कु. पुणे निकिता | लिपिक |
| श्री. पुजारी जी. के. | ग्रंथालय परिचर |
| श्री. येलमटे यु. बी. | ग्रंथालय परिचर |
| श्री. कोळी डी. जी. | सेवक |
| श्री. लागले एन. एम. | सेवक |
| श्री. उटगे एस. जी. | सेवक |
| श्री. सुरवसे एल. बी. | सेवक |
| श्री. आदमाने ए. बी. | सेवक |
| श्रीमती आदमाने ए.एस. | सेवक |
| श्री. चौंडे डी. एस. | सेवक |
| श्री. सूर्यवंशी एन. ए. | सेवक |
| श्री. मोरे एस. डी. | सेवक |
| श्री. चव्हाण के. डी. | सेवक |
| श्री. जाधव व्ही. आर. | सेवक |
| श्री. जगताप ए. के. | सेवक |
| श्री. गोदाम पी. | सेवक |
| सौ. सावंत एस. | सेवक |